साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly......... 3 .............. 8 as
Single copy ............................. 4 as
Advertisemen
Below 10 lines ......2 R
Per line over 10 ......4 a
Repetition Per line...3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 6 JUNE 1898 NO 22
वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख ६ माहे जून सन १८९८ इ० अंक २२

### नोटीस

नोटीस बेशमी बावासा वल्लद निंबासा आज्ञान पालन करणार मातोश्री येल्हुबाई मर्द निंबासा लाड राहणार पुसद ता. मजकूर जिल्हा वासीम यांस संतुसा वल्लद रतनसा लाड राहणार पहेनी ता. नरसी याजकडून नोटीशीनें कळविण्यांत येते कीं मी तुमचे येथें आज सुमारें पांच वर्षे नोकर राहिलों नोकरी बद्दल तुमचे कडेस रुपये घेणें सुमारें १९० व आमचे सोन्याचे कडे वजन सुमारें १३। तोळे वजनाचे घरवर आहे त्याची किमत आज मित्तीस अंदाजा ३९० रुपये आहे. वरील रुपये १९० व सोन्याचे कडे ही नोटीस पावल्या दिवसा पासून १ एक महिन्यांत आह्मास परत द्यावे. पगाराचे रुपये सदहू मुदतींत न मिळाल्यास आमचे जवळचें मुखत्यारपत्र कायम आहे असें समजून त्या मिती पर्यंत तुमचे जवळून पगार घेतला जाईल. सदहू मुदतींत आमची ठेव कडे व पगाराचे रुपये न दिल्यास रीतिप्रमाणें कोर्टांत फिर्याद करून व्याज व ह्या नोटीशीचे खर्चासुद्धां एकंदर पैसा भरून घेतला जाईल. कळावें तारीख ३०।९।९८ इ.

सही
संतूसा रतनसा लाड राहणार पहेनी
कर तालुके नरसी दस्तुर खुद्द.

### नोटीस

रा. रा. विसराम व किसन वल्लद नानू पवार जात माळीगाते राहणार कसेब आकोट तालुके मजकूर जिल्हे आकोले यांस.

नोटीस देणार मिया मिसकीन गुरू मस्त आलीशा वहीवाटदार भगवंत पांडुरग पटवारी राहणार आकोट याजकडून नोटीस देण्यांत येते कीं कसेब आकोट येथील शेत सर्वेई नंबर ६६० एकर २ गुंठे १२ आकार रुपये (११) हे शेत रुपये ३०० तीनशे घेऊन आह्मास पंचा समक्ष खरीदी देण्याचे ठरले त्यास आजमासे ३ तीन महिने झाले सदरील शेताचे पैसे आह्मी रा. रा. किसन दयाल मारवाडी दुकान आकोट याचे दुकानावर ठेविले आहेत ते रुपये आपण ३०० तीनसे ठरल्या प्रमाणे ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आत तुमचे आमचे ठरलेले शेताचे खरीदीखत लिहून देऊन आपले रुपये घेऊन जावे. असे केले नाहीं तर आह्मी आपल्यावर दिवाणींत फिर्याद करून शेताची किंमत ३०० व पीकाची किंमत रुपये ४०० एकुण ७०० सातसे रुपयाची नुकसानी बद्दल दावा करून व ह्या कामांत जो खर्च लागेल तो व ह्या नोटीसीचे खर्चासह सर्व रक्कम आपल्या पासून भरून घेतली जाईल ह्मणून दिली नोटीस. कळावे तारीख २।६।९८ इसवी.

सही
मिया मिसकीन गुरू मस्त आलीशा वहीवाटदार भगवंत पांडुरंग पांडे खानापूरकर
राहणार आकोट
दस्तुर खुद्द.

## विलायतेंत प्रयत्न केला पाहिजे

उमरावतीच्या "वैदर्भात" तारीख २३।५।९८ रोजीं "वऱ्हाडांत हिंदुविधवा गृहाची अवश्यकता" या सदराखालीं मी आपलें मत दिलें होतें. तें पुष्कळांच्या पाहण्यांत आलेंच असेल. रा. वैदर्भकर्ते यांचें मत माझे मतास अगदीं अनुकूल जरी नसलें तरी पण विरुद्धही नाहीं यामुळें मला संतोष वाटतो. वऱ्हाडांत पुष्कळ संभावीत लोकांच्या मनांत या गोष्टी बद्दल कल्पना येत आहेत असें समजतें. फक्त अडचण काय ती पैशाच्या मदतीची आहे. वैदर्भकाराच्या मतें येथें विधवागृह स्थापल्यानें पुण्याच्या विधवागृहास धक्का पोहोंचेल. माझें मत असें आहे कीं, धक्का न पोहोंचता उलट एकमेकांस जास्त बळकटी येऊन पुष्कळ विधवा राहतील अशी चांगली सोय होईल. पुण्याकडे मोठ मोठे लोक कदाचित मदत जशी करावी तशी करीत नसतील ह्मणून वऱ्हाडच्या सुधारक चमूला तिकडे मदत पाठवावी लागत असेल. तीच जर वऱ्हाडचे लोक वऱ्हाडांत हिंदुविधवागृहास देऊं लागले तर इकडचें गृह चालेल, व लाजेकाजेनें तरी बोलके सुधारकपक्षाचे लोक कृतीनेंही सुधारक बनून तिकडे मदत करितील. वरपंगी फक्त लौकिकच संपादन करण्याच्या उद्देशानें जे सुधारक "होस हो" उडवून देत असतील त्याची गोष्ट सोडून द्या, बाकी ज्यांच्या अंतःकरणांत खरोखर अबलांची स्थिती येत असेल त्यांना तरी याजबद्दल कळकळ वाटेल व ते मदत करितील. मी पुण्याच्या बाजूचाच राहणारा आहे. पुण्यांतील सुधारकांची व माझी चांगलीशी जरी ओळख नाहीं तरी मी त्यांना व ते मला ओळखूं शकतील असें मला वाटतें. वऱ्हाडांतील व पुणें प्रांतांतील सुधारकांमध्यें एवढाच भेद आहे कीं वऱ्हाडांतील सुधारकांपेक्षां पुण्याकडील सुधारक लोक कृतीनें व बोलण्यानें बरेच विरुद्धपणें वागतात. असो. पुण्याकडील लोकांच्या अंगांत तरतरी नाहीं असें नाहीं, तेही या गोष्टी बदल विचार करितीलच. पैशाबद्दल विचार करावयाचा ह्मणजे झालें. आपल्याकडे मदत कोण करितात, कोण नाहींत, संस्थानांत वगैरे हिंडावयास गेल्यास काय मदत मिळूं शकेल? प्रत्येक वर्षी वर्गणीदार ह्मणूनच कित्येक लोक मदत करतात वगैरे एकंदर गोष्टी जर प्रसिद्ध झाल्या तर त्याजबद्दल आणखी विचार करावयास सांपडेल. "सत्य संकल्पाचा दाता भगवान." काया वाचा मनें करून विधवांची शोचनीय स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणारास काय पाहिजे ती मदत मिळूं शकेल, असें माझें ठाम मत आहे. पंडिता रमाबाईनें आपली महत्वाकांक्षा तृप्त करून घेण्यास अमेरिकेस धाव मारावी व जातीनें पेहरावानें, आचारविचारानें निराळें जें अमेरिकन सुधारलेलें राष्ट्र त्यापासून मदत आणावी, आणि हिंदुस्थानसारख्या देशांत पुण्यासारख्या शहरीं राजरोस विधवा गृह स्थापून आपल्या बोलकेपणास काळिमा आणावा या पेक्षां आमच्या दौर्बल्याची अगर निरुद्योगीपणाची साक्ष दुसरी कोणती पाहिजे?

आज जे इतके सुधारक पक्षाचे लोक आहेत त्यांतला एक तरी इसम इंग्लंडांत केवळ "हिंदु विधवागृह स्थापण्याच्या उद्देशानें" मदत मागण्या साठीं गेला आहे काय? जगांतील अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांत इंग्लंड देशाची गणना आहे मग अशा लोकांपुढें आपण आपल्या समाजाची स्थिती मांडून पैशाची मदत मागितली तर ते देणार नाहींत काय? मला वाटतें, पंडिता रमाबाईला जितकी मदत मिळाली तितकीच काय परंतु त्यापेक्षां जास्तही कदाचित् मिळूं शकेल? असो. ह्मणूनच वर मी "इंग्लंडांत प्रयत्न केला पाहिजे" असें लिहिलें आहे.

वऱ्हाडांतील प्रमुख लोक व नागपूर प्रांतांतील रा० ब० कोल्हटकरा सारखे नामांकित सुधारणाहितेच्छु या सुचनेचा अवश्य विचार करतील तर फार तर काय मजसारखा कोणीही तिकडे जावयास तयार होईल यांत कांहीं शंका नाहीं. २७।५।९८

"सा. वि."

## कर्मदशा.

विपुल नूतन पल्लव मंडिता,
मृदु लतातातिका सुमनांकिता
उपजुनी विजनीं, लय पावती
अनुपभुक्त जशाच तशा किती ! ॥१॥
प्रकृतिरम्यतरा तनुयष्टिका
मधुरभाव विभूषित बालिका
महतिपात्र जरी गुणधारिणी
अहह ! कंठितसे दिनयामिनी ! ॥२॥
विनयवान् गुणवान् अतिनीतिमान्
सकलशास्त्र अधीत जरी पुमान्
बहु भिकारपणा पण भोगितो
निखळ मूर्ख पदावरिं बैसतो ! ॥३॥
अमित जीव विशाळ उरीं धरी,
विभवयुक्त, न ज्या दुसरी सरी
अहह ! खारट सागर तो निका
लघु विहीर परी जल गोड कां ! ॥४॥
प्रबल कर्मदशा घडवी असें,
जरि न दोष कशांत मुळीं वसे
स्थिति सभोंवति पाहुनिया अशी
त्यज मना त्यज रुष्ट दशा कशी ! ॥५॥
प्रथम गौरविलें तुजला जनें,
मधुर बोलुनिया मित बोलणें
नसुनि ओळख ओळख सांगती
कितिक ते तव संगम वांछिती ; ॥६॥
कुजन तेच तुझ्यावरि सांप्रत
उलटले बवतां विपदास्थित;
कटुवचें तुज ते अवमानिती—
हिणविती–तरि तूं न करी क्षिती. ॥७॥
विभव–मत्त तिरस्कृति दाविती
विसरुनी अपुली पहिली स्थिती.
विभव काय असेंच टिकेल तें ?
किति वृथा श्रम हा ! किति मूर्ख ते ! ॥८॥
त्यजुनि लोक बडे नकली असे
किमपि कष्टि न होइ मना कसें !
तव समागम दोष न मानिती
रम अशा सुमहज्जन संगतीं. ॥९॥
अमर आंग्लमहाजन हे पहा
तुजवरी करिती किती लोभ हा,
हृदय ते अपुलें तुज अर्पिती,
रम अशा सुमहज्जन संगती. ॥१०॥
अतुल जीव तुझ्यावर ठेविती
सदय संतत संत असे किती
तुज निगूढ विचारहि दाविती
रम अशा सुमहज्जन संगतीं. ॥११॥
कुदिन हें तव जातिल–जातिल
सुदिन ते तुज येतिल–येतिल.
हंसति सांप्रत त्यांप्रति दे हंसूं
परि नकोच कुणावरि तूं रुसूं
*कमलबद्ध अलीसम बा जरी
जळुनी जाय मनोरथ मंजरी
प्रबल कर्मदशा ह्मणुनी उगा
बसत जा, न करी श्रम वाउगा! ॥१३॥
तुजवरी घरचे जन उत्कट
पसरितात सदां मत्सरापट
विबुध ग्रंथ समागम ही घडे
त्यज मना मग खिन्नपणा गडे ! ॥१४॥
धन चिरस्थ नसे–अधिकार ही--
विफल मान--उगीच थटाट ही--
मृगजळा जरि वांछिसि प्यावया
न मिळतां झुरणें मग कासया? ॥१५॥

BEE.

× "रात्रि र्गमिष्यति भविष्यति सुप्रभातं" ह्या सुभाषित पद्यांतील भुंग्याची आठवण वाचकांस होईलच !

वऱ्हाडसमाचार

मित्ती ज्येष्ठ वद्य २ शके १८१९

या प्रांताचें स्थानिक सरकार श्रीमान आहे, शिलकींत पैसा पुष्कळ जमा आहे आणि निराळ्या करांची गरज न ठेवितां सर्व वाढते खर्च भागण्या सारखे आहेत. तथापि सरकारी तृष्णा अगदीं अगम्य आहे. लोक सरकारी करा खालीं इतके पिळले गेले आहेत

कीं त्यांच्या गरिबीला कांहीं सीमाच उरली नाहीं. तथापि सरकारानें जमिनीचा सारा धडाक्यानें व जबरदस्तीनें वाढविला आहे आणि त्यामुळें शेतकरी लोकांची मोठी दैना उडाली आहे. या साऱ्याच्या वाढीचा फायदा लोकोपयोगाकडे जर झाला नाहीं तर स्थानिक सरकारला आह्मी मोठा दोष देऊं. मूळचे हस्तकौशल्याचे सर्व उद्योग बुडाले आहेत. त्यांचें पुनरुज्जीवन होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. निदान सरकारनें यांत्रिक कलेचें ज्ञान शिकविण्या साठीं प्रांतिक सरकारी औद्योगिक शाळा स्थापावी ह्मणजे आमच्या पेशाचा कांहीं तरी मोबदला मिळेल. राज्यकारभाराचे जसे खर्च वाढले आहेत तसे खर्च विद्यादानाकडे किंवा अशा अन्य कामाकडे वाढले नाहींत ही गोष्ट सरकारनें विचारांत घेण्यासारखी आहे. साऱ्याच्या वाढीबरोबर सामान्य व विशिष्ट विद्यादानाचा प्रसार होईल तर दुःखांत सुख तरी मानण्याला कारण होईल. अनुभव तर असा येत आहे कीं शाळा खात्यांतच काटकसर चालूं आहे आणि ती देखील प्राथमिक शाळांतून आहे हें वाईट होय. जास्ती कर बसविला आहे त्या अर्थी सरकारानें रयतेचा जास्ती फायदा करून दिला पाहिजे अशी मागणी करण्याचा प्रजेला एक मोठा हक्कच आहे. आमची मागणी बहिऱ्या सरकारला कोणी कळवील तर त्याचा मोठा उपकार होईल.

## वऱ्हाड वैद्यक खात्याचा सन १८९७ सालचा रिपोर्ट

सन १८९७ सालचा वैद्यखात्याचा रिपोर्ट मे. डाक्टर लिट्ल साहेब यांनीं लिहिला त्याची एक प्रत मे. रेसिडेंट व कमिशनर सा० यांचे अभिप्रायासह आमचे कडे आली तिचा आह्मी आभार पूर्वक स्वीकार करितों. सदहू रिपोर्ट नवीन नियमा प्रमाणें यंदा फारच त्रोटक आहे. आह्मी आपले वाचकां करितां त्यांतील मुख्य मुख्य गोष्टीची माहिती देतों तीः—

वऱ्हाडांतील व सिकंदराबाद येथील मिळून एकंदर सन १८९६ सालीं ४७ दवाखाने होते. सन १८९७ सालांत वणी जिल्ह्यांत राळेगांव येथें एक नवीन दवाखाना लोकांचे उपयोगा करितां स्थापन करण्यांत आला; तसेंच मेळघाटांतील कळमखार येथील दवाखाना मोडून तो मेळघाटांतील मध्य ठिकाण धरणी येथें बदलण्यांत आला. चालूं सालीं सर्व दवाखान्यांत मिळून एकंदर रोग्यांची संख्या ३,२९,७६६ ह्मणजे गतसाल पेक्षां १८६८ नें कमी होती. आस्पितळांत राहणारे रोगी गुदस्तपेक्षां जास्त होते याचें कारण दुष्काळपीडित लोक मध्य प्रांतातून उमरावती येथें फार आले; त्यांत पुष्कळ लोक आजारी पडल्यामुळें हस्पितळांत त्यांस ठेवण्यांत आले होते. इस्पितळा बाहेर राहणारे रोग्यांची संख्या गत वर्षी पेक्षां चालू सालीं २१,१९७ नें कमी आहे. मे० क्राफर्ड साहेब कमिशनर यांणी व मे० डाक्टर लिटल साहेब यांणीं सदहू फरकाला कारण दुष्काळ असून त्यामुळें रिलीफचे कामावर बहुतेक मजूरदार गुंतले होते व शिवाय चालूं साल पुष्कळ निरोगी होत असें दाखविलें आहे. परंतु मे० रेसिडेंट साहेब यांनीं वर दाखविलेलें कारण कदाचित बरोबर असेल असें ह्मटलें आहे परंतु यांनीं असा ही शेरा लिहून ठेवला आहे कीं इस्पितळा बाहेरील रोग्यांची संख्या कमी झाल्याबद्दल खरें कारण काय असावें याजबद्दल अभिप्राय इतर प्रांतात सदहू बद्दल काय अनुभव आला आहे हें पाहिल्या शिवाय देता येणार नाहीं.

चालूं सालीं महामारी, हगवण, पोटदुखी, व नेत्र रोग वगैरे फार होते. तापाची साथ गत सालापेक्षां फारच कमी होती. शस्त्र क्रियेचे प्रयोग गत वर्षीपेक्षां पुष्कळ कमी झाले याजबद्दल योग्य कारण कांहीं एक दाखविण्यांत आलें नाहीं. या महत्वाचे गोष्टीकडेस लक्ष देऊन त्याबद्दल तपशिलवार कारणासह खुलासा करण्याविषयीं मे. प्लौडन साहेब रेसिडेंट यांनीं सुचना केली आहे. वऱ्हाडांत एकंदर ४७ आस्पितळें आहेत त्यांचा जिल्हावार लोकसंख्येचे मानानें तपशील खालीं दाखविला आहे.

| जिल्हा | लोकसंख्या | दवाखाने. |
|---|---|---|
| आकोला. | ९७४७८२ | ९ |
| उमरावती. | ६११६४९ | १० |
| वाशीम. | ३९८१८१ | ६ |
| बुलढाणा. | ४८१०२१ | ८ |
| एलिचपूर. | ३१५७९८ | ७ |
| वणी. | ४७१६ ३ | ७ |
| | | ४७ |

डाक्टर लिट्ल साहेब यांनीं ब्युबानिक प्लेग वऱ्हाडांत येऊं नये ह्मणून वेळोवेळीं व प्रत्येक रेलवे स्टेशनवर फार उत्तम बंदोबस्त ठेवला होता. मुंबई इलाख्याशीं या प्रांताचा अतिनिकट संबंध असतां प्लेग सारख्या भयंकर रोगाचें प्रस्थान या प्रांतांत आलें नाहीं याबद्दल डाक्टर साहेब यांचे वऱ्हाडवासी जन फार ऋणी आहेत. आमच्या मतें वऱ्हाडांतील मोठमोठ्या दवाखान्याचे ठिकाणीं प्रत्येक इस्पितळास द्वोन आस्पिटल असिस्टंट नेमले गेल्यास रोग्यांस विशेष काळजीनें औषध दिलें जाऊन पुष्कळ रोगी या दवाखान्या पासून आपला फायदा करून घेतील. अकोला व उमरावती या ठिकाणीं स्वतंत्र खानगी दवाखानें झाले आहेत. याजबद्दलची माहिती आमचे पुढें असलेले रिपोर्टांत कोठेंही दिसत नाहीं. आमच्या मतें या खानगी दवाखान्यांत किती रोगी येतात व ते कोणत्या प्रकारचे असतात वगैरे माहिती दिली असतां रोगांची चिकित्सा सरकारी दवाखान्यांत कशी केली जाते याजबद्दल माहिती मिळून त्यात चढा ओढ लागून ती रोग्यास पुष्कळ फायदेशीर होऊन आरोग्य संरक्षण उत्तम होईल.

## स्पॅनिश अमेरिकन लढाई.

स्पेन व अमेरिका या दोन्ही बलाढ्य राष्ट्रामध्यें क्युबा बेटा संबंधानें बरेच दिवसापासून धुमसत असलेला वाद जगापुढें येऊन उघडपणें आतां उभय राष्ट्रामध्यें गेल्या तीन चार महिन्यापासून लढाई सुरू झाली आहे. आजपर्यंत छोटेखान्या चकमकी पुष्कळ झाल्या त्यांत एकवेळ या पक्षाची सरशी तर दुसरे वेळीं दुसरे पक्षाची सरशी याप्रमाणें अजून प्रकार चालू आहेत. मोठे कडाक्याचें युद्ध आद्याप पर्यंत झालें नाहीं. क्युबा बेट कोठें आहे याचा मुळचा इतिहास काय व हें बेट कोणी व केव्हां शोधून काढलें याजबद्दल संक्षिप्त माहिती आमचे वाचकांकरितां देण्याचें आह्मी आज योजिलें आहे. उत्तर अमेरिकेचे पश्चिमेस आतलांटिक महासागरांत कॅरिबिअन समुद्रांत वेस्ट इंडिज नांवाचीं बेटें आहेत. ह्या बेटांचे चार समुदाय आहेत. त्यांचीं नांवेः—

१ बहमा बेटें, २ ग्रेतर आंतिलस बेटें, ३ लेसर आंतिलीस (वाऱ्याकडची) बेटें आणि ४ लीवर्द बेटें (वाऱ्या समोरची बेटें. सुमारें ९०० असून तीं इंग्लंडचे ताब्यांत आहेत. ह्यांत ग्रेट बाहमा व सान साल्वादोर हीं मुख्य आहेत. ग्रेटर अंतलीस बेटांतच क्युबा, ज्या संबंधानें हल्लीं लढाई सुरू आहे. तें बेट, तसेंच जमेका, हेटी वगैरे बेटें आहेत. हीं वेस्टइंडिस बेटें प्रसिद्ध क्रिस्तोफर कोलंबस यानें स्पेन सरकारचे साह्यानें सुमारें चारशें वर्षा पूर्वीं महत् प्रयासानें शोधून काढलीं. कोलंबसाचें चरित्र जो वाचून पाहील त्यांस हें पूर्णपणें समजून येईल कीं हें नवीन जग शोधून काढण्यास कोलंबसास किती धाडस करावें लागलें व त्याचें नौकाशास्त्रप्राविण्य व कल्पना किती अचाट होत्या याजबद्दल सर्व जग मान डोलवीत आहे. हीं बेटें शोधून काढल्यापासून त्यांतील क्युबा बेट हें बरेच वर्षां पासून स्पेन सरकारच्या अंमला खालीं आहे. व हें बेट आपले ताब्यांत ठेवण्या करितां स्पेन सरकारास पुष्कळ खर्च व अडचणी आल्या होत्या. इंग्लंडास जसें हिंदुस्थान रशिआस जशी चिनी तार्तरी, तसेंच स्पेन देशास क्युबा हें मोठें फायदेशीर व द्रव्याची एक खाणच असें बेट आहे. कोलंबस हिंदुस्थानचे शोधार्थ निघाला होता परंतु तो फिरत फिरत तुफानांत सांपडून पश्चिम आतलंतिक महासागरांत गेला. जी जमीन त्यास प्रथम दृष्टीस पडली तिलाच तो हिंदुस्थान असें ह्मणूं लागला व हीं बेटें पश्चिमेला आहेत ह्मणून त्यांस त्यानें वेस्ट इंडीस अशी संज्ञा दिली. शिवाय आपले हिंदुस्थानचें हवापाणी, ऋतुमान, व ह्या वेस्ट इंडीज बेटांतील हवामान यांत फारच साम्य आहे. हिंदुस्थानांत जीं झाडझुडपें व पदार्थ जमिनींतून उत्पन्न करितां येतात तीं सर्व ह्या बेटांत उत्पन्न होतात. ह्या बेटांतील व्यापाराचे मुख्य जिन्नस ह्मटले ह्मणजे साखर, बुंद, तंबाखू, सुंठ, कापूस वगैरे. हा माल बाहेर अतीशय जातो व ह्यामुळें हीं बेटें फार श्रीमान झालीं आहेत. क्युबा बेटांत मुळचे राहणारे अगदीं जंगली लोक असत परंतु स्पेन सरकारचें ताब्यांत हें बेट आल्यापासून पुष्कळ स्पॅनिअर्डस लोकांची वस्ती येथें झाली व सुधारलेल्या राष्ट्रांप्रमाणें या बेटांतील लोक ही चांगले सुधारलेले व विद्वान आहेत. व या मुळेंच स्पेन सरकारचा जुलमी अम्मल तेथील लोकांस आवडेनासा झाला आहे. वारंवार स्पेन सरकारा विरुद्ध या बेटांत दंगे धोपे, कट वगैरे होत आहेत परंतु स्पेन सरकार बलाढ्य असल्यामुळें या बेटांतील लोकांस स्पॅनिश गव्हरनरच्या जुलमी अंमला खालींच नम्रपणें राहणें भाग पडतें. परंतु जुलमी अंमल फार दिवस टिकत नाहीं. जसजसा स्पेनचा जुलूम जास्त होऊ लागला तसतसे क्युबिअन प्रजेचे मनांत स्वातंत्र्या विषयीं विचार अधिकाधिक घोळूं लागले व अखेर युनाइटेड स्टेट मधील त्या स्वातंत्र्यप्रिय लोकांनीं या क्युबिअन प्रजेस साह्य करण्याचे योजून त्यांस या जुलमी अंमलापासून मुक्त करून स्वतंत्र करावें असा विडा उचलला आहे व हेंच कारण ह्या चालू असलेल्या लढाईचें आहे. आतां ही लढाई समुद्रांवरच चालणार. अमेरिका नौकाविद्येत उत्तम प्रवीण आहे. तशीच आरमारा संबंधानें स्पेनची किर्तीही बरीच आहे.

इंग्लंडमध्यें १५८८ सालीं एलिझाबेथ राणी राज्य करीत होती त्यावेळी स्पॅनिश आरमेडा ह्मणून प्रसिद्ध आरमार इंग्लंडवर स्पेन सरकारनें पाठविलें होतें त्यावेळीं इंग्लंडांत लोकांचीं मनें फारच अस्वस्थ झाली होतीं परंतु ईशकृपेनें इंग्लंडचे आरमारानें महा पराक्रम करून या स्पॅनिश आरमेडाची कशी वाताहत केली हें प्रसिद्ध आहे. मुख्य सांगण्याचा उद्देश हवकांच कीं स्पेनच्या आरमाराची व्यवस्था नवी नसून फार प्राचीन आहे. या वरून अमेरिका व स्पेन हीं दोन्हीहीं राष्ट्रें चांगलीं बलाढ्य आहेत व ही लढाई घणघोर सुरू झाली ह्मणजे आणखी कोण कोणतीं राष्ट्रें यांत पडतील याकडे सर्व जगाचें चित्त लागलें आहे. चीन जपान यांच मधील युद्ध झाल्या पासून आजपर्यंत युरोपांत जिकडे तिकडे लढाईची सिद्धता होत आहे. एक महान युध्द लवकरच होईल असें सर्व युरोपिअन राष्ट्रास स्वप्नच पडलें कीं काय नकळे. चीन व जपान यांचे युध्द संपत नाहीं तोंच ग्रीस व टर्की य मध्यें धुमाकुळी माजली. त्याचा शेवट होत नाहीं तोंच हिंदुस्थानचे सरहद्दीवर आफ्रडेज लोकांबरोबर युध्द होऊन ह्यांत पुष्कळ योद्धे खर्चीं पडले नाहीं तोंच रशिया व चीन यांचा प्रश्न उद्भवला ह्याचा निकाल लागला नाहीं तोंच स्पॅनिश अमेरिकन लढाई सुरू झाली यावरून हें एकूणिसावें शतक जगाचे इतिहासांत फारच प्रसिद्ध होईल यांत संशय नाहीं. इंग्लंडचे टाइम्सपत्राचा बातमीदार मि० विंटर नाईट हा लढाईची हकीगत कळविण्याकरितां मोठ्या युक्तीनें व गुप्तपणें क्युबा बेटांत जाऊन थडकला परंतु स्पॅनिश अधिकाऱ्यांनीं त्यांस धरून कैद करून ठेवलें आहे. स्पेनचे केडीझ बंदरांतून एक मोठें बलाढ्य आरमार क्युबाकडे जाण्यास ता. २८ मे रोजीं रवाना झालें. युरोपांत जिब्राल्टरचे समोर अलजेसिर्स येथील मजबूत किल्यावर स्पॅनिश सरकारनें तीन हजार नवीन बलाढ्य लष्कर ठेवलें आहे. अमेरिकन आडमिरल शिचलेइझ यानें क्यूबा बेटांतील सॅनिटिआगो नामक शहरांस त्यांत लष्कर आहे असें समजून वेढा दिला आहे. तारीख ३० मेच्या तारेवरून सदहू शहरांत स्पॅनिश लष्कर असल्या बद्दल पक्कें कळलें आहे. आतां हा वेढा किती दिवस राहतो तें पहावें. इंग्लंड, फ्रान्स वगैरे राष्ट्रांनीं वस्ट इंडिज मधील आपापले प्रजेचे रक्षणार्थ उपाय वेळींच

योजिले आहेत. फिलिपाइन्समधील स्थिती-संबंधानें बरीच खात्रीलायक अशी माहिती ता. ३१ मेचे ग्याझेटांत दिली आहे. ती पुढील खेपेस आह्मी आपले वाचकां करितां देऊं.

---

सालाबाद प्रमाणें अकोल्यास मोहरमचा सण चांगला पार पडला. प्रांतांतील इतर ठिकाणीं देखील दंगाधपा न होतां मोठ्या शांततेनें हा सण साजरा झाला. हिंदु मुसलमानामध्यें तंटे बहुतकरून आमच्या प्रांतांत होत नाहींत आणि विशेष आनंदाची गोष्ट ही कीं या उभय लोकां मध्यें चांगला सख्यभाव दिसून येतो. गुदस्ता दुष्काळामुळें मोहरमचा सण अगदीं लोकच्या सारखाच होता परंतु परंतु यंदा सुबत्ता असल्यामुळें सणवार आनंदात घालविण्याची हौस थोडीबहुत लोकांमध्यें जागृत दिसली. तथापि सूक्ष्म विचार केला ह्मणजे मोठा खेद वाटतो कीं उत्तरोत्तर आमच्या मुसलमान बांधवांचीच काय पण त्यांच्याचप्रमाणें हिंदुलोकांची देखील निकृष्टावस्था होत चालली आहे. लोकांची स्थिती कशी खालावत चालली आहे हें यांच्या सार्वजनिक उत्सवसमारंभावरून चांगलें कळण्याजोगें आहे. उत्सवाच्या दिवशीं देखील चैन करण्यास लोकापाशीं त्राण नाहीं. सर्व उत्सवदर्शक गोष्टी हळूं हळूं मंदावत चालल्या आहेत. दुःखांत सुख इतकेंच कीं आमच्या प्रांतांत हिंदु व मुसलमान एक दिलानें विशेष वागतात आणि उभय जातीवाले लोक क्रमशः आपापल्या उत्सवांतील अचकट विचकट प्रकार कमी कमी करीत चालले आहेत. निदान ही गोष्ट खरी कीं दोन्ही धर्मांतील उच्च उच्च प्रतीचे सुखवस्तु लोक चांगल्या प्रेमभावानें एकत्र नांदतात आणि ते आपल्या वजनदारीनें खालच्या वर्गांतील लोकांस आपल्या बरोबरीला नेत आहेत.

यंदा इंडियांतील इतर भागांतही मोहरमचा महोत्सव चांगल्या सुखानें झाला. सरकारचा बंदोबस्तही मोठ्या कसोशीचा व पक्का होता व त्यामुळें दंगा होण्याचा संभव कमी होता. पण मुलतान'स, मुंबईजवळील वांद्यास व आणखी एक दोन टिकाणीं लहानसे दंगे झाले. मुलतानास ३६ इसमांस जखमा झाल्या. सध्यां दंगेखोर ह्मणून ९२ मुसलमानांस व २ हिंदूस पकडलें आहे. दंग्याला सुरुवात ताज्यावर दगड मारल्या मुळें झाला. मसूरी येथील मोहरमच्या स्वाऱ्या फिरूंच दिल्या नाहींत. असो, एकंदरीनें मोहरम चांगल्या प्रकारें पार पडला. अलिकडे दुही व फाटाफूट कमी कमी होण्याचीं चिन्हें सर्व देशभर दिसत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. इंग्रजी राज्याचा संनिकर्ष असा उत्तम आहे कीं स्वहिता साठींच सर्व धर्मवाल्यांनीं महाराणी सरकारच्या साम्राज्या खालीं एकत्र झालें पाहिजे. या वस्तुस्थितीला ओळखून सर्वांनीं एकीकरणाचा मार्ग पक्या निग्रहानें धरावा हीच आमची विनंती सर्व इंडियनांस आहे.

The Berar Samachar

MONDAY, JUNE 6 1898.

## SCARCITY OF WATER SUPPLY AT AKOLA

We seem to have had very harder times now than before. We have fresh in our mind the memory of the woeful gloom and wide distress of famine and pestilence which brought, during the last year, so much evil and misery upon the whole of India. Berar had its share in this general tale of woe and misery. There are imminent signs this year of a third agonizing source of suffering and anxiety cropping up to envelop the whole populace in deeper sorrow and loss. For the last there years successively there has been a very scanty rainfall in Berar. The first year passed off without considerable depression of feeling. The second year brought on famine and pestilence was its casual companion. This year which is the third we hope the last, scarcity of water stands out conspicuously as the culminating point of the ominous series of misfortunes. Insufficient rainfall is largely responsible for these misfortunes. Akola has a small river Morna which is known to have sufficiently served the ordinary wants of the people. Annually during the summer days the river water sinks low and the bed becomes naturally shallow. As it is dammed up at the upper and the lower ends in its way downwards round the town, by stone-built anicuts, the water within this enclosed space stagnates, becomes impure, emits bad smell, presents a hideous appearance and becomes quite useless for drinking purposes. As the bed is not washed away by the incessent flow of water, considerable deposits of mud and clay replace the original sandy bed, the consequence is that there is a sheet of complete dirty water stagnant all round. Inspite of all these short—comings, the river did contribute largely to the water supply of the town. Lately, however, water communication by means of pipes had been effected between Akola and two small villages Kapsi and Mazode about 8 miles distant where exist considerable subterraneau water springs. The water so discovered is sweet, pure and excellent. As these springs owe their origin to the rains whose water permeates there through the subsoil, there arises a natural dimunition in the quantity of this supply as the rains fail. This year this source is considerably and rapidly failing. The distribution of pipe water has to be regulated with greatest economy. Pipes are made to turn on water two hours daily at the most. The result is that drinkable water is not available to a considerable portion of the populace. Now that the whole river bed between the upper and the lower anicuts has dried up and become hard enough to be easily walked over. The bank of the river to the side of the town is dug up with numerous zirrahs day and after day but there are only a few of them which actually serve to supply water though in moderate quantities. They get soaked up quickly owing to heat. Thousands of people rush there in hope to get a potful or two and willingly wait then for hours together. Various social and religions restrictions intensify the difficulty. Hundereds of people may be seen walking up a full mile in the full heat of the sun, with an earthern pot on the head from the farthest point of the Masumsha file to the wells in the premises of the Mulji Jetha Company's Factory and the Bymonji gardens. The water—fetching industry if we may call it so, has become so large and pre-eminently engrossing that much of the time of the people is taken up by it. From this one can easily imagine the amount of domestic inconvenience and misery which is the lot of by far the greatest portion of the Akola populace. Pestilence and famine were bad enemies in our camp no doubt but scarcity of water is still worse. Pestilence may be removed by the possibility of human efforts succeeding to find out and provide adequate medical relief to the sufferers. Famine distress may possibly be mitigated by large importation of food staple from out side. But in the case of water scarcity human powers fail and we are laid completely at the grace and mercy of the mighty Providence. Still as we must try to the last we are bound to do all we can to exhaust all our resources to procure an adequate supply of water till the rains remove want. Under these circumstances we beseech in all earnestness the Municipal authorities to stir up and use their utmost to meet the present contingency in a manner equally gratifying to the people in general and creditable to the Municipal administration itself.

---

## वऱ्हाड

हवामान—ऊन प्रखर आहे. मध्यंतरीं पावसाचीं चिन्हें नव्हतीं पण तीं गेल्या दोन दिवसा पासून पुन्हा दिसूं लागलीं. उष्णतामापक पारा ८२ डिगरी पासून ११३ डिग्री पर्यंत चढतो. यंदा पाण्याची हाकाटी सर्वत्र असून पुष्कळ वर्षांत पाण्याचा तोटा इतका कधीं नव्हता. किरकोळ दुखणीं पुष्कळ वाढलीं आहेत.

मे० शेर महमदखान तहशलिदार, वाशीम, एक महिन्याची रजा गेल्या १ ले तारखे पासून मिळाली असून ते या रजेंत देशी गेले आहेत. वाशीम तहशिलीचे नायब तहशलिदार यांस तहशीलदारी दिली आहे.

मुनशी अजिजुद्दीन असि० कमिशनर हे सरकारी कामा निमित्त चिखलदऱ्यास गेले आहेत. त्यांची बदली इलिचपुरास झाली असून ते अकोल्यास परत आल्या नंतर इलिचपुरास जातील.

पाण्याचें दुर्भिक्ष्यः—हल्लीं आकोले येथें पिण्याचे पाण्याची फार टंचाई पडूं लागली आहे. कापशी येथील विहिरींतील पाणी फारच कमी झालें. त्यामुळें नळात पाणी अगदीं थोडा वेळ असतें व तें सर्वांस पुरेसें मिळूं शकत नाहीं. गोड्या पाण्याच्या आसपासच्या विहीरी ही सुकून जात आहेत. मोर्णा नदी तर सबंध कोरडी ठणठणीत पडली आहे. आतां लवकर बरसात सुरू झाल्यास ही अडचण दूर होईल.

मि. आर. आवर्ड आय. सी. एस. यांनीं गेल्या शुक्रवारीं मध्यप्रांताचे जुडिशिअल कमिशनर मि. स्टानले इस्मे यांच्या कामाचा चार्ज घेतला आणि मि. इस्मे त्याच दिवशीं १ वर्षाच्या फर्लो रजेवर रवाना झाले. मि. आवर्ड सारखे जुडिशिअल कमिशनर वऱ्हाड प्रांताला पुन्हा मिळणार नाहींत. असेच अप्रतिम हे गृहस्थ आहेत. त्यांची बढती पाहून लोक त्यांच्या विरहाला कबूल झाले.

---

जाहिर खबर

या लेखानें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं कुंदनलाल बन्नूलाल सारस्वत ब्राह्मण वस्ती अडगांव खुर्द यांची कुलमुखत्यारी तारीख १४ जानेवारी १८९८ पासून करीम खा वल्द बहादरखा बाघदवाला राहणार अडगांव खुर्द यांस दिली होती. सदहू मुखत्यार पत्र नोंदलेलें आहे. करीमखा बहादरखा यांस मालकानें मुखत्यारी वरून काढून टाकलें आहे तर तें नोंदलेलें मुखत्यार पत्र या पुढें रद्द समजावें. कुंदनलालचा मुखत्यार ह्मणून कुंदनलालच्या इस्टेटी संबंधानें जर कोणी काहींही देवघेव करीमखा याजबरोबर करील तर ज्याचा तो जबाबदार राहील. कुंदनलाल किंवा त्यांची इस्टेट जबादार नाहीं. कळावें तारीख ३ जून सन १८९८ इसवी.

सही

कुंदनलाल बन्नूलाल सारस्वत ब्राह्मण तर्फे स्पेशल मुखत्यार बाळकृष्ण हरबाजी जोशी दस्तुर खुद्द.

---

जाहिरात

सर्व लोकांस व सदाराम सवाईराम राहणार भिंडोळ अग्याराम परशराम मारवाडी राहणार भिंडोळ बुजरुक तालुके जळगांव जिल्हे अकोले हे असें जाहीर करतात कीं. आह्मी आजपर्यंत रा. सदाराम सवाईराम मारवाडी भिंडोळ यांस कुलमुखत्यार नेमले होते. पण यांचे मुखत्यारपत्र आजपासून रद्द केलें आहे. तर त्याच्याशी एखादी देवघेव वगैरे कोणचाही व्यवहार आमचे संबंधानें करू नये. केल्यास ज्याचा तो जबाबदार आहे ती देवघेव वगैरे आह्मांस मुळींच संमत होणार नाहीं. कळावें तारीख ३ माहे जून सन १८९८ इसवी.

सही

मारवाडींत अग्याराम परशराम मारवाडी रहाणार भिंडोळ दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार

पेशावर शहराला गेल्या मंगळवारीं सायंकाळीं आग लागली आणि ती आग बुधवारीं सकाळीं नऊ वाजे पर्यंत चालूंच होती चार हजार घरें जळून फस्त झालीं आणि एकंदर नुकसान चार कोट रुपया पेक्षां कमी नाहीं. अग्निनारायणाची केवढी ही अवकृपा! सर्व देशांत अशी आग पूर्वी कधीं लागल्याचें लोकांच्या आठवणींत नाहीं यंदाचें वर्ष मोठें भयंकर दिसतें!

बऱ्हाणपुरासही अशीच भयंकर आग गेल्या २८ वे तारखेस लागून ५०० घरें जळालीं. त्यांत जिनगीची हानी मोठी होऊन मोठ मोठाल्या हवेल्यां देखील जळाल्या. ईश्वरी कोपच होय.

पेशावर येथें उडालेली गडबड. सध्यां जिकडे तिकडे कांहीं ना कांहीं तरी गडबड चालली आहे. कलकत्यास प्लेगनें लोकांचीं मनें स्वस्थ नाहींत. मुंबई इलाख्यास सांडसातीनें घेरलेलें आहेच. मद्रासकडे प्लेगच्या तमविजीचे उपाय चालू आहेतच. वायव्य प्रांतात प्लेगच्या मारामाऱ्या होत आहेत व पेशावर येथें नुकतीच मात्र चमत्कारिक व ज्यांत अर्थ नाहीं अशी गडबड उडाली. गेल्या महिन्यांत त्या शहरांत हिंदूंनीं पूज्य मानलेल्या अशा स्त्रिया आल्या. यांना हे लोक देवीप्रमाणें पूज्य मानतात. या देवीस आणण्यास हिंदू लोकाचे थवेच्याथवे स्टेशनवर गेले होते. देवींना मोठ्या थाटानें त्यांनीं शहरांत आणलें तेव्हां हिंदु व मुसलमानांत व्यर्थ धुमश्चक्री सुरू झाली. यांत एका हिंदूस व मुसलमानास जबरदस्त जखमा लागून दोघेही दवाखान्यांत अत्यवस्थ स्थितींत आहेत. दुसरे दिवशीं मॅजिस्ट्रेट साहेबांनीं सर्वे वजनदार हिंदूस बोलावून आणून अशी ताकीद दिली कीं, मला डेप्युटी कमिशनर साहेबांकडून देवींस येथून काढून देण्याचा हुकूम आला आहे, तेव्हां तुम्ही त्यांना आजच्या आज येथून पाठवून द्या; नाहीं तर मी होऊन त्यांना हाकलून देईन. या पुढारी लोकांनीं या देवीला जाण्याविषयीं विनंती केली. पण गांवांतील आडमुठे लोक ह्यांना जाऊं देईनात व एक दिवस पेशावर येथील हिंदूंचीं सर्व दुकानें बंद होतीं. पुढें पाहतात तो ६० शिपाई व तीन युरोपिअन दत्त ह्मणून या देवी ज्या धर्मशाळेंत होत्या तिकडे गेले व त्यांणीं त्या देवींच्या भक्तांस कैद केलें; व देवींस स्टेशनावर नेऊन गाडींत बसविल्यावर बरेच शिपाई परत आले. ज्या ठिकाणीं ह्या देवींस पोंचावयाच्या आहेत तेथपर्यंत कांहीं शिपाई गेले आहेत. दुसरे दिवसापासून सर्व शहरांतील लोकांचा व्यवहार सुरळीतपणें चालूं लागला. सरकारास येवढ्याकरितां इतकी तयारी करण्याचें काय प्रयोजन होतें हें सांगणें फार कठिण आहे.

गेल्या वर्षांत ब्रह्मदेशांतील जंगलापासून ४० लाख रुपयांचा फायदा सरकारास झाला.

मळलेले कपडे धुण्याच्या कामांत साबूपेक्षां बटाट्याचा रसाचा फार उपयोग होतो.

स्पेनमध्यें लिनारेस येथें लोकांनीं दंगा केला. बारा दंगेखोर मेले व पन्नास जखमी झाले.

घाव पडल्याकारणानें किंवा चामडी सोलली गेल्या कारणानें होणारा रक्तस्राव त्यावर तांदुळाची पिठी लावतांच बंद होतो.

नामदार महाराणीसाहेब व्हिक्टोरिया यांच्या कारकीर्दीत इंग्लंड येथील लोकांवर दुप्पट कर वाढला. व व्यापार सातपट वाढला.

आजपर्यंत विलायतेहून लुगडीं येत नव्हतीं; तीं आतां येऊं लागलीं असून पोतांत हलकी आणि किंमतींत कमी अशीं असतात.

चीन देशाकडे येणें असलेली जपानची सर्व खंडणी इंग्लंडचे तिजोरींतून देण्यांत आली असल्यामुळें जपान सरकार वेहेवे वेट आमच्या सरकारचे स्वाधीन करणार आहे.

हिंदुस्थानावर स्वारी करण्यासाठीं एकट्या आफगाणिस्थानच्या मार्गावरच अवलंबून न रहतां चिनाच्या बाजूनेंही रस्ता काढण्याच्या तजविजीत रशिया आहे असें ह्मणतात.

कराची माफी—स्पेनसरकारानें आपल्या देशांत येणारा गहूं व तांदूळ ह्या धान्यांवरील कर माफ केल्याचें त्या सरकारच्यातर्फे प्रसिद्ध झालें आहे!

रशियानें नवीन संपादन केलेल्या पोर्ट आर्थर व टेलिवान बदरांत कोणत्याही परराष्ट्रीय मनुष्यानें पास घेतल्याशिवाय येऊं नये असें पेकिन येथील रशियन प्रतिनिधींनीं फर्माविलें आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांतील तालुकानिहाय असलेले सरकारी बुकडिपो बंद करण्याचा शाळाखात्यांतील मुख्य अधिकाऱ्यांचा ठराव बाहेर पडला आहे. ज्ञा० च०

एक नवीन मुद्रा यंत्र—या यंत्राच्या योगानें वर्तमानपत्रें व पुस्तकें फारच लौकर आणि फारच सुबक तऱ्हेनें छापतां येतात. सध्यांच्या छापखान्यांत एक एक खिळा घेऊन तो दुसऱ्याशीं जोडून शब्द बनवावा लागतो. नवीन यंत्र निघालें आहे त्यांत तसें कांहीं करावें लागत नाहीं. सध्यांचे काळीं कंपाझिटरचे कामांत जी मेहेनत व कौशल्य घालावीं लागतात, तशीं नव्या यंत्रांत घालणें अवश्यक नाहीं. ज्यास अक्षर ओळख नाहीं व अभ्यास नाहीं अशा मनुष्याच्या हातूनही उत्तम तऱ्हेची अक्षर जुळणी होते. ह्या यंत्राचे दोन भाग आहेत. सध्यांच्या छापखान्यांत एक पुडापुडाचें पाळें पाळें असतें. यास केस ह्मणतात. या केसींतील निरनिराळ्या पुडांत निरनिराळे खिळे ठेविलेले असतात. त्यांतून एक एक घेऊन त्यांच्या जुळणीनें शब्द बनविला जातो. परंतु नव्या यंत्रांत पियानोच्या पेटीसारखी व्यवस्था असते. पियानो किंवा वाजाची पेटी असते. तिच्यांतून सूर काढण्यासाठीं पट्या असतात त्या पट्याप्रमाणें भिन्न भिन्न अक्षरानें अंकित अशा पट्या या यंत्रांत असतात. पिआनोचे विवक्षित स्वर काढण्याचे वेळीं ज्या प्रमाणें त्या पट्या दाबायाला लागतात, त्याप्रमाणें विवक्षित अक्षरें विवक्षित शब्द बनविण्यासाठीं जुळविण्यास त्या पट्या दाबल्या ह्मणजे झालें. एक मोठा थोरला कागद या यंत्रांत घातलेला असतो. व त्या कागदावर बारीक सुईनें टोंचल्याप्रमाणें अक्षरें काढलीं जातात. अशा तऱ्हेनें त्या कागदावर छापण्याचा सर्व मजकूर टोंचला जाऊन गेल्यावर तो कागद या नव्या यंत्राच्या दुसऱ्या भागांत प्रविष्ट करून त्या यंत्रांतील दुसऱ्या एका छिद्रान्वित भागांतून त्यावर वितळविलेली टाईपाची धातु पाडली जाते. ही धातु अशा तऱ्हेनें पडते कीं, छिद्रान्वित कागदावरील सर्व अक्षरें धातुमय होतात. मग यंत्रसहायानेंच त्याजवर शाई वगैरे लागून छापण्याचे कागद हल्लींप्रमाणेंच जलद करितां येतें. छापण्याचें काम झालें ह्मणजे पुनः ते फर्म्याचे फर्मे वितळवितां येतात. एखाद्या ग्रंथाचे फर्मे तसेच ठेवावयाचे झाल्यास तसेही ठेवितां येतात. यूरोपांत इतक्यांत या यंत्राची प्रचाळना झाली असून पुष्कळ वर्तमानपत्रें या पद्धतीनें छापूंही लागलीं आहेत.

मादागास्कर बेटांत एक विचित्र झाड आढळण्यांत आलें आहे. हें सुमारे तीस फूट उंच असतें. व याचीं पानें चार फुटापासून सहा फुटापर्यंत लांब असतात. याचें फळ फारच मिष्ट असतें. परंतु प्रवाशाचें झाड असें यास ह्मणण्यास याचा मुख्य गुण यांतील पाण्याचा साठा होय. उन्हाळा कसलाही कडक असो—आणि या बेटांत तो फारच कडक असतो—यापासून स्वच्छ आणि गोड असें खूप पाणी निघतें. या झाडाच्या आसपास माणसें काम करीत असलीं, तर तीं पाण्यासाठीं कधीही नदीवर किंवा विहिरीवर जात नाहींत. एका प्रवाशानें आपल्या प्रवास वृत्तांत असें लिहिलें असें लिहिले आहे कीं, मी ही गोष्ट प्रथम ऐकिली तेव्हां तिच्या खरेपणाविषयीं संशय प्रदर्शित केला. त्याबरोबर माझ्या बरोबरीच्या एका तद्देशीयानें आपल्या हातचा भाला झाडाच्या पानाच्या देखांत मारला. तो चांगला पांच फूट आत गेला व बाहेर काढिताच त्याबरोबर स्वच्छ पाण्याचा प्रवाह बाहेर वाहूं लागला. तें झाड बहुतेक अंशीं केळीच्या झाडासारखें असतें. त्याचीं पानें मोठ्याशा ताडाच्या पंख्याप्रमाणें मोठी डौलदार असतात. प्रत्येक झाडाला कमींत कमी वीसपासून पंचवीसापर्यंत असतात. या झाडांचीं पानें नेहमीं हिरवींगार व टवटवीत असतात. क.

स्पेन व अमेरिका यांच्या दरम्यानची लढाई खरोखरी व्यापाऱ्यांचा फायदा करण्याकरिताच आहे असें ह्मणतात. स्पेन व अमेरिका यांचीच नव्हे, कोणतीही लढाई सुरू झाली कीं, अनेक प्रकारच्या व्यापाऱ्यांचा फायदा हा व्हावयाचाच. लढाईस लागणारें अनेक प्रकारचें सामान दोन्ही पक्षांच्या वखारींत ठवलेलें असतें असें नाहींच. लढाई करण्याचें ठरलें कीं, कमिसरी खात्याच्या दप्तरांत पडून राहिलेल्या हजारों जिनसांच्या नांवांच्या यादी भराभर बाहेर पडतात आणि त्याप्रमाणें एकदम खरेद्या सुरू होतात. लढाई किती जोराची होईल, किती दिवस चालेल किती फौज लढाईवर न्यावी लागेल वगैरे गोष्टी आगाऊ खात्रीपूर्वक ठरवितां येण्यासारख्याच नसल्यामुळें आधिच ससाच्या शिकारीस जातांना वाघाच्या शिकारीची तयारी करून जावें लागतें. ह्या सिद्धांत असल्यामुळें खरेद्या फार घाईच्या व फार मोठ्याही असतात, आणि त्यामुळें व्यापाऱ्यांस आपले खिसे भरण्यास फार चांगलें साधन होतें. कमिसरी खात्याची खरेदी सुरू झाली कीं, बाजारभाव दुपटी तिपटीनेंही वाढतो. तेव्हां स्पेन व अमेरिका यांच्या लढाईनचें व्यापाऱ्यांची चंगळ सुरू झाली आहे असें ह्मणावयास नको. अ०

श्रीमंत महाराज साहेब यांचे भाचे श्री. रा. रा. फुलाजीराव शेवाळे ज्यास हल्लीं पोलीस खात्यांत प्रोबेशनर नेमिलें आहे ते, श्री. रा. रा. संपतराव गायकवाड यांचे बरोबर वाघाचे शिकारीस बाहेर गांवीं गेले असतां त्यांचे पश्चात् त्यांचे वाड्यांतून रायसिंग गुलाबसिंग नांवाचे एका इसमानें सुमारें हजार बाराशें रुपयांचा ऐवज लांबविला. हा इसम पंचमहालांतील रहीश असून हल्लीं डभोई येथें राहत असतो. श्री फुलाजीराव हे जेव्हां शिकारीहून परत आले तेव्हां त्यांस आपली वरील झालेली चोरी समजून आली. व सदर इसमाचा वहीम आल्याकारणानें त्याचा तपास करण्या करितां ते आपले दोघे चौघे मित्रमंडळीसह ता. २१-५-९८ रोजीं डभाई येथें गेले, व रेल्वेवरील मुशाफर बंगल्यांत उतरले. ता. २२ रोजीं सकाळीं आठ वाजतां सदर रायसिंग ह्यास फुलाजीराव आल्याची खबर लागल्यावरून तो त्यांजकडे आला व आपण होऊनच ह्यांस कुशल प्रश्न करूं लागला. शेवटीं फुलाजीराव यांनीं आपलेकडील झालेले चोरी विषयीं त्यांस विचारतां प्रथमतः तो इनकार गेला. परंतु मागाहून कबूल झाला, व सांगूं लागला कीं, ही बातमी पोलीसास देऊं नका. तुमचा सर्व माल मजजवळ आहे तो मी तुमचा तुह्मास देईन. त्या वेळच्या सुमारास तेथील फोजदार ना. फौजदार व दुसरे पोलीस अंमलदार मिळून सुमारें आठ दहाजण आले होते. फुलाजीराव हे फौजदाराशीं कांहीं गोष्टी करण्याचे नादांत असतां सदर रायसिंगानें तेथें असलेल्या एका मुलकी शिपायाची तलवार घेऊन प्रथमतः त्याच शिपायाचे डोक्यावर वार केला, परंतु कर्मधर्मसंयोगानें त्या वारानें त्याच्या पागोट्याचे तुकडे तुकडे झाले. विशेष कांहीं जखम झाली नाहीं लागलीच त्या शिपायानें खून, खून अशी आरोळी करितांच रायसिंग हा दुसरे आवदमिया बिन अबदुल्ला नाम एका अरबावर चाल करून गेला व त्यास दोन वार केले व तो लागलीच, फुलाजीरावाचे दोघे मित्र रा. रा. हरिभाऊ काळे व रा. चिमणराव लिंबाळकर यांचे अंगावर चित्यासारखा चवताळून गेला, व आतां जोरानें त्यांचेवर वार करणार तोंच फुलाजीरावांनीं मोठ्या चापल्यानें व धैर्यानें पुढें सरून तो वार आपल्या हातांवर वरचेवर झेलला. व लागलेंच त्याचे कमरेस मिठी घालून त्यास जमिनीवर आदळलें तेव्हां त्यांच्यातलेच मित्रमंडळींनीं शिताफीनें काढून त्यास कबज्यांत घेतलें व कबज्यांत येतां येतां उजवा हात मोकळा असल्यामुळें ह्यानें आणखी एक वज्ररता वार केला तो नायब फौजदार यांस लागून त्यांचे हातांचें मांस बाहेर आलें व यांतून अनंत रक्त वाहिलें. फुलाजीराव यांनीं जो वार झेलला त्या योगें त्यांचे हातासही बरीच मोठी जखम झाली, व रक्तस्रावही पुष्कळ झाला. तसेंच आणखी त्यांचे हातांतील तलवार हस्तंगत करतांना बोटासही थोडीशी इजा झाली व गांडीसही एक घाव लागला. यावेळीं पोलीसाचे लोक सैरावैरां पळून गेले ते पुन्हः शांति होतांच जवळ आले. यावेळीं श्री. फुलाजीरावांनीं व त्यांच्या मित्रमंडळींनीं जर धैर्य वापरलें नसतें तर ह्या खुनी मनुष्यानें किती तरी मनुष्याचें खून केले असते त्याचा अंदाज करवत नाहीं. खुनी हा अंगानें धिप्पाड असून फार सशक्त आहे, असो. ईश्वरकृपेकरून एक मोठाच प्रसंग टळला ह्मणावयाचा. ह्या प्रसंगीं फुलाजीरावांच्या धैर्याची व शौर्याची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच. सदर मनुष्य हल्लीं पोलीसांचे ताब्यांत आहे. तेव्हां आतां रीतिप्रमाणें पुढें व्यवस्था होईलच. स. वि.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........ ८१ ०६

दुसरे खेपेस .... ...... ....८१

Six monthly........ 3 ............... 3 as

Single copy ............................4 as

Advertisemen

Below 10 lines ......2 R

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII | AKOLA MONDAY 13 JUNE 1898 | NO 23

वर्ष ३२ | आकोला सोमवार तारीख १३ माहे जून सन १८९८ इ० | अंक २३

नोटीस

रा. रा. गणेश परशराम पांडे रहाणार बाळापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आपण दोघे सखे बंधू आहोंत. त्या अर्थी वडिलोपार्जित सर्व जिनगीचे आपण सारखे भागीदार आहोंत. तुह्मी वडील आहांत व आजपर्यंत माझा आपल्यावर पूर्ण भरंवसा होता कीं आपण, मी जो आपला धाकटा भाऊ ह्याचें अकल्याण कधीं चिंतणार नाहीं. पण आतां तर अगदीं आपण माझ्या पोटावर पाय देण्यांस तयार आहां तसें दिसतें. आपल्या वडिलांच्या वेळची सुमोर २ हजार रुपयांची दुकान खामगांव मुक्कामीं होती ती एक दोन वेळां माझी संमत्ती न घेतां विकून टाकण्याचा घाट घातला होता. पण विकत घेणारानींच माझी विकण्याची इच्छा नाहीं असें पाहून विकत घेतली नाहीं. तरी ४।९ वर्षी खालीं मला न विचारतां ती दुकान आपण विकून पैसे घेऊन बसलांत. त्योवेळींच आपलें भांडण वगैरे होऊन निकाल व्हावयाचा पण मी गम खाल्लीं कीं जाऊं द्या, भावाभावांत तंटा बखेडा असणें चांगलें नाहीं आणि शिवाय बाळापूर मुकामीचे दोन नंबर ३२ व ३३ मी माझ्या वाटणींत घेतले व दुकान जशी तुह्मी घेतलीच आहे. असा विचार ठरून स्वस्थ बसलों. आतां वरील दोन नंबर जे मी आज २०।२२ वर्षे एकटा वहात आहे ते आपण दुसऱ्याला बटाईनें देऊन टाकली. पण तसें करण्यास आपल्याला बिलकूल अधिकार उरला नाहीं. आपण शेतें दुसऱ्याला दिली त्यास माझा विचार मुळींच नाहीं. हल्लीं ताबा माझा आहे तो मी देणार नाहीं. वडिलांचे जिंदगी पैकीं आपण दुकान घेतलेंच व माझ्या कडील शेतेंही घेऊन विल्हेवाट करण्याचा आपला विचार दिसतो. पण असें करणे बे कायदेशीर असून वडील बंधूस शोभत नाहीं. असो. आतां आपली मनें बिघडली. व ही शेतें माझ्याच वाट्याचीं उरलीं आहेत त्यावर आपला हक्क राहिला नाहीं, तर त्या शेताबद्दल जर आपण कांहीं कोणाशी देवघेव, गहाण बटाई कांहीं कराल तर मला माहित नाहीं. मला या संबंधी जर आपली गडबड दिसली तर आपल्यावर सरकारदरबार करावें लागेल, जास्त लिहिण्यात अर्थ नाहीं हेंच शेवटचे सांगणें आपल्यास कळावें तारीख ७ माहे जून सन १८९८ इ०

सही

बालाराम परशराम पांडे रहाणार बाळापूर दस्तुर खुद्द.

## जाहिरात

खालीं सही करणार याजकडून सर्व लोकांस असें जाहीर केले जातें कीं बाळापूर मुकामीं आमचीं दोन शेतें सर्वे नंबर ३२।३२ माझ्या वाट्याचे आहेत ते कोणीही गहाण, खरेदी, बटाईनें वगैरे कोणचेही तऱ्हेनें माझा भाऊ नामें गणेश परशराम पांडे, यांनीं दिल्यास घेऊं नये माझ्या भावाचा हक्क त्यावर उरला नाहीं. जर कोणी घेतले तर आह्मी त्याबद्दल जबाबदार नाहीं. नफा नुकसान ज्याची त्यास सोसावी लागेल. कळावें. तारीख ७-६-९८ इ०

सही

बाळाराम परशराम पांडे दस्तुर खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ वद्य १० शके १८१९

## वतनदार सभा.

वऱ्हाडांत वतनदार लोकांची सभा स्थापन होऊन बराच काल झाला; परंतु एवढ्या अवकाशांत या संस्थेस चांगलें स्वरूप यावयास पाहिजे होतें पण तें अद्याप आलें नाहीं हें वाचकांस सादर करण्यास आह्मांस फार दिलगिरी वाटते. वस्तुस्थिति हुबेहूब जशीची तशीच लोकांपुढें मांडतांना आमचा मुख्य उद्देश हा होय कीं या संस्थेच्या सभासदांनीं मोठ्या कळकळीनें बहु परिश्रम घेऊन आरंभिलेल्या कृत्यास उत्तम फलप्राप्ति होण्यासाठीं चांगल्या दशेस तिची मजल पोंहचवावी. वतनदार लोकांवर हिजनिमित्त बराच मोठा जबाबदारीचा बोजा आहे. कांहीं बाबी प्रत्यक्ष रीतीनें हिताहितावह आहेत, त्या खेरीज मागून येणाऱ्या पिढीची सर्व प्रकारें भिस्त हल्लींच्या जमेदार मंडळीवर आहे. तेव्हां फक्त स्वतांच्या कल्याणार्थ नव्हे पण आपल्या मुलाबाळांच्या कल्याणार्थ तरी वऱ्हाडांतील तमाम जमेदार लोकांनीं आपल्या कर्तव्यावर नीट नजर देऊन शक्त्यनुसार होईल तितकी या संस्थेस मदत करावी अशी आमची त्यांस प्रार्थना आहे. तिजला मान देणें सर्वस्वी त्यांच्यावर सोपविणें भाग आहे ही सभा सध्यां अस्तंगतच आहे. तिचा उर्जित काळ व्हावा आणि तिच्या द्वारें आमच्या वतनदार मंडळीला सरकार दरबारांत व व्यवहारांत चांगलें स्थैर्य मिळावें ह्मणून आह्मी १८९१ सालीं कांहीं सूचना केल्या होत्या. त्या सूचनांची पुनरुक्ती आज आह्मी मुद्दाम करीत आहों तर त्याकडे वतदार लोकांनीं लक्ष पुरविलें तर फार नामी होईल.

प्रथम, वतनदार सभेचें अस्तित्व चिरकाल राहण्या साठीं कायमचें भांडवल उभारलें पाहिजे. अद्याप भांडवल नांव देण्या सारखीच कांहींच रकम ज्मा नाहीं. पैशावांचून कोणत्याही संस्थेत स्थैर्य येत नाहीं. चिरस्थायि सभा झाल्या वाचून तिचे हक्क व अधिकार कोणीही जुमानणार नाहींत. सरकारी न्यायकोर्डतांतून हजारों रुपयांचा फडशा होतो त्या ऐवजी सभे प्रीत्यर्थ कांहीं रकम गोळा झाल्यास फार मोठा फायदा होण्या सारखा आहे. आह्मांस अशी उमेद आहे कीं कांहीं दिवसांनीं वतनदार सभेचें एक निराळे पोटन्याय खातें स्थापित होईल व जमीनदारी संबंधानें सर्व खटले सर्व मान्य अशा खाजगी न्यायासना पुढें येतील व पक्षकारांस माफक खर्चात इनसाफ मिळेल. वतना संबंधी हक्क सभेच्या मार्फत मागणें सुलभ व सयुक्तिक दिसेल आणि मागणें कितपत रास्त आहे याबद्दल सरकारास सभेचें वजन व इभ्रत यांचें मान पाहून योग्य रीतीनें व विचार पूर्वक मनन करावें लागेल.

दुसरी सूचना सभेच्या ठरावा संबंधानें आहे. प्रस्तुत असलेल्या सभेच्या कामांच्या टिपणा वरून लक्ष्यात येईल कीं सभे पुढें मोठ्या महत्वाचे प्रश्न अद्याप येऊं लागले नाहींत. फार किरकोळ गोष्टींचाच सध्या विचार चालत असतो. मध्यंतरीं मात्र पाटील पटवाऱ्याच्या नियमासंबंधानें चांगली चळवळ उडाली होती व वतनदार सभेनें बऱ्याच जोरानें आपला कार्यभाग साधला. आमच्या मतें मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे सभेनें सांप्रतच्या वांटणीच्या व भाऊबंदकीच्या पद्धतीस होईल तितका प्रतिबंध केला पाहिजे. इंग्रजी गोष्टी कांहीं उचलण्या सारख्या आहेत. त्यात ज्येष्ठ पुत्रास वारसाचे पूर्व व सर्व हक्क देण्याची रीत पहिली आहे. आणि त्या रीतीचे अनेक कायदे असून विलायतेंतील जमेदार लोक पूर्ववत सुखी व श्रीमान आहेत व मोठमोठीं घराणीं हा कालपर्यंत चांगलीं भरभराटींत आहेत. ह्या पद्धतीचें अनुकरण एकदम होणें फार कठीण जाईल तरी तिला अनुसरून दोन दोन किंवा तीन तीन पिढ्यापर्यंत मालमत्ता अविभक्त राखण्या करितां वेळोवेळीं ठराव सभेमार्फत होत जावे. सरकारांतूनही सभेनें आपल्या नव्या पद्धतीस मंजुरी मिळवून वतना संबंधानें नवीन कायदा करून मागावा. वांटणीचा कायदा बंद झाल्यानें एक उत्तम सुधारणा होऊन जमीनदारीस क्षयकारक कारणाचा मोड होईल. पुढील वंशजांस फार सुखावह अशी ही सुधारणा असून एक प्रकारें आळशी लोकांस चांगले शिक्षण लावून देण्या जोगी आहे. थोर वतनदारांच्या कुळांतील लोक फार आळशी व निरुद्योगी असतात. जमिनीच्या उत्पन्नावर ते व त्यांचीं मुलें बाळें खुशाल समाधानानें आयुष्य घालवितात. असल्या आळशांच्या माहेरी राहणाऱ्या लोकांस वांटणीचा कायदा बंद झाल्यानें आपापल्या श्रमावर उदर निर्वाह करावा लागेल.

तिसरी सूचना सभेच्या अधिकाराचा व्याप्ती संबंधानें आहे. राष्ट्रीय सभा काय काय मागण्या करीत आहे याचा विचार केला ह्मणजे आपणांस लोकनियुक्त संस्थांची अवश्यकता कळून येते. त्याचप्रमाणें वतनदार सभेचे सभासद सर्व वतनदार असून त्यांनीं आपल्या मधील विद्वान, अनुभविक, व न्यायी अशा मंडळींची पोट न्याय शाखा काढून त्या पुढें वतनदारी संबंधाच्या सर्व बाबींच्या खटल्याचे निकाल करून द्यावे आणि ते निकाल प्रत्येकानें मान्य करण्याचें अभिवचन दिलें पाहिजे. विशेष कांहीं बळवत्तर कारणासाठीं सरकारी कचेऱ्यांची पायरी चढणें भाग पडलें तर ती एक गोष्ट निराळी परंतु बहुतकरून साधारण प्रतीची व फार भानगडीची नसलेलीं प्रकरणें सभेनें आपल्या आंगावर घ्यावीं ही गोष्ट प्रथम सुसाध्य वाटणार नाहीं तरी सभेनें आपल्या सभासदां पैकीं कांहीं जणांस कामदार नेमून या सुधारणेस हात लावला पाहिजे. परंतु अशा गोष्टी पैशाच्या जोरा वांचून होणार नाहींत व क्वचित् प्रसंगीं कांही भाग अंमलांत आणल्यासही ती व्यवस्था सभेच्या स्थैर्या शिवाय उत्तम प्रकारें निभणार नाहीं या सूचनेचें महत्व सरकारी कोडतांतून वादी प्रतिवादी होऊन उभे राहण्याची ज्यांस संवय पडली आहे त्यास ताबडतोब कळून येईल. स्टांप रजिस्टर, वकिलीची फी, साक्षीदारांचे भत्ते व सरकार दरबारची पायरी चढून तिचा शेवटचा निरोप घेईपर्यंत लागणारा अवांतर खर्च भागविण्या करितां केवळ लहानशा जमिनीच्या तुकड्या साठीं घरादारावर तुळशीपत्र ठेवण्याची वेळ कित्येकांवर बेतल्याचें आह्मी पाहिलें आहे. सरकारी कायद्यास तोडजोड ह्मणून कांहीं माहित नसेत. एक पक्ष सफा बुडतो व दुसरा विजयी झाला तरी मोठ्या दुर्दशेला जाऊन पोचतो. सरकारापुढें घरगती कलागती नेल्यानें वरील तोटे सोसून शिवाय मनास सदोदित त्रास व काळजी वाहावी लागते आणि चिंता मनुष्याच्या मागें लागली ह्मणजे त्याची यमधर्माकडे तयारी होत असते हें सर्वश्रुत आहेच. तिसरा प्रकार फार नाजूक आहे. भाऊबंदकीच्या खटल्यामुळें ईश्वरी संकल्पासही मोठा बाध येतो. वांटणीची पद्धत अंमलांत असल्यामुळें व वांटण्या संबंधानें व इतर कांहीं संबंधानें वाद उत्पन्न झाल्यामुळें आप्त सोयरे शत्रूहूनही फार हेवी होतात. बहीणभाऊ, आईबाप, आप्त मित्र इत्यादिकां मधील प्रेमबुद्धि व पूज्यभाव ल्यास

जाऊन प्रत्येकजण दुसऱ्यास पाण्यामध्यें पाहूं लागतो हे सर्व संपत्तीचे खेळ आहेत. पाठीला पाठ लावून येणारे भाऊ असें भांडतात कीं त्यांच्या मध्यें सुयर सुतका शिवाय कांहींएक ऋणानुबंध उरत नसतो. या सर्व प्रकारच्या विघ्नकारक गोष्टींस नर तीन सूचना दाखल केल्या आहेत त्यांचे सर्व वतनदार लोकांनीं योग्य मनन करण्याची मेहेरबानगी करावी.

चवथी सूचना वतनदारांच्या हक्का विषयीं आहे. इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून कर्नल नेंनार्ड साहेबांच्या कारकिर्दींत जमेदारी संबंधानें सरकारी अंमलदारांची पुष्कळ खलबतें झालीं आहेत आणि त्यांच्या परिणामीं वतनदार लोकांचें लहान मोठें बरेच हक्क व उत्पन्नाच्या बाबी अजिबात बंद झाल्या आहेत हें आह्मांस पक्कें स्मरत आहे. तेंव्हां अंमल फार करून लष्करी धर्तीचा असल्यामुळें व जमेदार मंडळींत प्रमुख होऊन सरकारच्या ह्मणण्यास प्रतिबंधक करणारे बरेच लोक न मिळाल्यामुळें हा कालपावेतों हिरावून घेतलेल्या हक्का संबंधानें बोभाटा कोणी जोरदार रीतीनें केला नाहीं व निजाम सरकारशीं हिंदुस्थान सरकारनें केलेल्या तहनाम्याच्या अटी व शर्ती सरकाच्या हातून पाळविण्या साठीं कोणी जबरदस्त प्रयत्न केला नाहीं व ज्याकोणी थोडे जणांनीं हातपाय हालविले त्यांस इतर जणांची योग्य कुमक न मिळाल्यामुळें उलटे त्यांचें मात्र जन्माचें नुकसान झाल्याचीं उदाहरणें आमच्या डोळ्या समोर आहेत. अडगांवचे प्रसिद्ध देशपांडे कैलासवासी आप्पासाहेब या उदार साधु पुरुषाची आठवण करून दिली ह्मणजे आमच्या ह्मणण्यास निराळा साक्षी पुरावा नको. जमेदार मंडळीच्या संबंधाची माहिती त्यांच्या घराण्यांत भरपूर सांपडेल व खुद्द आप्पासाहेब यांनीं कलकत्यापर्यंत मजला पोंचवून कांहीं गाऱ्हाणी सरकाराकडून दूर करवलीं आहेत. परंतु एकट्याचा प्रयत्न व आयुष्य हीं कितपत टिकाव धरणार व तशांत कमिशनर, रेसिडेंट इत्यादिकांच्या दरबारांतल्या सहस्त्रावधि भानगडी पुढें जमेदारीच्या प्रकरणाची दाद कितपतशी लागण्याची आशा आह्मांस असते, ही गोष्ट अद्याप कोणींही हातपाय सुद्धां हालविले नाहींत या वरून दिसून येईल. सारांश, वतनदार सभेनें अडगांवकर देशपांड्यांनीं आरंभिलेलें काम एकं दरीनें हातीं घ्यावें ह्मणजे त्यांच्या कामास चांगली शिस्त लागून एक मोठा यशाचा माग उचलल्याचें श्रेय येईल. अशा कार्यानें सदर्हू देशपांडे मजकूर यांस मोठा अभिमान वाटून परम आनंद होईल आणि जमीनदार लोकांचें मोठें कल्याण होऊन एक सबळ निराळा उद्योग आरंभल्या सारखें होणार आहे.

आह्मी वर आपले निरनिराळे अभिप्राय प्रदर्शित केले आहेत त्यां पैकीं कित्येका संबंधानें पुष्कळ जणांस नवल वाटेल परंतु आमच्या ह्मणण्या प्रमाणेंच चांगल्या वयोवृद्ध सूज्ञ गृहस्थांचें मत आहे. आणि त्या शिवाय मद्रास कडील जमीनदार लोकांनीं बऱ्याच प्रकारच्या गोष्टींत अनेक सुधारणा करण्याचें योजिलें आहे व त्यांनीं आपल्या कामास मद्रास सरकारची मदत मागितली असून त्या प्रमाणें सरकारांतून त्यांच्या ह्मणण्यास योग्य मान मिळेल असा अंदाज आहे. वऱ्हाडांतीलही वतनदार सभेनें सबडी प्रमाणें यथाशक्ति आपल्या कामास चांगलें वळण लावून हळूं हळूं वर निर्दिष्ट केलेल्या सुधारणा प्रचारांत आणण्यास मनोभावें झटावें एवढी आमची आ सभेस विनंती आहे.

---

√वऱ्हाडांत सहा जिल्ह्यांचे सहा तुरुंग आहेत; त्यांत पूर्व वऱ्हाडांत उमरावतीचा तुरुंग मुख्य असून पश्चिम वऱ्हाडांत आकोल्यात मुख्य तुरुंग आहे. साध्या तुरुंगांत ६०० पर्यंत कैदी राहतात व ६०० पेक्षां अधीक कैदी मुख्य तुरुंगांत राहतात. या शिवाय शिकंदराबादेचा तुरुंग सर्व प्रकारच्या व्यवस्थेसाठीं वऱ्हाडांतच सामील केलेला आहे. या प्रांतांत दुष्काळाचें स्वरूप उग्र होतें आणि त्याचा परिणाम १८९७ सालच्या प्रत्येक वार्षिक रिपोर्टांतील हकिकतीमध्यें दिसून येतो. १८९७ सालच्या तुरुंग खात्यांच्या रिपोर्टांत दुष्काळाच्या परिणामाचें कथानकच मुख्य आहे. तुरुंगांत कैदी पुष्कळ आले, व एकंदर खर्च अतीशय वाढला या दोन गोष्टी चटकन रिपोर्ट वाचतांना लक्ष्यांत येतात. १८९६ सालीं ४०६० नवीन कैदी आले होते त्या ठिकाणीं १८९७त ७९१३ कैदी नवीन आले ह्मणजे सरासरीनें दुपटी जवळ जवळ प्रमाण नवीन कैद्याचें आलें. वर्षाच्या प्रारंभीं १९३९ कैदी शिल्लक होते. त्यात ७९१३ नवी भर पडली पण ७६२२ कैदी नानाविध कारणामुळें कैदेंतून मुक्त झाले तेंव्हा साल अखेरीला १८२६ कैदी एकंदर शिल्लक होते.

१८३७ सालीं सर्व तुरुंगांत कैद्यांची गर्दी फार झाली होती. त्यांस नीट व्यवस्थेनें ठेवण्याला तुरुंगांत पुरेशी जागा नव्हती व नीट व्यवस्थाही होण्यासारखी नव्हती परंतु तुरुंगावरील सुपरिंटेंडंटांनीं आपलें काम उत्तम प्रकारें बजावलें व उभें वर्ष कसें तरी नीटपणें घालविलें. १८९६ सालीं हिंवाळ्यांत दुष्काळाचा तडाखा सुरूं झाला तेंव्हां पासून धान्याच्या चोरीचे खटले पुष्कळ वाढले, लोकांची दैना फार जबर झाली आणि त्यांस कोठेंही थारा मिळेनासा झाला तेंव्हां तुरुंगांत आश्रय मिळावा ह्मणून गोरगरीब लोक चोऱ्या बेधडक करूं लागले. त्यावेळीं कारागृहवास मिळण्याला देखील मोठा प्रयास पडत असे. सामान्य चोरीच्या अपराध्याला फटक्याची शिक्षा देऊन सोडीत असल्यामुळें तुरुंगवासाच्या सुखासाठीं दरवडा घालावा लागत असे. दुष्काळामुळें तुरुंगांची भिति नष्ट झाली होती आणि तुरुंगांत भाकरीसाठीं जावें लागलें तरी कोणाची कोणास लज्जा वाटत नसे. ही शोचनीय स्थिती गुदस्तां लोकांस मोलमजुरी मिळून हंगामाचा वक्त सुरूं होई पर्यंत चालूंच होती. इन्स्पेक्टर–जनरल कैद्यांच्या गर्दी संबंधानें लिहितात कीं डायमंड जुबिलीच्या निमित्तानें ३२३ कैद्यांस सोडून देण्यात आले त्यामुळें पुष्कळ जागा मोकळी झाली, बायकांस कैदेंत ठेवण्याच्या स्वतंत्र व्यवस्था मोडून त्यांस आकोल्याच्या किंवा उमरावतीच्या तुरुंगांत नेलें, दिवाणी तुरुगांत फौजदारी कैद्यांस कोंडण्यांत आलें आणि निरनिराळे नवीन वार्ड केले व केव्हां केव्हां तंबूही दऊन कैद्यांची सोय करावी लागली. या नामी व्यवस्थे बद्दल सर्व सुपरिंटेंडेंटांचे इनस्पेक्टर जनरल यांनीं आभार मानले आहेत.

खरोखर गुन्ह्याकडे प्रवृत्ती नसून दुष्काळा मुळें जे कैदखान्यांत पडले असेच लोक पुष्कळ होते. १८९६ सालीं इलिचपूर, वाशिम व बुलढाणा येथें लोकसंख्येच्या मानानें कैद्यांचें प्रमाण अगदी लहान होतें तेंच प्रमाण १८९७ सालीं फार वाढलें असून त्याची कल्पना खालील आंकड्या वरून चांगली येईल.

| जिल्हा | दहा हजार लोकसंख्ये मागे कैद्यांची संख्या |
|---|---|
| इलिचपूर | २९ |
| बुलढाणा | २२ |
| वाशिम | २१ |
| इतर जिल्हा | १९ |

१८९७ सालीं ३०७८ कैदी तुरुंगांत गेले त्यापैकीं २०५९ लोक शेतकामावर उदरनिर्वाह करणारे असे होते. शेतकरी लोकांची संख्या वऱ्हाडांत शेंकडा ७८ प्रमाणानें आहे आणि त्यांच्या पैकीं एवढी मोठी संख्या तुरुंगांत होती ही गोष्ट अत्यंत शोचनीय आहे.

१८९७ सालीं कैद्यांची गर्दी असूनही तुरुंगांची व्यवस्था चांगली होती. त्यामुळें कैदी कोणी पळून गेले नाहींत किंवा तुरुंगांतील शिस्त न पाळल्यामुळें शिक्षाही फारशा झाल्या नाहींत. इनस्पेक्टर जनरल ह्मणतात कीं वाशिम, इलिचपूर, व यवतमाळ येथील तुरुंगांत व्यवस्था कच्ची असावी आणि ह्मणूनच कैद्यांस योग्य शिक्षा झाल्या नसाव्या असा खरा प्रकार दिसत आहे.

कैद्यांस ओळखून काढण्यासाठीं त्याच्या डोक्याचें, हाताचें वगैरे माप घेत असत. ही पद्धत बार्टेलिन साहेबानीं प्रथम काढली होती परंतु ती वऱ्हाडांत बंद करण्यांत आली आहे. अंगुष्ठमुद्रा कागदावर उमटविण्याची नवी पद्धती अलिकडे प्रचारांत आली आहे. तिचाच उपयोग वऱ्हाडांतील तुरुंगांत चालूं केला आहे.

तुरुंगखान्या निमित्त एकंदर खर्च रुपये १,२७,२९८--९ आणे असून त्यापैकीं तुरुंगांतील नाना कारखान्यांच्या कामांचें उत्पन्न वजा जातां सरकारला या खात्यानिमित्त एकंदर नक्की खर्च रुपये १०१७४२--१ आणा आला. मुख्य खर्च पोटगीचा असून तो महर्गतेमुळें अतिशय वाढला. आणि तसेंच कैदी पुष्कळ झाल्यामुळें तुरुंगांतील कांबळ्यांचा पुरवठा कमी पडला ह्मणून बाजारांत नवीन कांबळीं बरीच विकत घ्यावीं लागलीं.

उमरावतीस एकच मुख्य तुरुंग करण्याचा विचार होता पण त्यासाठीं पांच लक्ष रुपये खर्च येईल आणि फंडाची सोय नाहीं ह्मणून आकोल्याचा मुख्य तुरुंग न मोडतां उमरावतीस व आकोल्यास नवीन आवश्यक सुधारणा करण्याचा बेत आतां पक्का ठरला आहे. उमरावतीच्या तुरुंगांतील छापखान्याचें काम या सालीं चांगलें फायदेशीर झालें. अलिशान रेसिडेंट साहेबांच्या मनांतून हैदराबाद येथील छापखाना उमरावतीस आणावयाचा आहे. तसेंच ४७ कैदी काळ्यापाण्याचे शिक्षेचे आहेत. पण प्लेगाच्या आजारामुळें मद्रास सरकारनें त्यांस अंदमान बेटांत नेण्याचें नाकारलें होतें पण त्यांस लवकरच काळ्यापाण्यावर पाठविण्यांत येईल. अलिशान रेसिडेंटांनीं मि. डाक्टर लिटल, रो, शार्मन, व मारिसन आणि इनस्पेक्टर जनरल यांचे त्यांच्या उत्तम व्यवस्थेबद्दल आभार मानले आहेत.

---

'युरेशिअन' हा शब्द युरेशिअन मंडळीस देखील मोठा कर्णकटू वाटतो. हा शब्द इतका उपमर्दाचा त्यांस वाटतो कीं तो शब्द व्यवहारांतून काढून टाकण्याची युरेशिअन मंडळीनें खटपट चालविली आहे. ही मंडळी उत्तरोत्तर खालावत चालली आहे. यांस साहेब लोकांची ऐट असते आणि त्या ऐटीच्या खालीं त्यांचा चक्काचूर होत आहे. विद्येनें ही मंडळी मागसलेली आहे, व सांप्रतच्या जीवनकलहांत त्यांचा निभाव बरोबर लागत नाहीं. त्यांस मदत करण्यासाठीं मुंबई, मद्रास, कलकत्ता, अलाहाबाद येथे निरनिराळ्या सभा आहेत. त्या सभांस युरोपिअन लोकांचीही मोठी मदत आहे. परंतु 'युरेशिअन' ही उपसंज्ञा त्या प्रत्येक सभेच्या मागें आहे. या उपसंज्ञेचा इतका तिटकारा आला आहे कीं, त्या सभांचीं नांवें बदलण्याचा प्रयत्न जारीनें चालू आहे. गेल्या मेच्या ३० वे तारखेला अलाहाबादेस एक सभा नामदार न्यायमूर्ती नाक्स यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्यावेळीं युरेशिअन हें नांव काढून टाकण्या संबंधानें सूचना आली होती. सध्यां ही सूचना तहकूब राहिली आहे. 'युरेशिअन' ह्मणजे युरोप व इंडिया या दोन ठिकाणच्या आईबापापासून झालेली प्रजा होय. असा जरी व्यवहारिक अर्थ आहे तथापि उपरोधिक लक्षणानीं हा शब्द नीच कुल, जातीची भ्रष्टता, इत्यादि वाईट वाईट अर्थाचा द्योतक झाला आहे. ह्मणून सुस्थितींतल्या युरेशिअन लोकांस आपला युरेशिअनपणा लपवावा असें वाटतें. हा लपवालपवीचा प्रकार युरेशिअन शब्दच रद्द करण्याच्या मजले पर्यंत पोंचला आहे. युरेशिअन शब्दावर रागावून कांहीं उपयोग नाहीं. शब्दाचा अर्थ हीनत्वाला पावला याचें कारण युरेशिअन मंडळीचें वर्तनच होय. मि. दादाभाई नवरोजी यांस 'काळा' माणूस ही पदवी अपमानकारक वाटली नाहीं. लार्ड सालिसबरी साहेबांस 'काळा' माणूस फार हलका वाटला पण जगांतील राष्ट्रांनीं 'काळा' मनुष्य इतका निंद्य ठरविला नाहीं तों पर्यंत आह्मांस 'काळा' या शब्दाची खोड मोडण्याची युरेशिअन मंडळी प्रमाणें पाळी येणार नाहीं अशी आह्मास बळकट आशा आहे.

---

सन्मानार्थ लोकसेवा करण्याची हौस फार थोड्या लोकांस असते पण ती लोकसेवा सरकारी अधिकारानीं मंडित होण्याची असेल तर मात्र पुष्कळांच्या उड्या तशी लोकसेवा करण्याकडे असतात. अधिकारसंपन्न लोकसेवेला स्वतांची लायकी किंवा गैरला-

यकी आहे हें पाहण्याकडे देखील मनुष्य वळत नाहीं. असा विलक्षण उतावीळपणा वर्तनांत वारंवार दिसून येतो. आह्मी वर निर्दिष्ट केलेल्या लोकसेवेचा प्रकार ह्मणजे स्पेशल माजिस्ट्रेटी किंवा आनररी दिवाणी न्यायाधीशपणा होय. अशा सन्मानाच्या लोकसेवेचे आणखी कांहीं प्रकार मुनसिपालिटी व जिल्हा बोर्ड यांतील अधिकारी मंडळीमध्यें दिसून येतात. सन्मानार्थ जी लोकसेवा करावयाची असते ती पगारी मामलतीपेक्षां अधीक दक्षतेनें बजावली तरच ती लोकादरास विशेष पात्र होते.

दिवाणीचा न्यायाधीशपणा सुखवस्तु गृहस्थाकडे सन्मानार्थ देण्याची वहिवाट वऱ्हाडांत नाहीं. फक्त स्पेशल माजिस्ट्रेटीचा अधिकार कांहीं कांहीं ठिकाणीं दिलेला असतो. परंतु हा अधिकार एक वेळ दिला ह्मणजे तो जन्मभर चालतो असा आजपर्यंत समज होता. परंतु कारंजास स्पेशल माजिस्ट्रेटचे अधिकार दोन गृहस्थांचे नुकतेच काढून घेतल्यामुळें तो समज दूर झाला. जशा मुनसिपालिट्यांतून व बोर्डांतून तीन तीन वर्षांनीं नेमणूका होतात त्या प्रमाणें माजिस्ट्रेटचे अधिकार तीन किंवा पांच वर्षां पुरते द्यावेत आणि अशा व्यवस्थेनें गांवोगांवच्या थोर, कुलीन, व घरंदाज मंडळींचा सरकार मार्फत सन्मान होत जाईल, त्यांस लोकसेवेची अभिरुची लागेल आणि सरकारी कामाचा बोजा देखील कमी होईल. अशा प्रकारची सुधारणा मद्रास सरकारनें केली आहे आणि ती इतर प्रांतांतून अंमलांत आणण्या सारखी आहे. वऱ्हाडांत दिवाणी कोर्टांचे अधिकारही देण्याचा परिपाठ पडेल तर फार नामी होईल. रावसाहेब, रावबहादूर इत्यादि पदव्यांचा जसा खजिना आहे तसें हा दिवाणी व फौजदारी कोडताचा अधिकार देण्याचें भांडार आहे. लोकसेवा करून घेऊन सुखवस्तु शिष्ट लोकांचा सन्मान करण्याचा दुसरा उपाय फार चांगला आहे; आणि तो पंचवार्षिकी किंवा तसाच नियमित वर्षांचा ठरविल्यास सरकारला अत्यंत सोयीवार पडेल. मद्रास सरकाराप्रमाणें आमचें स्थानिक सरकार या प्रकरणांत कांहीं उपयुक्त खटपट करील अशी आह्मी उमेद बाळगतों.

# The Berar Samachar

MONDAY, JUNE 13 1898.

Cheap loans by way of Tukkavai advances will now be most useful to the agriculturists of limited means. They are not wanted to improve land, to sink wells or to bring waste land under cultivation. They are required because a large number of people in the ordinary run of life have not money enough to follow their annual profession of agriculture. Many people live much below the general standard of comfort and competency and are not above want inspite of their frugal ways and hard economy. This is the time when the work in the field is in its full swing. Cattle, seed, and agricultural implements are the order of the day; and funds are urgently required to satisfy these demands. There is no way to shuffle off these demands; a peasant must have them all if he wishes to earn his year's bread. In these sowing times, agriculturists have to borrow to a great extent small loans at a heavy interest. They have before their eyes a golden prospect of the next harvest and in order to reap that prospective harvest, they think that money in hand is worth four times its value. They run any risk of interest and borrow money from their usual money—lenders. In this extreme anxiety the general masses ill consult their own interests and run in large debts over head and ears. They are already indebted and their debts rise by leaps and bounds in the days of hard pressure. Such loans carry away the practical earnings of the next harvest. An agricultural bank is most needed to afford a helping hand to the sinking agriculturists. There is no bank available and with little prospects we can hope for its establishment in the near future. Under these circumstances it is incumbent upon the State to help the ryots with small loans at a moderate rate of interest. A help in time will save people from the clutches of the Sowkars. It will go a long way to secure to them the fruit of their labour, and to strengthen their hands to provide for the emergencies of the next year in a great or small measure. The rules of the Tukavai advances should be re-modelled. The objects of these loans should be enlarged and made com—prehensive so as to bring the present demands of cattle, seed and implements in the category of those objects. This is the only way in which the Go—vernment can afford help to the ryots. The rigour of the law should be lessened, and the procedure should be made rather easy, quick and prompt in the despatch of work. This course is of course within the reach of the Government who are the real and sole land—lord. The treasury of the state is enriched to a vast extent by the revised assessments: and when the ryots are crushed to pay them it is but proper to utilize the very funds towards improving the general lot of the people. We hope that our request will not fall flat upon deaf ears; and it is but opportune that the greatest land—lord should see that his tenants for the next thirty years are well off to maintain a satisfactory competency of living. To the Government the ryots is like a milch—cow and it is] prudent statesmanship to preserve the cow in full vigour and health. If this appeal finds favour with the local government even in a slight measure we shall be highly obliged to them for the benevolent turn their policy will receive in these times of re-action and co-ercion.

---

Lord Salisbury was very plain and eloquent when he graphically des—cribed the other day the 'coming struggles for territory.' This des—cription will apply to the whole course of history because it generalizes the main springs of action which have been moving the world from its very beginning. We invite our readers to digest well this portion with a view to find out the state of their contry in the light of the living and dying nations of the world as portrayed in the following passage we quote below:—

"If we could look simply upon the world as it presents itself to us; if we could merely count our possessions and our growing enormous trade, we might, indeed look forward to the future without disquietude. We know that we shall maintain against all-comers that which we possess, and, we know, in spite of the jargon about isolation, that we are amply competent to do so (much cheering.) But that will not secure the peace of the world. You may roughly divide the nations of the world as the living and the dying. On one side you have great countries of enormous power growing in power every year, growing in wealth, growing in dominion, growing in the perfection of their organisation. Railways have given to them the power to concentrate upon any one point the whole military force of their population, and to assemble armies of a magnitude and power never dreamt of in the generations that have gone by. By the side of these splendid organisations, of which nothing seems to diminish the force and which present rival claims which the future may only be able by a bloody arbitrament to adjust—by the side of these there are a number of communities which I can only describe as dying. Decade after decade they are weaker, poorer, and less provided with leading men or institutions in whom they can trust, apparently drawing nearer and nearer to their fate, and yet clinging with strange tenacity to the life which they have got. In them misgovernment is not only not cured, but is constantly on the increase. How long this state of things is likely to go on of course, I do not attempt to prophesy. All I can indicate is that the process is proceeding, that the wead States are becoming weaker, and the strong States are becoming stronger. It needs me to enter into no detail and to attempt no speciality of prophecy to point out to you what the inevitable result of that combined process must be. For one reason or for another—from the necessities of politics, or under the pretence of philanthropy—for one reason or another, the living nations will gradually encroach on the territory of the dying, and the seeds and causes of conflict amongst civilised nations will speedily appear. Of course, it is not to be supposed that any one nation of the living nations will be allowed to have the profitable monopoly of curing or cutting up these unfortunate patients. (laughter)—and the controversy as to who shall have the privilege of doing so, and in what manner he shall do it—these things may introduce causes of vital differences between the great nations whose arimies stand opposite threatening each other. Undoubtedly we shall not allow England to be at a disadvantage in any re-arrangement that may take place (cheers). On the other hand we shall not be jealous if desolation and sterility is removed by the aggrandisement of a rival in regions to which our arms cannot extend. But, be that as it may, it is only another ground for me to implore you not to imagine that the time has gone by when the spirit of the lesson preached by the Primrose League is less necessary to the health and security of this country. Your task is ever living and it never was more important, as is indicated by the threatening circumstances of the world outside to which I have alluded. It will then be for the advantage of England and for the advantage of the world that England should be animated by a spirit of courage, of resolution and of justice, and if she is so she will owe it much to following the counsels and giving strength to the organisation which has been presented to her by the Primrose League (loud cheers during which the noble Marquis resumed his seat)."

## वऱ्हाड

हवामान-- सर्व प्रांतभर मृग नक्षत्राचा पाऊस थोडा बहुत पडला. चांगला जोराचा पाऊस येण्याचीं चिन्हें रोज असतात मनस्वी उकडतें, हवेंत थोडाथोडा थंडावा येत चालला आहे. रोगराई ह्मणण्या सारखी कोणतीच नाहीं- सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे.

मुनशी अजिजुद्दीन असि० कमिशनर हे आपल्या बदलीच्या जागीं इलिचपुरास जाण्या साठीं गेल्या गुरुवारीं येथून रवाना झाले.

लेफटेनंट टी. सी. प्लौडन असि० कमिशनर यांस सहा महिन्यांची स्पेशल रजा दिली आहे.

मि० मिरझा इमामबेग चीफ कानस्टेबल अकोला यांजवर खोट्यां साक्षीचा आरोप येऊन पहिल्या कोर्टांत शिक्षा झाली होती परंतु आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो कीं सेशन कोर्टानें त्यांस निर्दोष ठरवून सोडून दिलें.

मि. मिरझा सफदर अलीबेग ए० असि० कमिशनर यांची रजा संपल्या नंतर त्याची नेमणूक इलिचपुरास करण्यांत आली आहे.

रा. रा. नारायणसिंग माधोबा व प्रयागजी लीलाधर यांस कारंजाच्या हद्दींत स्पेशल माजिस्त्रेटीचे अधिकार देण्यांत आले होते ते काढून घेतले.

मि० ए० इलियट सेशन जज्ज हे विलायतेस सहा महिन्यांच्या फर्लोवर गेल्यामुळें २२ एप्रिल पासून खालील बदल्या देण्यांत आल्या आहेत:—

| | |
|---|---|
| मि० | बदती |
| लूकस | स्पेशल जज्ज |
| रुस्तुमजी | डिपुटी कमिशनर वर्ग २ |
| सिम्पसन | २ रा. |
| हार्सबरो | ३ रा. |
| बा. का. जोशी | स्पेशल असि. कमि. |
| प्लौडन | असि. कमि. वर्ग १ |

मे० प्रीडो साहेब डेपुटी कमिशनर हे गेल्या शुक्रवारीं अकोट मार्गें नरनाल्यास गेले असून उद्यां परत येतील. आणि अकोल्यास त्याच्या आफिसाचा चार्ज रा० रा० सी. शामराव अय्याची यांजकडे आहे.

गेल्या शनिवारीं येथील मुनसिपालिटीच्या कामदारांच्या मुख्य नेमणूका चालू वर्षा करितां झाल्या त्या येणें प्रमाणें:—

| रा० रा० | हुद्दा. |
|---|---|
| प्रीडो साहेब | चेअरमन |
| दामोदर गणेश पटवर्धन<br>एदलजी संजाना | व्हाईस चेअरमन |
| केशव गोविंद दामले<br>नारायण काशिनाथ दाते | सेक्रेटरी |

येथील काटन मार्केट कमिटींत मुनसिपालिटी, तर्फे खालील सभासद निवडण्यांत आले:—

रा० रा०
लक्ष्मण गोपाळ देशपांडे
दामोदर गणेश पटवर्धन.

## वर्तमानसार

दुष्काळाची भीति!—बैतुल (मध्यप्रदेश) प्रांतांत यंदा दुष्काळ पडण्याची विशेष भीति दिसूं लागली आहे!

बातमीदारास कैद केलें.—लंडन टाइम्सचा एक बातमीदार क्युबा बेटांत मोठ्या चातुर्यानें कसा तरी जाऊन पोंचला; परंतु तेथें बंदरावर जाऊन उतरल्याबरोबर त्यास तेथील स्पानिश अधिकाऱ्यांनीं पकडून क्युबा बेटांतच अडकवून टाकलें आहे!

लंडन शहरांत राहणारा प्रत्येक मनुष्य तेथें खर्च होणाऱ्या धुराच्या दिव्याकरितां दरसाल २१ शिलिंग कर देतो, असा हिशेब निघाला आहे. ह्यावरून लंडनच्या लोकांस म्युनिसिपालटीचे केवढाले कर द्यावे लागतात हें समजून येण्यासारखें आहे.

जगांतील संपत्ति—अवघ्या जगांतील एकंदर संपत्ति ६०,००,००,००,००,०००(सहा महापद्म) पौंड असून तींतील यू. स्टे. अमेरिकेची संपत्ति १२०,००,००,००,००० पौंड आहे. आणि ग्रेटब्रिटनची संपत्ति १००,००,००,००,००० पौंड आहे. म्हणजे, अमेरिका पहिल्या प्रतीचे संपन्न खंड असून ग्रेटब्रिटन दुसऱ्या नंबरचे श्रीमान् राज्य आहे असें कळतें.

बंदराचा ताबा—वी. हई-वी हे चिनी बंदर ब्रिटिश सरकारच्या ताब्यांत दिलें गेलें. तेथील किल्ले वगैरे सर्व दुरुस्त आहेत. मात्र जपानी लोकांनी तें बंदर खाली करून देतांना तेथील किल्ल्यांवरील तोफा वगैरे काढून नेल्या. ह्यासाठीं त्या किल्ल्यांवर नवीन तोफा वगैरे ठेवण्याची नवीन व्यवस्था ब्रिटिश सरकारास करावी लागणार आहे. ज्ञा. च.

निजामच्या राज्यांतील मोठमोठ्या कामगारास प्रसंगवशात ब्रिटिश अमलांत यावयाचे असल्यास त्यांस सशस्त्र येण्याची परवानगी मिळावी म्हणून निजाम सरकारानें हिंदुस्थान सरकारास केलेली विनंती अमान्य झाली.

जपानांत कोणी मूल जन्मास आलें म्हणजे त्याच्या नांवाचा, एक वृक्ष लावतात, व विवाह होई तोंवर तो वृक्ष वाढूं देतात आणि विवाह होतांच तो तोडून त्याच्या लांकडाची कांहीं तरी चीज बनवून ती तो मनुष्य वापरतो!

आगबोटींचीटक्कर—महाराणी साहेबांच्या जन्मोत्सवाच्या दिवशींच आगबोटीची टक्कर होऊन त्यांत बोटीवरील कामदार व प्यासेंजर मिळून ५० लोक समुद्रार्पण झाले. ही आगबोट कलकत्याहून रंगूनला चालली होती.

मुंबईची प्लेग कमिटी उठवून तत्संबधाची सर्व जबाबदारी तेथील म्युनि० कमिशनरांकडे दिली आणि त्यांच्या मदतीस एक स्पेशल डेप्युटी कमिशनर नेमल्याबद्दल ता. २७ चा सरकारचा ठराव प्रसिद्ध झाला आहे.

हुबळी नजिक जमिनींतून गंधकाचा रस निघूं लागला म्हणून भूकंपाचे पूर्वरूप अशी कल्पना तिकडील लोक करीत आहेत.

प्लेग—पंजाबांत प्लेगची सांथ जास्त जास्त गांवांत पसरत आहे. कराचीकडे सांथ कमी कमी होत होत चालली आहे. भिवंडी व वांद्रें या ठिकाणीं प्लेगची सांथ वाढत्या प्रमाणावर आहे.

बऱ्हाणपुरास पुनः गुदस्ती सारखी आग लागून सुमारें ४०० घरें खाक झालीं. क. त.

गेल्या ताबुताच्या कतलच्या रात्रीं म्हणजे मंगळवारी रात्री वांद्रे येथें फार मोठा दंगा झाला. प्रसिद्ध झालेल्या हकिकतीवरून समजतेंकीं त्या रात्रीं एक वाजेपर्यंत ताबूत फिरण्यास परवानगी होती व चीफ कान्स्टेबल मि. कावसशा धनजीशा हे एक हवलदार, एक नाईक, कांहीं पोलीस यांसह ताबुताबरोबर होते. नोपाडा, खारी व बाजार हे ताबूत फिरून आले व पुन्हा निघणार होते, पण आतां एक वाजला करितां बंद करा असा फौजदारानें हुकूम केला. एक वाजण्यास अवकाश आहे अशी ताबुतवाल्यांनीं तकरार केली. माझ्या घड्याळांत एक वाजला आतां बंद करा असें फौजदारानें बजावलें त्यावरून पोलिस व ताबूतवाले यांच्यांत लढालढी सुरू झाली. ५०० मुसलमानांचा जमाव होता. फौजदार मि. कावसशा यांस खालीं पाडून काठ्यांनीं मारले व तो मरणोन्मुख झाल्यावरून त्यास त्याच्या घरीं नेलें. पुष्कळ उपचार केले, पण व्यर्थ होऊन दुसऱ्या दिवशीं तो मरण पावला. हवलदार, नाईक व २ शिपाई हेहीं घायाळ झाले असून त्यांतल्या एक दोघांचीही भीती आहे.

दंग्याची बातमी कळतांच असि. कले मि. शेपर्ड हेही ठिकाणावर जाऊन त्यानीहि पोलिसास मदत केली. दुसऱ्या दिवशीं ठाण्याहून ५० शिपायी घेऊन पोलिस सुप. व डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट हेही तेथें गेले होते, ४०।५० लोक कैद केले आहेत.

फौजदार मरणोन्मुख होतांच दंगेखोरांची पळापळी झाली व कांहीं ताबूत जागच्याजागीं पडून राहिले.

पकडलेल्यावर लवकरच खटले सुरू होऊन कित्येक तुरुंगांत जाऊन कांहीं फाशीहि जातील.

ता. २ ची मुलतानची तार सांगते कीं ताबूतांच्या शेवटच्या दिवशीं म्हणजे ता. १ रोजीं सुमारें एक वाजतां हिंदु व मुसलमान यांची मोठी मारामारी झाली, ताबुतांची स्वारी शहराच्या भरवस्तीतून जात असतां त्याज्यांवर दगड आले व त्यावरून भर रस्त्यांत ही मारामारी सुरू झाली असें सांगतात. चाकू व सुऱ्या यांनीं एकमेकांस भोसकलें व ३६ माणसें घायाळ झालीं. त्यांतील कित्येकांच्या जखमा फार भारी आहेत. डे. कमिशनर व पोलिस सुप० हे तावडतोब तेथें आले व कांहीं लष्करी लोकही आणले. लोक अगदीं चवताळलेले आहेत. शहरांत रात्रीं मजबूत पाहारा होता व कांहीं गडबड झाली नाहीं. ९२ हिंदु लोकांस कैद केलें आहे.

सालम जिल्ह्यांत एका ब्राह्मण सब माजिस्ट्रेटास तो इन्साफाचें काम करीत असतां गोळी घालून ठार केलें. असें सांगतात कीं, तो माजिस्ट्रेट पोलिसास फार नावडतां होता व त्या दिवशीं संध्याकाळीं उशिरापर्यंत एका खटल्याचा इन्साफ करीत असतां मागच्या बाजूनें गोळी लागून ठार झाला. मागच्या बाजूच्या पोलिस शिपायानें गोळी वातली असें म्हणणें आहे.

आसाम प्रांतांत नेपाळच्या हद्दीच्या शेजारी काळदूत नांवाचा एक ताप सुरू होऊन माणसें मरत आहेत.

कलकत्ता शहरांत लाठे व गुंड या जातीचे कांहीं बदमाष लोक असून ते आठ आणे मजुरी घेऊन हवा त्यास ठोकतात व ५ रुपये रोज दिला कीं एकाद्यास ठार मारण्यासही तयार होतात असें सांगतात.

पश्चिम आफ्रिकेंत किसी नांवाचे एक शहर असून ते आपल्या ताब्यांत घेण्याकरतां फ्रेंचाचे कांहीं शिपायी गेले असून शहरवासी सिद्दी लोकांनीं त्यांस प्रथम हाकून लावले, तरी शेवटीं इंग्रजांनीं त्या शहराचा कबजा घेतलाच. फ्रेंचांनीं हरकत सांगितली व बाहेरच्या बाजूस त्याणीं आपली एक चौकी स्थापन केली.

### इतालींतील भयंकर स्थिती.

### अन्नासाठीं दंगा

अन्नाची महगेता झाल्यामुळें इतालींत मोठा दंगा उसळला आहे. या दंग्याशीं राजकीय संबंधही असावा असेंही बाहेर आलें आहे. हा दंगा ९ मे रोजीं झाला व तो उत्तरेकडून सुरू होऊन अगदीं मध्यप्रांतापर्यंत येऊन ठेपला आहे. आपल्यावर घोडेस्वारांची स्वारी होऊं नये म्हणून प्याव्हीया येथील दंगेखोरांनीं रस्त्यावर तारा व लोखंडी साखळ्या फेकून दिल्या होत्या. सरते शेवटीं लष्करी लोकांस गोळ्या घालाव्या लागल्या यामुळें जे लोक ठार मेले त्यांत इतालीच्या व्हाइसप्रेसिडेंटाचा मुलगाही मारला गेला. सुमारें ४८ तासांच्या आंत लेगहार्न, फ्लारेन्स, प्राटोसेस्टो, फ्यारेंटिनो प्याव्हिया व मुख्यत्वें मिलन या ठिकाणीं एकदम दंगा उसळला. इतका मोठा दंगा इटालींत आजपर्यंत झाला नाहीं असें खुद्द त्या सरकारानें प्रसिद्ध केलें आहे. याची वेळीं ज्युबिलीप्रमाणें त्या देशांत एक वार्षिक उत्सव होता त्यांत त्या देशाचा राजा व राणी व इतर सरदार लोक गुंग झाले होते. सरकारानें कडक बंदोबस्त ठेविल्यामुळें मिलन येथून तारेनें कांहींच बातमी बाहेर पडेना. दंगेखोरांची चवकशी कोर्टमार्शलनें (लष्करी चवकशी) होणार आहे रेल्वेवरील १९ पलटणीस तयार राहण्यासाठीं सरकारचे सक्त हुकूम सोडले होते. सगळ्यांत अति मोठा दंगा मिलन येथें झाला व तेथेंही रेल्वे स्टेशनावर त्याचा कडेलोट झाला मोठमोठाले राजवाडे लुटले गेले व त्यांतील सामानानें बराकी उभारण्यांत आल्या. या शहराचे सर्व दरवाजे तोफांनीं बंद केले होते; आणि खुद्द शहर लष्करी लोकांचे ताब्यांत होते लोकांनीं कामावर न जाण्याचा कट केल्यामुळें धुरांचा कारखाना बंद पडला अर्थात रात्रीं जिकडे तिकडे काळोख होता. सोशियालिस्ट मताच्या सर्व पत्रकर्त्यांस कैद करून ठेविले होते. इतर शहरेंही हळूहळू लष्करी अमलाखालीं जाऊन तेथील धनाढ्य लोक जीव घेऊन पळत सुटले. आरमार व रेल्वे यावर असणाऱ्या कामगारांच्या मंडळींत सोशियालिस्ट लोकांच्या मताचे अत्यंत प्राबल्य झालें व त्याचा पारिस येथील त्या मताच्या मंडळ्याशीं पत्रव्यवहार चालू होता. दंगा कसा करावा व राज्याचीं उलथापालथ कशी करावी याबद्दलचा पत्रव्यवहार पोलिसास सांपडला आहे.

### मिलनच्या दंग्याची हकीकत

'डेलीन्यूज' नावाच्या पत्राच्या बातमिदारानें मिलनच्या दंग्याचें चित्र हुबेहुब उठविलें आहे. तो म्हणतो कीं, कित्येक भाग पूर्ण उध्वस्त झालेलें दिसलें व कांहीं भागांत भयानें आपलें पूर्ण ठाणें दिलें होतें. दोन दिवसपर्यंत जिकडे तिकडे दुःखाच्य आरोळ्या ऐकूं येत होत्या व विधवा व पोरकी पोरें यांच्या किंकाळ्या हृदयास विदारण करीत होत्या. लष्करी लोक खुशाल लोकांस तुडवून जात होते व तोफांचे सारखे आवाज चालूं होते. जेव्हां दंग्यास सुरुवात झाली तेव्हां कित्येक निरपराधी लोक लष्करास बळी पडले. व्हिया टेरिनो येथें जेव्हां लष्करानें हल्ला केला तेव्हां एक तरुण व सुंदर पोषाक केलेली स्त्री भयानें गांगरून जाऊन सैरावैरा धांवत असतां तिच्या छातींत एक गोळी लागली त्या बरोबर ती धाडकन भिंतीवर पडली व तिच्या मृत्यूनें तीस फक्त 'आई' एवढेंच शब्द उच्चारूं दिले दुसऱ्या एका भागांत भयानें गांगरून गेलेला एक बाई सुरेखशा गाडींतून पळून जात असतां तिला गाडीच्या बाहेर ओढून काढली व त्या गाडींत जखमी झालेले लोक भरून ती दवाखान्याकडे रवाना केली. आह्मी आपली बायकापोरें दंगेखोरांच्या हातीं देऊन कामावर जाण्यास तयार नाहीं असें एंजिनड्रायव्हर व इतर कामगार याणीं निक्षून सांगितलें होतें पण त्याचा संभाळ करण्याचा पत्कर लष्कर लोकांनीं घेतल्यामुळें ते कामावर गेले.

या दंग्यास दंगा म्हणण्यापेक्षां लढाई म्हटली तर जास्त शोभेल. परकीय राष्ट्राच्या लष्कराशीं जसे एखादे लोक लढतात त्याप्रमाणें हे दंगेखोर आपल्या राजाच्या लष्कराशीं लढत होते. लोक छपरावर बसून दगड फेकीत होते इतकेंच नाहीं तर घरावर नेलेलें विटांचे धुरांडे एकदम खालीं लष्करावर लोटून देत. रस्त्यांत रक्ताचे पूर वाहात होते.

दुपारची शाळा बंद होण्याच्या वेळींच हा दंगा झाल्यामुळें पुष्कळ मुलें लष्करी गोळीस बळी पडली. कानाजवळून गोळ्या सूं सूं करून जात असता केवळ प्रेमाने आपल्या मुलांस शोधण्यासाठीं रस्त्यांतून सैरावैरा धावणाऱ्या आईबापांच्या दुःखाची कल्पना खऱ्या आईबापासच करता येईल.

या दंग्यांत विशेष आश्चर्याची गोष्ट म्हटली म्हणजे स्त्रियांच्या नेहमीच्या वृत्तीप्रमाणें नवऱ्यांस किंवा मुलांस दंग्यापासून परावृत्त करण्याचें सोडून देऊन त्या त्यांस विशेष उत्तेजन देत होत्या. कित्येक स्त्रियांनीं तर 'आह्मी काम करून तुह्मा आळशांस फुकट पोसले' असें म्हणून त्यांस शिपायांच्या आंगावर ढकलीत असत.

ट्यूरिन प्रांतांतील मुख्य स्टेशनावर दंगा झाला त्यावेळीं एक गाडी स्टेशनातून सुटत होती. ही गाडी पाहून दंगेखोरांनीं एकच आरोळी केली कीं, "पहा गुलाम जुबिलीच्या उत्सवास जात आहेत, मारा हाणा निर्लज्य, फिरा मागे फिरा" इतक्यांत गाडी हळू हळू चालू लागली तेव्हां कित्येक दंगेखोर रेल्वे रस्त्यावर आडवे पडून ओरडू लागले कीं, 'गाडी जाऊ द्या मात्र ती आमच्या आंगावरून जाऊ द्या.' अ०

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ३ „ १ ०८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....०१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ........................... 4 as

Advertisemen
Below 10 lines ......2 R
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 20 JUNE 1898 NO 24

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख २० माहे जून सन १८९८ इ० अंक २४

### नोटीस.

रा० रा० इंद्रभान जानजी कारभारी पाटील व सोनी मर्द माधव चव्हान मौजे पिंपरी नजीक वानखेड तालुके जळगांव जिल्हा आकोले, यां उभयतांस नोटीस देणार इश्वरदास गुरु प्रेमदास ब्रह्मचारी राहणार पिंपरी नोटीसीनें असें कळवितो कीं गेल्या दुष्काळांत दिवस सर्व प्रकारानें भयंकर होते, यास्तव मी भिक्षुकी करून मजपाशीं मी रोख रुपये २०० व सोनें तोळे २ दोन असें जमविले होते. ते दिवस तसेच भयंकर होते यामुळें मी तुह्मापाशी सदर्हू सोने व रुपये व आणखी माझी चीज कापड व भांडी वगैरे तुह्मापाशीं ठेविले. सदर्हू जिन्नस, सोने व रुपये वगैरे ज्यावेळेस ठेविले ते चार भले लोकांच्या देखत ठेविले आहेत. सदर्हू सोने व रुपये मी मागत असतां रुपये व सोने यास तुह्मी नाकबूल आहा व बाकीची चीजवस्त घेऊन जा असें सांगतां. सोने व रुपये मनला ठाऊक नाहींत असें ह्मणतां तर तुह्मास या नोटीसीनें असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्यापासून दोन दिवसाचे आंत सदर्हू रुपये व सोनें व चिजवस्त माझी मला देऊन पावती ध्यावी. असें न केल्यास तुह्मावर फिर्याद करून अखेर निकाल होईपर्यंत या नोटीसीच्या व फिर्यादीच्या खर्चासह सर्व नुकसानी भरून घेतली जाईल ह्मणून दिली नोटीस सही तारीख १६ माहे जून सन १८९८ इसवी.

सही

इश्वरदास ब्रह्मदास गुरु प्रेमदास ब्रह्मचारी दस्तुर खुद्द.

## " दार्जिलिंगचा प्रवास "

प्रवास ! आणि त्यांतून दार्जिलिंगसारख्या दूरच्या ठिकाणचा प्रवास ह्मणजे आमच्या हातून झाला असतां असें स्वप्नींही आलें नव्हतें. कारण आमचे लोकांना प्रवास करून अन्य देश पहाण्याची फारच हौस ? पण तें कसें ही असो. आह्माला दूरचा प्रवास करण्याचा पूर्व पुण्याईनें योग आला खरा ! वऱ्हाडांतील उन्हाळा !! सर्वांना त्याचा पूर्ण अनुभव दरवर्षीं येतोच. आणि आमच्या सारख्या मूळ थंड हवेंत राहणाऱ्या लोकांनां तो अतिच असह्य व वेदनाजनक होतो! ह्मणून ज्यांना ऐपत व इच्छा असते असे लोक उन्हाळ्यात थंड प्रदेशांत जाऊन महिना दोन महिने रहातात. त्याप्रमाणें यंदा आमचे कांहीं मित्र हवा खाण्यासाठीं दार्जिलिंगास अगोदरच गेले होते. आह्मासही येण्याबद्दल त्यांनीं अक्षत दिली होती. परंतु घरीं कांहीं मंगलकार्य असल्यामुळें त्यांचे बरोबर आह्मास जातां आलें नाहीं. मंगलकार्य आटोपल्यावर आह्मी जाण्याची तयारी केली. आह्मी एकंदर तिघे होतो. तारीख ८ माहे मे रोजीं सकाळीं ४ वाजतां नागपुराहून बंगाल नागपूर रेलवेनें आह्मी दार्जिलिंगास जावयास निघालों. नागपूरचे स्टेशनावर ओळख असल्यामुळें आह्मास थेटचीं टिकिटें मिळण्याची सोय झाली. लांबचा प्रवास करावयाचा ! ह्मणून आह्मी इंटरमिजिएट क्लासाचें ( याला "मझोला" ह्मणजे "मधला" क्लास असें ह्मणतात ) टिकिट काढलें होतें. या क्लासाचे डब्यांत हलक्या प्रतीचे लोक बसत नाहींत त्यामुळें प्रवास फार सुखकारक होतो. गर्दी मुळींच नसते. या क्लासांत शौचकूपाचीही सोय असते.

पैशानें श्रीमंत पण सोयीच्या कामांत भिकारी अशा जी. आय. पी. आर. चे गाडींत अशी व्यवस्था नसते. नागपूर पासून दार्जिलिंग पर्यंतचे भाडें दरमाणशी रुपये २२–३ आणे इतकें पडतें. नागपूर पासून दार्जिलिंग हें सरासरीनें ११०० ( नक्की १०८९ ½ ) मैल आहे. इकडील रेलवे मध्यें उन्हाळ्या निमित्त आगगाडींत बर्फ, सोडा वाटर, लेमोनेटची सोय केलेली असते. नागपूर सोडल्या पासून "भंडारा रोड" स्टेशन पर्यंत आह्मांस कांहीं विशेष दिसलें नाहीं. कारण थोडीशी रात्रच होती. भंडारा रोड स्टेशन पर्यंत गेल्या नंतर मग सृष्टिसौंदर्याचा देखावा आह्मास पूर्णपणें दिसूं लागला. पूर्वक्षितिजाकडे सहस्ररश्मी हा नुकताच उदय पावला होता. प्रातःकाळचा थंड वाराही आह्मांस भेटून मनाला आनंद देत होता. आह्मी गाडीच्या खिडक्यांतून दोहीकडे दूरवर नजर फेकीत होतों तों एक सारखी भाताची लक्षावधि खाचरें ( शेतें ) दर्शन देऊं लागलीं. १०।१२ दिवसांपूर्वी या भागांत बराचसा पाऊस पडला होता ह्मणून कळलें. कारण मधून मधून भात खाचरांत कापलेल्या बुंधातून हिरवीगार भाताचीं पुन्हा फुटलेलीं रोपटीं दिसत होतीं. व क्वचित् शाळूचीही रोपें गुडघ्या इतकीं उगविलेलीं नजरेस येत होतीं या नूतन रोपांनां आपल्या प्रखर किरणांचा ताप होऊं नये ह्मणूनच कीं काय सूर्य हा मध्यें मेघरूपी पट धरीत होता असें भासे. आणि ही अनुरक्तता ढगांवरील रक्त रंगानें स्पष्ट दिसत होती. ही भात खाचरें कोंकणांतील भात खाचरा पेक्षां जरा निराळीं दिसलीं. हीं भात खाचरें फार उथळ आहेत. भात खाचरांनां पाणी फार लागतें. ह्मणून कोंकणांत ओढे वगैरे आडवून त्यांचें पाणी खाचरांत द्यावें लागतें. त्यासाठीं ओढ्याचे दिशेनें खाचरांत मोठाली दगडाची रच करून बांध घालावा लागतो. तेव्हां पाणी शेतांत ठरतें. कोंकणांतील किंवा वाई प्रदेशांतील अशा भात खाचरांना ताला ह्मणतात. या प्रदेशाला झाडी ह्मणतात. इकडे भात खाचरांनां पाणी मिळावें ह्मणून मधोमध एक मोठा तलाव चिकण मातीचा बांध घालून तयार केलेला असतो. हा तलाव इतर शेतांच्या ( भात खाचरांच्या ) मानानें बराच उंचीवर असतो. त्यात एकदां पूर्ण पाणी सांचलें ह्मणजे त्यांतलेंच पाणी सर्व शेतांमधून या शेतांतून त्या शेतांत असें पाटासारखें काढून आणतात. असे हजारो तलाव आमचे दृष्टीस पडले व बहुतेक पाण्यानें भरलेले. तेव्हां उमरावती व अकोला ह्या ठिकाणीं लोकांचे पाण्याचे हाल लक्ष्यांत आल्यावाचून रहात नाहींत. असले पांच दहा तलाव जर येथल्या लोकांनीं बटाईनें दिले तर फार उत्तम होईल असें सुद्धां आह्मास वाटूं लागलें. या प्रदेशांतील लोकांना साधारणतः झाडपे ह्मणून ह्मणतात. यांच्यांत अनेक पोटजाती आहेत. भंडारा रोड स्टेशना पासून सरासरी २९।३० कोस गेल्यावर एका अफाट जंगलानें आह्मास दर्शन देण्याचा संकल्प केला. आगगाडीचे रस्त्यानें दोन्ही बाजूला किती कोस पर्यंत हें जंगल पसरलें आहे त्याचा पत्ता लागेना. नाना तऱ्हेचे वृक्ष कधीं नजरेंत न येणारे असे दृग्गोचर होऊं लागले. त्यांच्या मध्येंही जुनाट व खानदानीच्या वंशांचीं लक्षावधी बेटें दृष्टीस पडूं लागलीं बहुतेक वृक्ष अगदीं सरळ वर गेलेले होते. वऱ्हाडांत उन्हाळयामुळें झाडांनांही उन्हाळा बाधतो. पण येथें या वृक्षांना उन्हाळा मुळींच नाहीं. सर्व नूतन फुललेल्या कोमल हिरव्या पानांनीं अगदीं आच्छादून गेले होते. जणू काय वनदेवतानीं सूर्यातपापासून ताप हे ऊं नये ह्मणून हिरव्या कपड्याच्या झालरी आपल्या आराम मंदिरांच्या स्तंभांना उंच भागीं लटकाविल्या आहेत असा भास होई. मधून ओढे व नद्या दृष्टीस पडत. नद्यांचीं पत्रें सर्व वालूकामय दिसत. वालुका प्रदेशाचा रंग ताम्र धूसर होता. त्यामुळें लांबून नद्या महापूरानें भरून चालल्या आहेत असें वाटे. पण जवळ जवळ येऊं लागल्या बरोबर संशयोत्पन्न अप्रतिम सुखाचा एकदम नाश होत असे. त्यामुळें मनाला थोडेंसें वाईट वाटल्या वाचून रहात नसे. सकाळची वेळ असल्या कारणानें सहस्ररश्मीचीं बाळ किरणें त्या वृक्षांच्या पानांवर पडल्याकारणानें तीं पानें स्फटिका प्रमाणें चकाकत. तेव्हां मनात नाना कल्पनानीं प्रवेश करावा. गाडींत बसलेल्या उतारूंनीं प्रातःकाळ होऊन भानु बराच वर आला असूनही अद्याप मुखमार्जन केलें नाहीं हें दर्शविण्या करितांच कीं काय हे वृक्ष आह्मी आपले दांत वालुकारजांनीं घांसून स्वच्छ केले आहेत पहा व तुह्माला कांहीं लाज वाटूं द्या असें सांगत आहेत असें वाटे. आणि ह्मणूनच त्यांच्या त्या बोलण्याला लाजून बहुतेक उतारू साधेल त्या स्टेशनावर पाणी घेऊन गाडीच्या खिडक्यांतून मुखें काढून गडबडीनें मुखमार्जन करतांना दृष्टीस पडत. या जंगलांतून मधून मधून भातखाचरेंही दृष्टीस पडत. पण मनुष्य अगर जनावरें एकही दृष्टीस पडेना. त्यामुळें हीं शेतें वनदेवतांचींच असावींत असें वाटे. अशी या अरण्याची शोभा पहात पहात आणि तज्जन्य अपूर्व, आल्हादतरंगांत आह्मी विहार करीत होतों तों इतक्यांत ती सर्व वनश्री अदृश्य झाली. तिचे तें सर्व वन्यवैभव बुद्बुदवत भासलें. आणि पाहूं लागला तों एक माळचा माळ दृष्टीस पडूं लागला. तेव्हां मन जरा खट्टू झालें. तेव्हां वनदेवतांच्या मंदिरांत त्यांना न विचारतां आपच्या चक्षूंनीं प्रवेश केला ह्मणून त्यांना ही शिक्षाच केली आहे कीं काय असें वाटूं लागलें. आंग्ल कविराज "शेक्सपिअर" याच्या "मर्चंट आफ वेनिस" नामक नाटकांत "प्रिन्स आफ मोरोक्कोला" जसा त्या सोन्याच्या पेटीनें उपदेश केला "कीं बाबा बाह्य स्वरूपाला भुलूं नकोस बरें" तोच उपदेश आह्माला या माळानें केला कीं काय असें वाटे. कारण मी बाह्यांगानीं जरी मी तुह्माला अरमणीय दिसतो तरी माझ्या पोटांत रत्नाच्या खाणी आहेत त्या कोठें तुह्माला ठाऊक आहेत असें ह्मणतांना तो दिसे. या माळावर मधून मधून पळसाचे वृक्ष दिसत त्यावरून तर तें उघड होत असे. याप्रमाणें ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी माळानीपंत आह्मांस सांगत असतांना ते एकाएकी दिसतनासे झाले. त्यांच्या ऐवजीं पुन्हा भिन्न स्वरूपाचें वन दिसूं लागलें. तेव्हां पुन्हा उल्हास वृत्तीनें उचल घेतला. या वनांत ठिकठिकाणीं टेकड्या दिसत होत्या. आणि त्या टेकड्या मोठाल्या घरा एवढाल्या खडकांच्या बनलेल्या होत्या. त्या खडकांचे पुंजकेच्या पुंजकेच होते. त्यांचें तें कृष्ण स्वरूप फारच भयप्रद वाटे. वनदेवतांचा नाश करण्या साठीं हे काळ पुरुषच आहेत कीं काय असें वाटे, कां रामांनीं लंकेस जाण्यासाठीं रामेश्वरास सेतु बांधला त्याच्या करितां त्याच्या वानर सेनेनें दगड नेले होते ते येथूनच नेले आणि कांहीं दगडांच्या गोळा केलेल्या राशी तशाच राहिल्या आहेत त्याच ह्या हें कांहीं समजेना. अशा संशयांत आह्मी बराच वेळ घालविला तो गाडीनें शिटी दिली. आणि लागलीच 'डोंगरगड' या नांवाचें स्टेशन आलें. तेव्हां या दगडांच्या प्रचंड राशीचें कारण समजलें कीं ह्या राशींनीं डोंगर लोकांनीं ( पर्वतांनीं ) गड ( किल्ला ) बांधला आहे. अचेतन व बुद्धिरहित पर्वतांना ही अक्कल कशी व कशा करितां आली हें ही समजेनासें झालें.

( पुढें चालू )

वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ शुद्ध १ शके १८२०

## मिथ्या सूट.

इंग्रजींतील सर्व प्रकार मोठ्या नवलाचे असतात. लांकूडतोडे पाचर मारतांना हळूं हळूं ठोंकतात ह्मणजे कुऱ्हाडीचा घांव वाया जात नाहीं आणि पाचर जोरानें आंत आंत जाऊन बसते व अखेरीस एका प्रचंड खोडाचे शतशः तुकडे तुकडे होतात. हें पाचरेचें तत्व आमच्या सरकारास चांगलें पक्केपणीं कळलें आहे आणि आमचें सरकार नवीन कर बसवितांना किंवा जुने कर वाढवितांना हें तत्व मोठ्या कसोशीनें अंमलांत आणितात. जमिनीचा सारा ठरवितांना किंवा पूर्वींची दर ठरोती वाढवितांना सरकारचें धोरण असें असतें कीं रयतेला नवीन वाढवा जबर वाटूं नये, चढविलेला सारा निपुटपणें देण्याची त्यांस हळूं हळूं संवय लागावी आणि पांच सात वर्षांच्या अवधींत पूर्वींच्या साराच्या दिढानें किंवा पावणेदोन पटीनें सारा कायमचा तीस वर्षांच्या मुदतीचा अंमलांत आणावा. या रितीनें प्रथम प्रथम सारा नवीन दर ठरोती प्रमाणें वसूल करीत नाहींत आणि पहिलीं चार पांच वर्षें कांहीं रकमेची सूट देतात. या रकमेला सूट ह्मणण्याची चाल आहे परंतु ही वास्तविक सूट नसून वरपंगी सरकारची भूतदयाच आहे. सरकारचा कार्यभाग ही चांगला साधतो आणि बिनबोभाट नवीन दरठरोती सुयंत्रपणें अंमलांत येते. ही कृत्रिम सूट देण्याचे नियम आह्मी १८९५ सालीं प्रसिद्ध केले होते. त्या वेळीं खामगांव, जळगांव व मलकापूर या तालुक्यांस नवीन तरमबंदी लागूं करावयाची होती. या नियमांचा सारांश असा कीं:—

जेथें सारा मूळ साऱ्याच्या सवाई इतका किंवा त्याहून कमी आकारला असेल तेथें सूट मिळणार नाहीं. जेथें सारा सवाई पेक्षां अधिक पटीनें वाढला असेल तेथें पहिल्या दोन वर्षीं फक्त शेकडा २५ या प्रमाणानें मूळच्या रकमेहून जादा सारा वसूल करावयाचा. नंतर नव्या तरमबंदीच्या तिसरे व चवथे वर्षीं मूळच्या साऱ्याच्या रकमेवर शेकडा ५० या प्रमाणानें सारा वाढवावयाचा. पण जर नवीन आकारणीचा वाढवा शेकडा पन्नासाहून कमी असेल तर तिसऱ्या वर्षापासूनच नवीन ठरावा प्रमाणें संपूर्ण सारा वसूल करण्यांत येईल. आणि जर साऱ्याचा वाढवा शेकडा ५० याहून अधिक असेल तर पांचवें आणि सहावें वर्षीं शेकडा ७५ या प्रमाणें मूळ साऱ्यावर अधिक वाढविलेला सारा घेतला जाईल. पण नवीन आकारणीची वाढ शेकडा ७५ हून कमी असेल तर पांचवे वर्षी पासूनच संपूर्ण सारा घेतला जाईल. शेकडा ७५ हून अधिक वाढ असेल तर सातवे वर्षा पासून संपूर्ण सारा वसूल करण्यांत येईल. सारांश असा कीं, सारा शेकडा २५ हून अधिक पहिल्या दोन वर्षी वाढवावयाचा नाहीं. पुढें प्रत्येक दोन वर्षांनीं मूळ साऱ्याच्या रकमेवर शेकडा २५ या प्रमाणें वाढ आकारण्यांत येईल. एकंदरीनें सारा नवीन ठरावबंदीच्या रकमे इतका वसूल होऊं लागे पर्यंत पहिल्या दोन वर्षीं मुळ साऱ्याची सवाई. तिसऱ्या व चवथ्या वर्षीं मूळ रकमेची दिढी आणि पांचवे व सहावे वर्षीं मूळच्या पाऊणे दोन पट या पेक्षां अधिक सारा वसूल केला जाऊ नये.

ही कृत्रिम सूट देखील आतां अकोले तालुक्यास देऊं नये असा सरकारचा नवीन बुट निघाला आहे. नव्या दरठरोती प्रमाणें एकदम सारा वसूल न केल्यामुळें सरकारचें हजारो रुपये नुकसान होत आहे. हें नुकसान सरकारला सोसवत नाहीं ह्मणून रयतेला जी नव्या तरमबंदीची सुनावणी अकोलें तालुक्यांत होऊन चुकली आहे ती रद्द करण्यांत येणार आहे असें कळतें. ही बातमी खरीच असेल तर जुन्या नियमांस हरताळ लावावा लागेल. सरकारानें आपल्या अधिकाऱ्यांच्या हातून ज्या नियमांची सुनावणी प्रजेला केली ते नियम आतां खोटे होतील. सरकारच्या वचनांत अशी अस्थीरता व चंचलता पाहून लोकांस मोठा खेद व आश्चर्य वाटेल. सरकार सूट ह्मणून जी रक्कम माफ करित होतें ती रक्कम पुन्हां वसूल करण्यांत गेईल. धनतृष्णा इतकी वाईट असते कीं पूर्वींच्या चांगल्या नियमाला देखील बाध येतो. पोंकळ सूट देखील माफीत काढली जाणार नाहीं. ही सूट आतां मिथ्या होत आहे असें रयतेला कळलें ह्मणजे विश्वास ह्मणून काय चीज आहे याची देखील भ्रांती पडेल. सर्पाच्या ठिकाणीं रज्जूचा भास व्हावा आणि तो देखील आनंदसागरांत बुडविणाऱ्या स्वप्नाच्या अखेरीला अर्धवट जागृतावस्थेंत व्हावा ह्मणजे निमिषार्धांत सर्व आपल्या उग्र श्वासोच्छ्वासांनें मनुष्यांस गर्भगळीत करून सोडील आणि त्या वस्तु स्थितीचा खरा महिमा त्यास चटकन कळून येईल. तसा प्रकार या नव्या साऱ्याच्या सूटी संबंधानें होणार आहे. इसापनीतींतील सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या कोंबडीची गोष्ट आमच्या सरकारास माहित नसेल असें नाहीं. अगोदरच सारा फार जबरदस्त झाला आहे आणि अशा वेळीं असली ककरकोळ सूट देखील सरकारानें काढून टाकावी ही गोष्ट अत्यंत शोचनीय होय. 'वऱ्हाड सार्वजनिक सभेनें' या बाबदींत अकोला तालुक्या संबंधा सरकारापाशी विनंती केली पाहिजे. सारा वाढवूंच नये अशी जेथें लोकांची तक्रार आहे तेथें सरकारानें अशा प्रकारचा मिथ्या सुटीचा कहर उसळावा ही गोष्ट प्रजेला अत्यंत छळकारक होय. दुश्चिन्हाला अगोदर पासूनच टाळावें ह्मणून आह्मी मुद्दाम सूचनार्थ आगाऊ लिहिलें आहे. मिथ्या सूटीची गोष्ट खोटी होईल तर आह्मांस विशेष आनंद वाटेल.

---

हट्टी स्वभाव हा इंग्लिश राष्ट्राची मोठी खूण आहे. हिंदुस्थान सरकारचें किंवा त्यांच्या हाताखालील स्थानिक सरकारचें मुख्य ब्रीद आपल्या राष्ट्रीय वळणावरच आहे. इंडियांतील अधिकाऱ्यांमध्यें हट्टी स्वभाव सद्गुणाच्या पायरीला पोंचला आहे. त्या हटवादी स्वभावाचा परिणाम स्वकृतीच्या मंडनांत विशेष दिसून येतो. राजनीती न्यायाला अनुसरून आहे, प्रामाणिकपणा तिजमध्यें नसतो असें नाहीं आणि उदार तत्वें तिच्या बुडाशी आधारभूत असतात; परंतु स्वकृतीच्या मंडनाच्या वेळीं सर्व गुण लोपतात. परस्परांस परिपोषक व उत्साहजनक अशीं मतें बाहेर पडूं लागतात आणि एक वेळ ज्या गोष्टी मनावर घेतल्या त्या राजनीतीच्या यंत्रालयांतून उत्तम प्रकारच्या ठशा सहित बाहेर पडतात. ही राहटी इंग्रजी राष्ट्राची विशेष आहे. चांगल्या गोष्टी ज्या द्वारांनीं घडतात त्याच द्वारांनीं वाईट गोष्टी देखील घडवून आणण्याची शिताफी इंग्लिश लोकांमध्यें अती विलक्षण आहे.

लेफ्टेनंट एअर्स्ट व मि० र्‍यांड यांचे खून झाले तेव्हां पासून वंडाचीं दुष्ट स्वप्नें राज्यकर्त्यांस पडूं लागलीं. महाराष्ट्रांतील नेटिवांची खोड मोडण्याचा संकल्प मुंबई सरकारानें केला आणि त्या बरोबर चोहीकडून धुमश्चक्री चालूं झाली. नेटिव पत्रकारांवर राजद्रोहाचे खटले केले, सरदार नातूंस वहिमानेंच अटकेंत ठेऊन दिलें, पुण्यास जादा पोलीस पलटण ठेविली इत्यादि नाना खेळ केले. परंतु अखेरीला दामोदर चाफेकर खुनी ठरला आणि तो फांशी गेला. वरील खूनांत कोणाचें अंग नाहीं किंवा तत्संबंधी कोणीही केव्हांच कट केला नव्हता अशी मुंबई सरकारची पक्की खात्री झाली.

पण कृत गोष्टींचें मंडन कसेंबसें करण्याचा स्वभाव कांहीं माघार घेत नाहीं. पश्चात्ताप झाला तरी मनःशुद्धी चांगलीशी नाहीं. सरकारच्या रागापुढें जे बळी पडले त्यांस कांहीं उश्शाप मिळण्याचा संभव नाहीं. रा० रा० बाळ गंगाधर टिळक यांस विनाकारण राजद्रोहाच्या सबबीवर कैदेंत टाकण्यांत आलें पण ह्यांचा खुनांशी संबंध काडीमात्र नाहीं असें पक्केपणीं शाबित झालें असूनही सरकारला पूर्वकृत गोष्टीमध्यें कांहींच फरक करावासा वाटत नाहीं. आठ पंधरा दिवसा पूर्वीं 'केसरीं'त राजद्रोहात्मक लेख प्रसिद्ध झाल्या बरोबरें त्याच्या वाचनानें खून करण्याकडे वाचकांची बुद्धि वळली असें मानण्याचा देखील वस्तुतः असंभव होता. तथापि खूनाच्या भयंकरपणामुळें सरकारच्या चित्तवृत्ती खवळल्या ह्मणून वर्तमानपत्रकारांवर फौजदारी खटले करण्यांत आले. आणि त्यांस शिक्षा देण्यांत आल्या. सरकारानें कायदा देखील अगदीं स्पष्ट करून घेतला व पत्रकर्त्यांस कडक कायद्याच्या जबर जुलमा खालीं आणून ठेविलें. अजून राजश्री टिळकांच्या वर्तमानपत्रांवर सरकारचा कटाक्ष आहे. 'केसरीचे' व 'मराठा' पत्राचे सांप्रतचे संपादक रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांस वारंवार कलेक्टर मार्फतीनें तंबी मिळत आहे. चारी बाजूनीं कोंडमारा चालला आहे.

राजश्री टिळक यांची शिक्षा सरकार भूतदयेनें किंवा उदार बुद्धीनें रद्द किंवा कमी करील काय! वारंवार मनांत हा विचार घोळतो पण निराशेच्या वातावरणांत आशासूर्य अगदीं लोपला आहे! राजश्री टिळकांचा बंधमोक्ष व्हावा ह्मणून प्रोफेसर म्याक्समुल्लर, सर बुलियम हंटर, सर रिचर्ड गार्थ, मि० दादाभाई नवरोजी, भावनगरी, साम्यु स्मिथ, जार्ज हारवुड इत्यादि श्रेष्ठ श्रेष्ठ महाजनांनीं खुद्द महाराणी सरकारास अर्ज केला आहे. पण त्यांस यश येई[illegible] नाहीं याची वानवाच आहे. हा [illegible] साधा पण मार्मिक आहे. राजश्री [illegible]चें विद्यावैभव, ग्रंथकर्तृत्व, सार्वजनिक कार्यशक्ती इत्यादि गूण सांगून त्या राजनिष्ठ महापुरुषांस तुरुंगांतून खुलें करावें ह्मणजे सध्यांच्या अशक्त प्रकृतीला त्यांस नीटपणें जपता येईल आणि त्यांचा राजकर्त्यांस व प्रजेस मोठा उपयोग होईल अशी विज्ञप्ती करण्यात आली आहे. ही करुणेची भाक परम दयाळू चक्रवर्तिनी महाराणी सरकार ऐकतील काय आणि सर्व इंडियन राष्ट्रास आपल्या कृपामृतानें सजीव व आनंदमय करितील काय? 'आशया किमिव न क्रियते' हाच आमचा गुरुमंत्र होय आणि ईश्वर त्यांतच आह्मांस अत्यंत आनंद देईल.

---

क्यूबा बेटा संबंधानें स्पेन व युनायटेड स्टेटस या दोन राष्ट्रांमध्यें जी लढाई चालूं आहे तिचा शेवट स्पेन देशाला फार घातुक होईल असा रंग दिसतो. आरमारावरील लढायांत स्पेनचा पराभव मोठा झाला असून या पुढें स्पेनचा निभाव लागेल असें वाटत नाहीं. २७ हजार पलटण अमेरिकन लोकांची निघाली असून 'की वेस्ट' कडे तिचा मोर्चा आहे. फिलिपाईन बेटाचे गव्हरनर स्पेन सरकारला लिहितात कीं फिलिपाईन मध्यें सर्वत्र बंडावा सुरूं झाला असून फौजेची कुमक वेळेवर आली नाहीं तर प्रसंग मोठा बिकट आहे. खुद्द गव्हरनर मानिलाच्या किल्ल्यांत जाऊन बसले आहेत. स्पेन व अमेरिका या दोन राष्ट्रांतील कलह फार लांबवर जाईल असा सुमार दिसतो. पूर्वेकडे चिनाचें राज्य गिळंकृत करण्याचा घाट युरोपियन राष्ट्रांनीं चांगलाच घातला आहे. सध्यां चालूं झालेला रक्तपात मोठी राज्यक्रांती झाल्या शिवाय थांबणार नाहीं असा सार्वत्रिक समज आहे.

---

ज्योतिष शास्त्रा संबंधानें आमच्या जुन्या कवींच्या कल्पना देखील अगदीं बिनचूक होत्या. त्यांच्या काव्यांत स्थल विशेषीं ज्योतिषा विषयीं उल्लेख दृष्टीस पडतो तेव्हां त्यांच्या ज्ञानभांडाराची बहुव्यापकता चांगली कळून येते. मराठी कवी ईश्वरभक्त होते ह्मणून त्यांच्या काव्यामृताची सरसखाणि धर्मविषयक किंवा पुराणविषयक ग्रंथांत पूर्णपणें भरलेली आहे. महासाधु एकनाथ महाराज यांच्या भागवतांतील खालील उतारा त्यांच्या ज्योतिषशास्त्राच्या ज्ञानाची चांगली साक्ष देईल. हा उतारा ग्रहांच्या अस्ता विषयींच्या सामान्य कल्पना [illegible] दूर करून खऱ्या कल्पनांचा प्रकाश पाडील असें वाटल्या वरून रा० रा० व्यंकटेश कृष्ण

देसाई यांनीं हा उतारा आह्माकडे पाठविला आहे. या लेखाचा काळ १६ वे शतकाच्या अखेरीचा आहे.

नवलकाळचक्रगती । मासांरविचंद्रसमान-
होती । सूर्याआडचंद्राचीगती । जाणनिश्चि-
तींदिनद्वयें ९१ तेअमावास्याप्रतिपदेसी ।
चंद्रचंद्रमंडळींसावकाशीं । सूर्यसमभागेंगमन-
त्यासी । तेंयालोकांसीदिसेना ९२ इतुक्या-
साठींतदिवशीं । जीवेंजींत्याचंद्राशीं । नष्टत्व-
स्थापितीज्योतिषी । तेंयालोकांसीसत्यमानें ९३
रविचंद्रएकासनीं । सर्वथानव्हतीगमनीं । ल-
क्षांतरेंवसती दोन्हीं । मंडळसमानींमासांतीं·
गती ९४ रविआडगतिज्याग्रहासि । त्याचा-
अस्तसांगेज्योतिषि । सत्यमानेंयालोकांसी ।
तेग्रहोंदृष्टीतीदिसेना ९५ दृष्टीसृष्टीचाजोन्या-
वों । तोज्योतिषशास्त्रींसत्यपाहाहो । नदिसे
ग्राचाअरतभावो । दिसेतोपहाहोपूजिती ९६
अभ्राआडग्रहणझालें । देखिलेंतेथेंपर्वफावलें ।
नदिसेतेदेशींनाहींचझालें । येणेंहीबोलेंवर्त्तती
९७ रविचंद्रांहूनिआरती । राहूकेतूंची असेवस्ती ।
तेगेंमंडळाआडयेती । तेंग्रासिलेंह्मणतीरविचंद्रां
९८ राहुसूर्यागिळितासाचें । तेंनोंडजळेंतराहूचें ।
मंडळींमंडळआडयेत्याचें । हेंसर्वथासाचेंसंमत
९९ सूर्येंसूर्यमंडळींराज्यकरी । त्याच्यासर्वग्रा-
साचीथोरी । ज्योतिषीसांगेचरोचरीं । तेंदेखा
निनरींमहाशब्दकीजे २०० सूर्यसर्वग्रासाचिया
गोठी । जगींएकचोंचउठी । शेंारविराहूसि-
नाहींभेटी । स्पर्शहीशेवटींअसेना १ ग्रहचक्र
वेगेंचळतांपाही । रविचंद्रांसिकांचालणेंनाहीं ।
तेनिश्चळनिजराज्याच्या ठायीं । नचालतांपाहीं
चालती. २

# The Berar Samachar

MONDAY, JUNE 20 1898.

Wonder that the Government shrinks from its pledged word! When the new assessments were declared certain remissions in the newly assessed amounts for the first period of some two or four years were allowed. But it is now proposed to withdraw that declaration and to call upon the people to pay the full amount according to the new rates. We hope that the Government will see its way to stick to its word. Such a slippery procedure undermines the strong confidence of the people and reflects great discredit on the part of the Government. In a Court of law, the Government will have to make amends for the change in the terms of the 30 years' right of occupancy granted to the ryots by the Sirkar the greatest land—lord on earth.

We are afraid that the system of election as introduced in the municipalities and local boards of Berar is likely to be stopped at a moment's notice. Elective principles have no significance with the local government. The policy of re-action has set backwards the hands on the dial and all movements conjure up to undo the liberal effects which the local Self—Government has, after an experiment of one decade, produced in our municipal and local boards. The grand old man whose loss we mourn in common with the other nations of the word,—tried to give us *living* re-presentative systems howsoever limited in extent and operation, & in breadth of views and administrative capacity. The present tendency is to cut short in their progress the elective franchises granted by Lord Ripon to our municipal and local boards. The stand—point of view is changed and whatever was congenial to the native mind has been declared to be quite uncongenial and destructive in its permanent effect. The principle of appointing a limited number of members by general election has been declared as a canker at the root of the local Self—Government. The very food of the local Self—Government has been turned into its poison because the Resident thinks that 'appointment by election is not really congenial to the native mind and he is of opinion that the nomination of members is a better system;' and we need not take our readers a step further to prophesy what will be the result of this subversive process of changing good things into bad ones. The result is plain enough but we shall be extremely sorry if it really happen in due course of time. India has fallen upon evil times and Berar must have its share in the general fate of the nation. The policy of repression has been the key-note of all measures of the Government a long time since. The Conservaties are in power and unless the ministry changes we do not hope for a better change. Lord Hamilton played the other day a sorry figure when he proposed an Indian loan of 10 millions sterling in England. He was highly optimistic and the pleasing strain of his Lordship's arguments was found fault with by Anglo—Indian papers also. The change in the policy accounts for all the backward movements in Indian polities. The reaction has upset all branches. No local Government have a free hand in the matter and the local self—government is the first object to receive the deadly poison of despotic bureaucracy. Berar was most sluggish to welcome a new light in the higher sort of a public life and is now first and foremost to close its shutters against the re-forming sun—shine of a moderate and limited school of the local self—government. In the midst of despair we can simply hope for a total collapse of the present policy and this hope is only the watchword of all political activities.

Commissions and committees are the fashion of the day. They are invented to shuffle off difficulties. The difficulties in their turn multiply and thicken and matters reach such a stage as renders quite useless the *wise* deliberations of the learned bodies. With Sir Henry Fowler as Chairman, the Currency Committee will begin their *blessed* work and will issue a resolution based on the collective strength and weight of their opinions. They will record the evidence from witnesses whom the Government of India will produce and will formulate their proposals in the light of the total resultant of the accumulated evidence. The constitution of the Committee is on a wrong basis. It is vitiated because there is not the proper representation of all shades of differing and diverging opinions. The Anglo—Indians claim the upper—hand in all matters. The official members will act in unison with the non-official element. Therein the British capitalists and commercial and banking persons will have the predominence. The Indian interests will be unrepresented. The Indian tax—payers will have no voice in the deliberations of the Committee. Pity that India should silently bear such an affront when the momentous question of its currency is at stake! The Committee will practically give weight and dignity of its august sanction to the proposals of the Indian Government. This will be the final result. Besides the selection of witnesses will lie in the power of the Government. Mr. Dadabhai Naoroji has contributed a letter to the last number of India in this connection. He writes rather in a strain of prophecy and points eloquently to the urgent want of the day. He closes his short letter with the following remarks:—

"Again, the Government of India has distinctly put down its foot that the mints must remain closed, and that a gold standard must be introduced, with its general indifference to the Indian taxpayer. Anyone who has carefully studied the tactics of the Governments of India in both countries knows that where once they come to a definite determination, they will carry these foregone conclusions by every possible device and "subterfuge," be the obstacles in their way what they may. I am sorry I do not see that much good can result from this Committee, with due consideration for the wretched taxpayer. I shall be glad indeed if I prove a wrong prophet.

It will also be observed that the Committee will not be open to the public. So that when the report is out, discussion or consideration by the public will be "too late," or at least profitless, when once the Government has attained its object. Open, immediate discussion in public, while the Committee is sitting is the only chance for any satisfactory result."

## वऱ्हाड

राव बहादूर सीताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. डायेरक्टर हे हक्काच्या रजेवर परत येऊन परवां शनिवारीं आपल्या कामीं रुजूं झाले. राव बहादूरानीं वऱ्हाडचा उन्हाळा टाळला यामुळें त्यांची शरीर प्रकृती चांगली असून कामाला ताजेतवाने होऊन आले आहेत.

रा. रा. कृष्णराव सदाशिव बापट राहणर मसवड जिल्हा सातारा हे अठरा अवधानें एकदम चालवितात. राजश्री कृष्णशास्त्री हल्लीं अकोल्यास आले असून त्यांचे प्रयोग येथें होणार आहेत. गृहस्थ गुणी असून ज्योतिषशास्त्रही कांहींसें जाणतात.

मि कथबर्ट फ्रेजर पोलीस सुपरिन्टेंडंट, उमरावती हे रजेवर विलायतेस असतांना मरण पावले हें कळविण्यास दुःख वाटतें.

रिव्हीजन सर्व्हेची सुनावणी बरोबर असून नवीन सारा वसूल करण्यासंबंधानें सुनावणी चुकीची झाली आहे असें ठरल्यावरून पुढील तारखांस त्या त्या गांवीं नवी सुनावणी वसूला संबंधानें खुद्द मे. डिपुटी कमिशनर साहेब करणार आहेतः—

| गांव | तारीख |
|---|---|
| कापशी | ५।६ जुलै |
| महान | ८।९ |
| कुरणखेड | ११।१२ |
| वाघोलि | १४।१५ |

अगदीं जुने अधिकारी मि० इलिएट हे असल्यामुळें जुडिशिअल कमिशनरच्या जागी त्यांचीच नेमणूक करण्यांत आली. ही मोठी समाधानीची गोष्ट होय. साहेब बहादूर लवकरच विलायतेहून परत येतील.

येत्या गुरुवारीं व शुक्रवारीं अकोल्यास सेशन कचेरी होणार असून दोन खुनाचे खटले व १ चोरीचा खटला असे तीन खटले चालणार आहेत.

हवामान—मृगनक्षत्रानें बहार करून दिली. तीन चार पाऊस चांगले झाले. हवेंत थंडपणा येत चालला आहे. पेरणीच्या कामाला सुरुवात झाली. नदीच्या पात्रांत पाणी खेळूं लागलें. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं. पारा ७४ पासून ९४ अंशा पर्यंत चढतो एकंदर पाऊस ४।५ इंच झाला.

मि० क्रे असिस्टंट कमिशनर यांची बदली इलिचपुराहून आकोल्यास झाली आहे.

रा० रा० गोपाळ वामन बापट एक्स्ट्रा असि० कमिशनर यांनीं आपल्या वडिलांच्या आजारीपणा मुळें दोन महिन्यांची रजा घेतली असून त्यांच्या मोर्शीच्या कोर्टावर रा० रा० नारायणसिंग बभूतसिंग तहशीलदार यांस एक्स्ट्रा असि० कमिशनर नेमून उमरावतीहून पाठविण्यांत आलें.

'वणीकर' गृहस्थ कळवितात कीं मुकाम बोरि तालुके केळापूर येथील शाळा सुस्थितीला येत चालली असून तिला मदत रा. रा. नारायण सखाराम पाटील, टाकळी यांची आहे. हे गृहस्थ सार्वजनिक कामांस चांगला हातभार लावीत असतात. बोरीच्या आसपासच्या ८।१० मुलांस पर्जन्यकाळांत त्रास पडूं नये ह्मणून स्वतांच्या खर्चानें ते त्यांची जेवणाखाण्याची सोय करणार आहेत. या स्तुत्य उद्योगा बद्दल व विद्येच्या गोडी बद्दल ते लोकांच्या आदरास विशेष पात्र आहेत.

### नोटीस

रेखचंद मोहता मारवाडी दुकान हिंगणघाट तहशिली वर्धा यांस.

खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं मौजे खेरगांव प्रगणे राळेगांव तालुके केळापूर जिल्हे वणी हा गांव इजारा गुजाबाराव गंगाधर देशपांडे व बळवंत गंगाधर देशपांडे या उभयताचें नांवें असून त्यांत गुजाबाराव गंगाधर देशपांडे याचा हिस्सा ॥=८ तुमचेकडेस आहे. असे असून तुह्मी सन १८९६।९७ व सन १८९७।९८ सालचा वायदा आमचे ।–४ हिशासुद्धां व अर्ज करून तुह्मी घेऊन गेला. त्या रुपयाबद्दल तुह्मास दोन चार वेळां मागणें केलें परंतु तुह्मी अद्यापि रुपये पाठविलें नाहीं. याजकरितां या नोटिशीनें तुह्मास कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत आमचे रुपये ६०० सहाशें तुह्मी पाठवून द्यावे. मुदतींत रुपये न आल्यास तुमचेवर दिवाणी कोर्टात दावा करून व्याजासुद्धां व कोर्ट खर्चासुद्धां रुपये तुमचे पासून घेतले जातील कळावें. ता. १४।६।९८ इसवी.

(सही) बळवंत गंगाधर देशपांडे
इजारदार खेरगांव.

## वर्तमानसार

एखाद्या ठिकाणीं मोठें वादळ झालें ह्मणजे त्याचा प्रभाव अमुकच मैल पर्यंत चालतो असें नकी सांगतां येत नाहीं. निरनिराळ्या वादळाच्या जबरदस्तपणावर तें अवलंबून असतें. साधारणतः ६० मैलांच्या वर्तुळांत वादळाचा प्रभाव असतो. कधीं कधीं त्याच्या दुप्पट तिप्पट विस्ताराच्या प्रदेशांतही तो होतो. केव्हां केव्हां एक वादळ सर्व युरोपभर पसरलेलें इतिहासांत नमूद आहे. एकदां वादळ झालें ह्मणजे तें नष्ट होईपर्यंत सारखेंच राहतें असें नाहीं. कधीं त्याचा जोर फार असतो व कधीं कमी असतो. वादळाच्या प्रवासाची गति दर तासास १९ पासून ४० मैलपर्यंत असते. वादळाच्या गतीवरून त्याच्या जोराचें अनुमान करितां येत नाहीं. तें अनुमान करणें वायूचा जो मध्यस्तंभ बनतो त्यावर अवलंबून आहे. युरोप, अमेरिका वगैरे ठिकाणीं वादळाची गति ६०।७० मैल इतकी दर तासांत असते.

वाघ सिंहापेक्षां शरीरानें मोठा हें निर्विवाद आहे. आणि त्यांतही हिंदुस्थानांतलि वाघ सगळ्यांत मोठा असें सिद्ध झालें आहे. व्यक्तिव्यक्तीच्या मानानें, वाघ निरनिराळ्या उंचीचे व वजनाचे असतात. पुरा वाढलेला नर नऊ पासून बारा फूटपर्यंत लांब असतो. क्वचित् १९ फूटपर्यंतही लांब असे वाघ आढळतात. व एक नाकाच्या शेंड्यापासून तों शेपटीच्या टोंकापर्यंत १८ फूट भरल्याचेंही उदाहरण आहे. निरनिराळ्या देशांतील सिंह लांबी उंचीनें निरनिराळे असतात. आफ्रिकेतला पुरा वाढलेला सिंह २० फूट लांब आणि खांद्यापर्यंत तीन फूट आठ इंच उंच असा असतो. फार झालें तर त्याची लांबी तेरा फूटांपर्यंत असलेली आढळलेली आहे. वाघाच्या पुढच्या पंजांतल्या शक्तीचा जोर जर १०० आहे असें धरलें तर सिंहाचा ८१ १/३. असतो व मागल्या पंजांत ६५ १/२. इतका असतो. पांच माणसें सिंहाला दाबून बसवू शकतात. परंतु वाघास नऊ पुरत नाहींत.

बारीकसारीक धर्मभेद लक्षांत घेतले तर धर्मभेदाची गणती होणें शक्यच नाहीं. मुख्य धर्म धरले तरी फक्त सहाच होत. ते हिंदुधर्म, पार्शीधर्म, बुद्धधर्म, यहुदीधर्म, ख्रिस्तीधर्म व महमदीधर्म. आणखी जे अनेक धर्म आहेत ते यांपैकीं कोणच्या तरी धर्मांच्या शाखाच होत ह्मटलें तरी चालेल मि० सिम्स यांच्या धर्मकोशांत त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, ही गणति करणें शक्य नाहीं. कारण आपणांस अद्यापि माहीत नाहींत असे धर्म किती तरी आहेत! तथापि स्थूल मानानें पाहतां सुमारें सातशे धर्म आहेत असें ह्मणावें लागतें.

मध ह्मटला ह्मणजे तो मधमाशापासूनच होतो असा साधारणतः आपला समज आहे परंतु मधमाशांखेरीजही कांहीं प्राणी मध काढतात असें आढळून आलें आहे. खुद्द आपल्या हिंदुस्थानांत कोकम जातीचे कांहीं किडे आहेत. ते किडे मध तयार करितात. आस्ट्रेलियांत एक जातीची मुंगी आहे ती मध जमा करून ठेवते. ब्राझिल देशांत एक प्रकारची गांधिल माशी आहे ती मध तयार करते परंतु हा मध उपयोगीं लावणें फार भयंकर आहे, कारण त्यापासून नेहमीं चक्कर येते. दक्षिण अमेरिकेंत असाच एक कीटक आहे. ह्या कीटकाची व मधमाशाची जात एकच आहे असें ह्मणतात. तो मध पुष्कळ जमा करतो. बांबुरो नांवाचे कांहीं प्राणी आहेत त्यांचे तांडेचे तांडे सीलोनमध्यें रानांत जाऊन मध गोळा करीत असतात. अमेरिकेंत कांहीं प्रकारच्या मुंग्या आहेत त्या जमिनीच्या पोटांत आपलें वारुळ करितात, परंतु त्यांचा एक विशेष असा आहे कीं, त्यांच्यातील कांहीं मधवाहक ह्मणूनच असतात. इतर सर्व मुंग्या सगळीकडून अन्न आणतात आणि तें त्यांच्यापुढें ठेवतात, व ते मधवाहक खाऊन आपल्या पोटांत सांठवन ठेवतात आणि त्या अन्नाचें मधाच्या रूपानें रुपांतर होऊन तो मध इतरांना खाण्यास उपयोगी पडतो. त्या मधवाहक मुंग्या ह्मणजे नुसत्या मधाच्या पिशव्याच होत.

प्रत्येक मनुष्यजातींत कांहीं धर्महीन लोक असतील ते निराळे. परंतु संबंध जातची जात धर्महीन किंवा धर्मकल्पनाहीन असेल असें सहसा वाटत नाहीं. कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें देव-एक किंवा अनेक—मानणारे असेच लोक कोठेंही असतील, असा साधारण समज आहे. परंतु आतां असें पक्कें आढळून आलें आहे कीं पृथ्वीच्या पाठीवर कित्येक भागांत कित्येक रानटी लोक आहेत त्यांस धर्माची, देवाची किंवा तत्संबंधी कशाची कल्पना नाहीं. त्यांचे भाषेंत देव हा शब्दच नाहीं. डार्विन यांनीं आपल्या एका ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, ज्यास आपण देव असें ह्मणूं अशावर परफ्युजियन लोकांचा मुळींच भरंवसा नाहीं. ते धर्मक्रिया ह्मणून कांहींही करीत नाहींत. पाटागोटेनिअन व अरोकेनियन यांस प्रार्थनाबुद्धीचा किंवा धर्मबुद्धीचा गंधही नाहीं. ब्राझिल देशांतील इंडियन लोकांस धर्म मुळींच ठाऊक नाहीं. दक्षिण अमेरिकेंतील इंडियन लोकांस धर्मपुजा किंवा मुळींच माहिती नाहीं. फादर बगर्ट नांवाच्या एका मिशनरीनें कालिफोर्नियामधील इंडियन लोकांत सतरा वर्षे काढलीं. व त्यांचें असें ह्मणणें कीं, खरे किंवा खोटे कोणचेच देव त्या लोकांस माहिती नाहींत. धर्मक्रिया ह्मणजे काय याचें ज्ञान नाहीं. आस्ट्रेलिया व न्यू गिनी या दोहोंच्या दरम्यान एक बेट आहे त्या बेटांत असणाऱ्या लोकांस धर्माचा गंधही नाहीं. अंदमान बेटांतील मुळच्या राहिवाशांस अाच प्रमाणें धर्मीयें वारें नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत हिमालयाचे पायथ्याजवळ लेपचा नांवाचे लोक असतात त्यांसही धर्माची कल्पना नाहीं. काफीर लोकांपैकीं कित्येक जातींचें असें मत आहे कीं, सर्व जें कांहीं होतें तें आपोआप होतें. झाडें जीं वाढतात तीं स्वेच्छेनें वाढतात.

कांहीं वर्षांपूर्वी इंग्लंडांत अशी एक विलक्षण चाल होती कीं, कोणीही धर्माध्यक्ष ( बिशप ) वारला तर त्याचे पायथ्याशीं एक कुत्रें पुरावयाचें. हेतु हा कीं, कुत्रा ज्याप्रमाणें आपल्या धन्याशीं अत्यंत इमानानें व प्रेमानें वागतो त्याप्रमाणें हे धर्माध्यक्ष ख्रिस्ताशीं वागले असें दाखवावें. तेराव्या शतकांत ख्रिस्ती व महंमदी लोकांत धर्मयुद्धें झालीं त्यांत जे ख्रिस्ती मारले गेले, त्या ख्रिस्ती वीरांच्या मूर्ति पुरल्या असतां त्यांच्या पायाखालीं एक कुत्रें गाडलेलें असें, हेंही त्याच हेतूनें असावें. क०

बंगाल्यांतील मोठा दंगा—बंगाल प्रांतांत चोवीस परगण्यांतील चंपाहट्टी नामक गांवीं दंगा होऊन मीठखात्यापैकीं सहा सरकारी अंमलदार मारिले गेले. बगाल्यांत मिठासंबंधानें कायदा जेव्हां पास झाला, तेव्हां खासगी मीठ तयार करणें अपराध ठरला गेला परंतु सुंदरबनांत चोरून मीठ तयार करण्याचे कांहीं कारखाने चालू होतेच. असे कारखाने हुडकून काढण्याकरितां मीठखात्यांतील कांहीं अधिकारी निघाले. दंगा होण्याचा संभव असल्यानें मीठखात्यापैकीं एक युरोपियन कामगार व मीठसबइन्स्पेक्टर हे, त्या प्रांतांतील कांहीं पोलिस अधिकाऱ्यांस बरोबर घेऊन गेल्या महिन्याचे सत्तावीस तारखेस, संशय असलेल्या घरांचा झाडा घेण्यास निघाले. ह्यांना पाहिल्याबरोबर घरांचा मालक 'प्लेग टोंचणारा आला!' ह्मणून ओरडला. त्याबरोबर २००० गांवढळ सोटे वगैरे घेऊन येऊन त्यांणीं या मंडळीवर हल्ला केला. त्या दंग्यांत ते युरोपियन अधिकारी, चारपांच सबइन्स्पेक्टर व कांहीं शिपाई ठार झाले व दंगेखोरांनीं प्रेतें नदींत टाकून दिलीं. बाकीची मंडळी पळून आली व त्यांनीं चोवीस परगण्यांतील पोलिसांस वर्दी दिली. तेव्हां डि० मॅजिस्ट्रेट एक पोलिसपार्टी बरोबर घेऊन त्या ठिकाणीं गेले व दंगेखोरांपैकीं ४०।९० आसामी पकडले आहेत.

धूमकेतूंची उष्णता—शेंडे नक्षत्रांवरील उष्णता, तापवून लाल केलेल्या लोखंडापेक्षां २००० पटींनीं अधिक आहे असें ज्योतिःशास्त्रवेत्ते सांगतात!

बटाट्यावर कलम—एका फ्रेंच कृषिशास्त्रज्ञानें बटाट्याचे झाडावर टोम्याटो नांवाच्या फळझाडाचें कलम करण्याची नवीन योजना काढली असून ती योजना उत्तम रीतीनें सिद्ध झाली आहे. असें कलम केल्या नंतर बटाटे जमिनींत येऊन टोम्याटोचीं फळें मात्र त्या बटाट्याचे झाडास वर येतात. आणि तीं दोन्ही चांगलीं पुष्ट असतात, असें अनुभवास आलें आहे.

चमत्कारिक गोष्ट.—कोपरगांवापासून राहुरीपर्यंत जो रेलवेचा रस्ता आहे त्यावर कित्येक ठिकाणीं रात्रीं ७ वाजेपासून तों सकाळीं आठ वाजेपर्यंत फार विलक्षण प्रकारचे किडे सडकेवर व रोळावर व पायवाटेवर सुद्धां जणूं काय खडी पसरल्याप्रमाणें अगदीं दाट पसरतात; त्यांवरून जेव्हां गाडी चालते तेव्हां ते चाकांखालीं चिरडून त्यांच्या अंगाच्या चिकोट्यानें गाडी चालत नाहीं! बुधवार ता० १८ मे रोजीं सकाळीं ८ वाजतां लाख स्टेशना पासून राहुरी स्टेशनाकडे येत असतां राहुरी स्टेशनापासून २ मैलांवर मालगाडी आली, पण पुढें कांहीं ती चालेना; कारण, त्या पसरलेल्या किड्यांचा चिकोटा रोळाला व चाकांला निसटूं लागला. यामुळें ड्रायव्हरनें गाडीचे दोन भाग केले; एक भाग अगोदर नेऊन स्टेशनावर सोडला व पुन्हां परत जाऊन दुसरा अर्धा भाग नेला. गोगलगाई प्रमाणें यांच्या अंगीं चिकटपणा फार आहे. किड्यांचा रंग किंचित् पांढरा काळसर आहे. आकार मोठ्या झुरळा प्रमाणें आहे. त्यांस पंख आहेत. मनुष्य जवळून चालला ह्मणजे ते पुढें उडत जातात. जसजसें ऊन पडतें तसतसें जमिनींत ते घुसतात व दिसत नाहींत पण पुन्हा रात्रीं निघतात. ह्या किड्यांचा चालण्याचा रोख उत्तरेकडून दक्षिणेकडे आहे. दुष्काळ गेला, प्लेग येतो जातो व पुन्हां हे कीटक दृष्टीस पडूं लागले आहेत! ज्ञा० च०

अंबाल्याकडील एका संस्थानिकानें आपल्या प्रजेंत असंतोष झाला आहे त्यामुळें गुरखे लोकांची एक तुकडी आपल्या राजधानींत ठेवण्याविषयीं पंजाबच्या ले० गव्हरनरास विनंती केली, त्यावरून त्यास हुकूम फर्माविण्यांत आला आहे कीं, तुह्मी राज्य चालविण्यास अयोग्य आहां. ह्मणून सरकार आपल्या अंमलदाराकडून तो चालवील, त्यास तुमचा सल्ला असावा, किंवा आमण पेनशन घेऊन संस्थानाचा संबंध सोडावा. निकाल उत्तम, पण तो इंग्रजी कामदारांस लागूं नाहीं!

पेशावर येथें भयंकर अग्निप्रलय होऊन ४००० घरें जळालीं व चार कोटींचें नुकसान झालें असें ह्मणतात. आणि पुन्हा दुसरीही आग लागून बरेंच नुकसान झालें नवीन इमारती चांगल्या सुबक व नमुनेदार बांधल्या जात आहेत आणि त्यांत लोखंडाचा उपयोग फार करितात.

सुमारें ३०० हिंदु विद्यार्थी हल्लीं इंग्लंडांत राहून विद्याभ्यास करीत आहेत.

नुकतीच बेळगांवाकडे एक कोणी पराक्रमी ब्राह्मण विधवा बाई एका दरोड्यांत सामील असल्याच्या आरोपावरून पोलिसानें पकडली आहे.

रेलवे कानफरन्स—लवकरच सिम्ला येथें रेलवे संबंधानें काय सुधारणा व व्यवस्था केल्या पाहिजेत ह्याबद्दलचा विचार करण्यासाठीं कानफरन्स भरणार असून, त्या परिषदेचें अध्यक्षस्थान खुद्द लार्ड एल्गिन हे स्वीकारणार आहेत. क० त.

अमेरिकेनें मनिलावर स्पॅनिश लष्कराची जबरदस्त धुळधाण उडविल्यानंतर, त्याच्या आसपासच्या गांवांत बंडें सुरू झालीं आहेत. फिलीपाईन येथील स्पेनच्या गव्हरनरानें तारेनें स्पेन सरकारास कळविलें आहे कीं, इंग्लंडची मदत न मिळाली तर समुद्रांत व इतर भागांत शत्रूच्या लोकांनीं जीं बंडें सुरू केलीं आहेत त्यांचा बंदोबस्त होऊं शकणार नाहीं. ह्या गव्हरनरानीं मनिलाच्या किल्याचा आश्रय घेतला आहे, व तेथून शत्रूचा पाडाव करण्याची ह्यांनीं तयारी चालविली आहे. अमेरिकन काफल्याच्या वरिष्ठांनीं तारेमार्फत असें कळविलें आहे कीं, गेल्या सोमवारीं त्यांनीं सानतीयागोच्या किल्यावर तीन तास पर्यंत सारखा तोफांचा मारा चालवून आंतील वाटा बंद केल्या होत्या. सर्व किल्यांचा नाश झाला आहे. स्पॅनीशच्या एका लढाऊ जहाजास तोफांचा मारा बसल्यानें त्यावरील मुख्य अधिकारी व ६ दुसरे इसम मरण पावले व ७० लोक जखमी झाले लष्करापैकीं २ अंमलदार व १८ शिपाई ह्या माऱ्यांत मरण पावले. स्पेन गव्हरनर शरण आला आहे. स० वि०

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Six monthly........ 3 ................ 8 as

Single copy ................................4 as

किरकोळ अंकास ......................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ८६

दुसरे खेपेस .... .........८१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisemen

Below 10 lines ......2 R

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3

THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 27 JUNE 1898 NO 25

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख २७ माहे जून सन १८९८ इ० अंक २५



नोटीस.

बेशमी इंद्रभान वल्लद रामजी पाटील मौजे कळम्ब तालुका बाळापूरः-यांस खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचीं शेतें तीन मौजे मजकूरचे सर्व्हे नंबर २८, ५९, पैकीं व ६० पैकीं हीं नफ्यानें वाहिली. या पुढें आह्मास जास्ती नफा येतो. इतर लोक हीं तीन शेतें २०० रुपयांस वहितीला मागतात. तुह्मास २०० रुपये कबूल असल्यास हीं शेतें तुह्मी वहावीं कबूली नसल्यास शेतें सोडून द्यावी. नोटिशीच्या तारखे पर्यंत किस्तकागी वगैरे संबंधानें तुमचें नुकसान होईल तें आह्मी भरून देण्यास तयार आहों. या नोटिशी नंतर तुह्मी हीं शेतें वहित केल्यास तुह्माकडून २०० रुपये वायद्यासुद्धा भरून घेतले जातील कळावें तारीख २५ जून सन १८९८ इसवी.

( सही )

मंगणीराम तनसूकराय तर्फे
हिरानंद मणीराम दस्तुर
खुद्द.

नोटीस

रा. रा पांडूरंग यादोराव पाटील राहणार टाकर खेडें तालुके मलकापूर, आणि यांचे जामीनदार रा. रा. सीताराम वल्लद रूपचंद पाटील राहणार पिंपळगांव काळे तालुका जळगाव यांस.

खालीं सही करणार यांजकडून या लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्मांकडे आमच्या दुकानची बाकी संवत १९५४ अश्विन शुद्ध ९ माहे रोजीं रुपये ५१० मुद्दल व त्याशिवाय रजिष्टर नोटीशीच्या खर्चाबद्दल आणे चार मिळून रुपये ५१०८४ निघाली होती ती तुह्मी आमच्या मागणी प्रमाणें आणून दिली नाहीं सबब सदर्हू मित्ती पासून दरमहा दरशेंडा १ रुपये व्याजाच्या हिशोबानें सर्व रक्कम आमच्या दुकानीं आणून पोचती करावी व ही गोष्ट करण्याला तुह्मास नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांची मुदत दिली आहे. रितीप्रमाणें व्यवस्था न झाल्यास कोर्ट मार्फत सर्व खर्चासह तुह्माकडील कर्ज वसूल करण्यांत येईल. तारीख १९।६।९८.

सही

नैनसूकदास गोकूळदास दुकान
खामगांव मालक गोकूळदास
दस्तुर खुद्द.

जाहिरात.

सर्वत्र लोकांस आणि मुख्यत्वेंकरून पोकरण जिल्हा जोधपूर भागांतील लोकांस कळविण्यांत येते कीं माझा मुलगा चिरंजीव रघुनाथदास टिकमदास सेवक राहणार पोकरण जिल्हा जोधपूर हा हल्लीं पोकरणास रहात असून गैर मार्गानें वागत आहे आणि माझ्या इच्छेविरुद्ध व आज्ञेविरुद्ध कांहीं देवघेव करण्याच्या ढंगांत आहे असें कळतें ह्मणून सर्व लोकांस विनंतीनें कळवितों कीं सदरहू चिरंजीव रघुनाथदास यांस कोणी कर्ज देऊ नये किंवा त्याच्यापासून स्थावर जंगम गहाण किंवा खरेदी घेऊ नये. जर कोणी त्याच्याशी व्यवहार करील तर ज्याचा तो जबाबदार होईल आणि तत्संबंधी कोणतीही तोशीस माझ्या स्थावरजंगम इस्टेटीला पोचणार नाहीं. कळावें, तारीख १९. माहे जून सन १८९८ इसवी.

( सही. मारवाडींत )

टिकमदास मेघराज सेवक राहणार
हल्लीं खामगांव दस्तुर खुद्द


वऱ्हाडसमाचार

मित्ती आषाढ शुद्ध ८ शके १८२०

मि० ग्लाडस्टन यांच्या मरणा संबंधाच्या दुःखोद्गारांनीं ब्रिटिश राष्ट्रच काय पण सर्व जग अगदीं विव्हळ होऊन गेलें! मि० ग्लाडस्टन सारखा महात्मा पुन्हां क्वचित् दृष्टीस पडेल. या थोर पुरुषाच्या गुणानुवादानें सर्व ब्रिटिश राष्ट्र दुमदुमून गेलें आहे अशा वेळीं त्या अलौकिक पुरुषांपासून इंडियन राष्ट्राला काय काय गोष्टी लाभल्या आहेत हें माहित असणें फार अगत्याचें आहे. चांगल्या माणसाची गोष्ट कांहीं निराळी असते. त्याचा अप्रत्यक्ष लाभ देखील मोठ्या महत्वाचा असतो. कै. ग्लाडस्टन ह्मणजे न्याय, सत्यप्रीति, दृढ निश्चय, दीर्घ उद्योग इत्यादि गुणांची साक्षात् मूर्तीच होते. त्यांच्या कारकिर्दीचा या देशास मोठासा फायदा झाला नाहीं तथापि त्यांच्या अल्प गोष्टींत देखील तत्व मोठें असून त्यांच्या उदार चरिताची खूण पटते. सर हद्दीवरील लढाई चालू आहे तिचा खर्च सर्वथैव इंडियावर बसविला आहे. सर रोमेशचंद्र दत्त यांनीं विलायतेस बोलून दाखविलें कीं आफगाणिस्थानाशी मागें वीस वर्षां पूर्वीं लढाई झाली तेव्हां मि० ग्लाडस्टन यांनीं इंग्लिश खजिन्यांतून १८८० सालीं ५० लक्ष पौंड त्या लढाईच्या खर्चा निमित्त इंडियाला देवविले. लार्ड बिकन्सफिल्ड यांच्या प्रधानकींत नेटिव वर्तमानपत्रा संबंधानें कडक कायदा झाला आणि तो मि० ग्लाडस्टन यांनीं रद्द केला. मि० ग्लाडस्टन यांच्या कारकिर्दींतच लार्ड रिपन व्हाइसराय होऊन आले. त्यांच्याच कृपाप्रसादानें लोकल बोर्डांची स्थापना झाली व मुनसिपालिट्यांत ही लोकमताचे सभासद नेमण्याची पद्धती चालूं झाली. हल्लीं त्याच्या उलट सर्व गोष्टी घडत आहेत तेव्हां वाईट गोष्टीच्या समीपतेनें मि. ग्लाडस्टन यांच्या उत्तम उत्तम गोष्टी किती चांगल्या खुलतात बरें! कस्तुरीचा आमोद स्वभावतःच साम्राज्य स्थापितो पण दुर्गंधीच्या ठिकाणीं तिचा परिमल किती खुलतो व बहारी देतो याचा अनुभव सर्वत्रांस आहे. जों पर्यंत मि. ग्लाडस्टन यांचें नांव इंग्लिश इतिहासांत पवित्र व चिरस्मरणीय आहे तोंपर्यंत त्यांनीं दर्शविलेल्या दिशेनें इंग्लंड इंडियाचा फायदा करील अशी आह्मास बळकट आशा आहे. मि. ग्लाडस्टन यांच्या सत्कृतीच्या पायावर इमारत किती नामी होईल बरें!

## जंगलखातें

( १८९६-९७ चा रिपोर्ट )

जंगल खात्याचा १८९६-९७ चा रिपोर्ट आह्माकडे आला आहे त्याचा आभारपूर्वक स्वीकार करून त्यांतील उपयुक्त माहिती आह्मी एकत्र करण्याचा विचार केला आहे. वऱ्हाड प्रांताचें क्षेत्रफळ १७७३६ चौरस मैल आहे त्या पैकीं शेकडा २३,६ या प्रमाणानें ४१७९ चौरस मैल जंगलखात्याकडे आहेत. सरकारी फारेस्टाचे वर्गवारीनें तीन प्रकार आहेत. अ वर्गांत साग, इंधन वगैरे ज्या जगलांत उत्पन्न करितात तें जंगल येतें; त्याचा विस्तार १५१९ चौरस मैल आहे. ब वर्गांत सरकारी कुरणें येतात. अशीं कुरणें ९२ चौरस मैल आहेत. गुरांस चरण्यासाठीं राखलेलें रान क वर्गांत येतें. या रानांचा विस्तार २५६८ चौरस मैल आहे. रिपोर्टीच्या वर्षीं २३७५ एकर जमीन बंदी जंगलांतून कमी केली असून चराईच्या गायरानांत २२२९ एकर अधीक घेतले आहेत.

जंगल खात्याचा गेल्या दुष्काळाच्या वेळीं मोठा उपयोग झाला. १८९५।९६ सालीं ४५९९३० घन फूट साग विकला होता पण दुष्काळामुळें ५०३४३९ घनफूट साग विकण्यांत आला. मि० बागशा कानसरव्हेटर यांनी लिहिलें आहे कीं मेळघाटांत कुर्क व इतर गरीब लोक पुष्कळ राहतात; त्यांचा उदरनिर्वाह साग कापून बाहेर गांवीं रवाना करण्याच्या धंद्यावर चालतो. दुष्काळांत त्यांस मदत करण्या करितां साग फार स्वस्त दरानें सरकारांतून विकण्यांत आला आणि त्यामुळें साग अधीक कापण्यांत येऊन बाहेर गांवीं धाडण्यांत आला. वणी जिल्ह्यांत इंधनाच्या लांकडाचे शिरबोजे फार कमी दरानें नेण्याचा हुकूम दिला होता व फ्याक्टरीचें काम नीट चाललें नाहीं त्यामुळें जळण फार स्वस्त झालें होतें. गवत १८९५।९६ सालीं ३६७९९ रुपयांचे विकण्यांत आलें होतें पण दुष्काळामुळें गवताचा खप मोठा झाला व त्याची किंमत ७३९५५ रुपये आली. जंगलांत उत्पन्न होणाऱ्या इतर पदार्थांचें उत्पन्न देखील पुष्कळ कमी झालें. हिरडा व लाख यांचें पीक फार कमी झालें; आणि त्याशिवाय मोहो व आंबा यांचें उत्पन्न व शिंदीचीं पानें हीं गरीब लोकांस खाण्यासाठीं देण्यांत आलीं. दुष्काळा मध्यें गरीब लोकांस मदत करण्यासाठीं मेळघाट तालुक्यांत साग, वेळू, कोळसा, इंधनाचे शिरबोजे, इत्यादि संबंधाचे दर पुष्कळ स्वस्त केले होते. बंदी जगलांत देखील तीन महिनेपर्यंत गवत कापण्याची फुकट परवानगी देण्यांत आली होती; आणि पावसाळा सुरू झाला तेव्हां गरीब लोकांस झोंपडीं बांधण्यासाठीं गवत फुकट दिलें होतें. उमरावती, आकोला व बुलढाणा या जिल्ह्यांतील कांहीं कांहीं भागांत जंगलांतून इंधनाचे शिरबोजे फुकट नेण्याची परवानगी दिली होती. बंदी जंगलांतील गवत फुकट कापून नेण्याची परवानगी होती. मोहो, चार, गोंद शिंदी वगैरे पदार्थ लोकांस खाण्यासाठीं सदर परवानगी होती. नद्या, ओढे वगैरे पुष्कळ आटले आणि त्या कारणानें कित्येक गवताचीं रानें निरुपयोगीं झालीं होतीं.

दुष्काळा निमित्त गरीब लोकांस ज्या सवलती देण्यांत आल्या त्यांचा अंदाज खालील आंकड्यावरून चांगला होईल.

| पदार्थ | माफी | विक्री. |
|---|---|---|
| साग (घन फूट) | २६९७१४ | ५०३४३९ |
| इंधन " | ११८२०७७ | ९६२२२९ |
| वेळूंची संख्या | १२९८६७४ | ११८०८२४ |
| गवत रुपये | ३४२९ | ७३९५५ |
| चराई | १६१९२० | २१४६१० |
| किरकोळ उत्पन्न | ३७५०९ | २०७८४ |

एकंदर माफीची किं. रु. ३५५०४१. एकंदर विक्रीची किंमत रु. ४९१९७८.

लोकांस सरकारी जंगलखात्याचा उपयोग पुष्कळ झाला आणि कानसरव्हेटर मि. बागशा यांनीं गरीब लोकांवर मोठी दया केली आणि त्यांचे जीव दुष्काळांत वाचविण्यासाठीं त्यांनीं स्वतां जातीनें पुष्कळ खटपट केली याविषयीं त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

गेल्या ७ वे तारखेला इंडियासाठीं इंग्लंडांत १ क्रोट पौंड कर्ज काढण्याविषयींचें बिल लार्ड हामिल्टन स्टेट सेक्रेटरी यांनीं पार्लिमेंटपुढें आणिलें आणि तें बिल पासही झालें ही गोष्ट सर्वश्रुत आहे. या बिलाचा विचार चालला असतांना जो थोडा वादविवाद झाला त्याचें टिप्पण गेल्या १० जूनच्या 'इंडिया'च्या अंकांत समग्र प्रसिद्ध झालें आहे. हा वादविवाद मोठा चमत्कार वाटण्या सारखा झाला आहे. इंडियाची सांपत्तिक स्थिती शोचनीय असल्यामुळें कर्ज काडण्याची गरज पडली आहे ही गोष्ट अगदीं विसरून गेल्या सारखें करून स्टेट सेक्रेटरी यांनीं इंडिया सरकारचा धन्यवाद गाईला आहे. लार्ड एलजिन यांची कारकीर्द मोठी वर्णनीय आहे आणि इंडियाची स्थिती आहे त्यापेक्षां अधीक चांगली करण्यासाठीं ही कर्जाची अजब युक्ति आहे इतकाच स्टेट सेक्रेटरीच्या भाषणाच सारांश आहे. नामदार भावनगरी यांनीं दखाल आपल्या भाषणानें इंडियावर उपकार केले आहेत. सर फौलर यांनीं स्टेट सेक्रेटरीचाच सूर ओढला आहे. अशी दशा पार्लमेंटांत होत गेली तर इंडियाच्या आशा सर्व आजच खुंटल्या प्रमाणें आहेत. सर्व गोष्टींचा चमत्कारिक विपर्यास घडला आहे. रडण्याच्या प्रसंगीं आनंदाचें वागडणें चालावें तद्वत् गोष्ट पार्लमेंटांत इंडियन प्रश्नासंबंधानें होत असते. सर वेडरबर्न यांनीं मोठ्या जोरानें इंडियाची बाजू सांगितली पण त्यांच्या त्या अमोल बुद्धिवादाला स्टेट सेक्रेटरी तुच्छ मानतात हें आमच्या देशाचें प्रारब्ध होय! वस्तुस्थितीचा विपर्यास करणें म्हणजे हर्षाहर्षानें निषेध्या लहरींत आत्महत्या करण्या सारखें आहे.

## दुश्चिन्ह

हल्लीं सरकारची राजनीतीच बदलली आहे. चांगल्या गोष्टी देखील वाईट ठरत चालल्या आहेत. लोकांच्या हक्काची पायमल्ली होईल, सरकारी शह अधीक जोराचा बसेल आणि चोहींकडून लोकमताचा धिक्कार होत जाईल अशा प्रकारची व्यवस्था सर्वत्र चालू आहे. राजद्रोहाचा नवा कायदा पहा, सरहद्दी वरील लढाईचा बेताल खर्च इंडियावर संपूर्ण लादा, करेन्सी कमिटीचीं कामें गुप्त ठेवून सर्व राष्ट्राच्या चलनी नाण्यांत क्रांती करा, वर्तमान पत्रांचीं तोंडें मुसकट बांधून बंद ठेवा, व प्रसंगविशेषीं पत्रकारांपासून योग्य जामीनदार घ्या, देशाचा खजिना रिता पडून दिवाळें निघूं लागलें म्हणून विलायतेंत १ कोट पौंड कर्ज काढा, नादारीच्या स्थितीला श्रीमंती वैभवाच्या ऐश्वर्याची उपमा द्या, या व आणखी अशा हजारो गोष्टी करा म्हणून सांगण्याचा गुरुमंत्र सरकारानें जपण्यास प्रारंभ केला आहे. ही राजपद्धती दडपून जबरदस्तीनें साम्राज्य स्थापित करण्याची होय. अलिकडे तिच्यामुळें राजा व प्रजा यांच्या मधील प्रेमभावांत अंतर पडत चाललें आहे. इंडियन प्रजेचें ब्रीद राजभक्तीचें आहे म्हणून निराळें प्रतिपादन करण्याचें प्रयोजन नाहीं. राजभक्तीच्या महिम्यानेंच प्रस्तुतचा राज्यकारभार आह्मांस चुकीचा वाटत आहे. इंग्रजी राज्याचा पाया राजनिष्ठेच्या भक्कम पायावर कायमचा असावा याच चिंतनानें आह्मी सध्यांच्या राज्यकारभारांतील दोष अगदीं मोकळेपणानें सांगत आहों. उदार राजनीतीच्या तत्वांस तिळांजली दिली जात आहे म्हणून सर्वत्र इंडियन प्रजेला मोठा खेद वाटतो. राष्ट्रनौकेचें सुकाणूं फिरल्यामुळें सांप्रतचे कर्णधार निरनिराळ्या अदृष्टपूर्वक प्रदेशांतून मार्ग क्रमीत आहेत. कधी कधीं वेगाची दिशा बदलल्या कारणानें ही नौका मार्गें मार्गें सरून जोरानें खडकावर आदळत आहे. आंग्लो-इंडियन अधिकारांच्या लहरी नौकाची नौका उलथीपालथी करून टाकीत आहेत अशा स्थितींत नौकेंतील उतारूंची सावरासावर कितीशी उपयोगीं पडणार आहे हें वरच्या वरच दिसत आहे.

लार्ड रिपन व्हाइसराय असतांना स्थानिक स्वराज्याचें देव्हारें माजलें आणि त्या कारणानें लोकमताचें प्राबल्य वाढत चाललें ही गोष्ट सरकारच्या नजरेला येऊन चुकली त्याबरोबर स्थानिक स्वराज्याचीं पाळीं मुळीं खणून टाकण्याला सुरुवात झाली आहे. प्रथम हल्ला लोकमतानें निवडलेले सभासद वर आहे. लोकमताचे सभासद नकोत असा सरकारचा हट्ट दिसतो. मुनासिपालिट्या व लोकल बोर्डे या स्थानिक स्वराज्याच्या संस्था आहेत. त्यांत लोकांनीं बहुमतानें निवडलेले सभासद नेमण्याची गरज नाहीं असें प्रस्तुतचें धोरण आहे.

## "दार्जिलिंगचा प्रवास"

नं. २

डोंगरगडचे स्टेशनावर दूध मिळतें. गाडी बराच वेळ थांबते. म्हणून आह्मी प्लॅटफार्मवर उतरून दुधाचा चांगला समाचार घेतला. व स्टेशनच्या पाठीमागें जाऊन डोंगरगडाचा देखावा पाहण्या साठीं नयन शकुंतानां मोकळे सोडलें. त्यांनीं ही तेथील वन्य शोभा पाहण्यास कांहीं कमी केलें नाहीं. येथलें पाणी ही फार मधुर लागलें इतक्यांत 'टठंठंठठंठंठठंटठंट ;' असें सूचक शब्द कर्णरंध्रात येऊन आदळले. म्हणून बरोबर आह्मी आपल्या डब्यांत येऊन बसलों. इकडे जंगलें फार असल्यामुळें कळक व जळाऊ व इमारतीच्या लांकडांचा मोठा व्यापार चालतो. मालांच्या गाड्या पुष्कळ आह्मांला वाटेंत भेटल्या. त्यांत लांकूड व कळक यांचा भरणा फार. डोंगरगड सुटल्या पासून जंगल कांहीं वेळ पर्यंत लागलें नंतर सरासरीं ९। वाजतां नांदगांव स्टेशन आलें. येथें एक कापसाचीं गिरणी दिसली. ती लहानशीच दिसली. नंतर मोठें स्टेशन रायपूरचे हें सुमारें सकाळचें १०॥ वाजतां लागलें. या वेळेपासून उष्मा भासावयास लागला. रायपूर हा मध्य प्रांतांतील एक जिल्हा आहे. शहरांतील दगडी इमारतीं दुरून फारच सुबक दिसत होत्या. इकडे रस्ते पाहावे तों तांबडे दिसले. जणूं काय सुर्याच्या महातापामुळें पृथ्वीच्या गौर अंग भागांतून रक्तिमाच बाहेर येत आहे असें वाटे. रायपूर पुढें उष्मा ज्यास्तच वाढूं लागला. "किर्रं" शब्द करणाऱ्या कीटकांनीं आपल्या रौद्रस्वानें आसमंत भाग अगदीं दणाणून टाकला. जणूं काय ते "बाबा आपलीं प्रखर किरणें जरा आटोपती घे" म्हणून आदित्याला कंठरवानें अगदीं विनवीतच आहेत असें वाटे. पक्ष्यांचा मधुर किलकिलाट कोठेंच ऐकूं येईना. उतारू लोकही आपआपल्या डब्यांतून शीतोपचार करून कृत्रिम वाऱ्याचें सेवन करून "हुश हुश" करीत होते. जणूं काय "आह्मा गरीबानां त्रास देऊन तुला काय फायदा" असें दिवाकरपंताचा तिरस्कार करून ते म्हणत आहेत असें भासे. असें तळमळत आह्मीं सुमारें १ वाजता बिलासपूरचे स्टेशनावर आलों. गाडी उभी राहिल्याबरोबर प्लेग तपासणीचा आदरपूर्वक थाट होत आहेसें दिसलें. "हस्तस्पर्श" "पाणिग्रहण" हे चमत्कार अनाठायीं दिसूं लागले. अर्थात हे मिथ्या वैवाहिक संस्कार तिसऱ्या व व मधल्या वर्गातल्या उतारूंसच करून घ्यावे लागत. सेकंड क्लास व फर्स्ट क्लास यांतील एतद्देशीय उतारूंस ही हा संस्कार थोडा बहुत होत असे. बिलासपूरचे स्टेशनाची इमारत बरीच मोठी आहे. सर्व दगडी काम. या बाजूला बहुतेक स्टेशनें मोठीं सुबक बांधलेलीं आहेत. प्रत्येक स्टेशनावर छोटेखानी फुलझाडांचा बगीचा, लतामंडप हें असावयाचेंच. इकडे तांबडे, पांढरे, काळे रंगाचे दगड पुष्कळ आहेत, बिलासपूर सारख्या स्लेटीच्या प्रमाणें दिसणाऱ्या दगडांच्या तक्त्यांचा कौला प्रमाणें उपयोग केलेला दृष्टोप्रत्तीस आला. बिलासपूर सुटल्या पासून उष्मा अतिशय भासू लागला. आगगाडींत बर्फाची वगैरे सोय होती म्हणून तृष्णेची कांहीं मात्रा चालली नाहीं परंतु बारीक सद्यांनां आह्मी सोडाचिठ्ठी कांहीं वेळेपूर्ती तर दिलीच. त्याशिवाय निभाव लागेना सरासरी दुपारचे ४ वाजे पावेतो अशी स्थिती झाली. इतक्यांत प्रातःकाळ प्रमाणें पुन्हा दृष्टिरमणीय अशी वनशोभा दिसूं लागली. आमचा खेदापनोद करण्याच्या उदार इच्छेनेंच जणूं आह्मांस पुन्हा तिनें दर्शनसुख दिलें असें वाटलें. हें जें जंगल लागलें तें ही अफाट होतें. जंगलांतून जंगली लोकांच्या व ग्राम्य जनावरांच्या वर्दळीनें पडलेले पायरस्ते बरेच दिसू लागले. नानाविध तरू अगदीं एका रांगेंत लावलेले असे दिसले. विश्वकर्म्याचा हा एक अकृत्रिम बगीचाच कीं काय असा भास होऊं लागला. मधून मधून लहान लहान ओहोळ, ओढे व नद्या मर्मर शब्द करित वाहतानां दृष्टीस पडत होत्या. जणू काय वनदेवतांनीं आपल्याला गार पाणी प्यावयास मिळावें म्हणून हे पाटच काढले होते असें वाटे. कांहीं तरी हिंस्रपशू दिसतील या हेतूनें दूरवर आह्मी टक लावून पाहत होतों. पण निष्फळ. मधून मधून तोडलेल्या वृक्षांचे बुडखे दुरून दिसत तेव्हां हा पहा कोल्हा बसला आहे असें एकमेकांस दाखवून विनोदसुखाचा आस्वाद आह्मी पूर्ण घेतला. अशी मौज पहात पहात आह्मी ५ (संध्याकाळचे) वाजतां "झसुरगड" नांवाच्या स्टेशनावर येऊन पोंचलों. येथें रेल्वे खात्यांत कांहीं दक्षणी लोक दिसत होते. या लोकांना आपल्या सारखेच दक्षिणी, देशी लोक (उतारू) जातांना दृष्टीस पडले म्हणजे परमाल्हाद होतो. त्यांना तो पुण्य दिवसच असें वाटतें. बिचारे पोटासाठीं इतक्या लांब येतात. याच स्टेशनावर एक दक्षिणी होता तो बोलून चालून चांगला माणूस दिसला. आह्मी कोण कुठले वगैरे सर्व चौकशी त्यानें केली. परत येतांना उतरल्या शिवाय जावयाचें नाहीं अशी त्यानें आमचेकडून कबुली करून घेतली. आपल्या लोकांस विदेशी, भाषेनें, आचारविचारानीं भिन्न अशा लोकांत येथें रहावें लागतें. करमणुकी करितां साधनें उपलब्ध नसतात. साराश, त्याचे दिवस मोठे कष्टांत जातात असें दिसलें. असो.

झसूरगडाचें स्टेशन सुटल्यावर म्हणजे सुमारें सायंकाळचे ६ वाजतां सूर्यास्ताचा समय होता. सूर्य क्षितिजा पाशी जात चाउला होता. तेव्हां क्षितिजाचा भाग तांबडा दिसूं लागला. जणूं काय हजारो रक्तकमलेंच फुललीं आहेत कीं काय असे वाटे. आकाशांत जलद ही जलद जलद इकडून तिकडे पळत होते. त्यांच्यावर बहुतेक इंद्र धनुष्यातले रंगाची छटा दिसत होती. जणूं काय 'सहस्र किरण' याचा वियोग सहन होत नाहीं हे नाना रंगांनीं ते व्यक्त करित होते. मावळत जाणाऱ्या सूर्याचीं कोवळीं किरणें वनवृक्षांच्या नूतन व कोमल पर्णांवर पडल्यामुळें ती पानें ज्यास्तच लाल दिसत होती. व सूर्याभोवतालचा क्षितीजांतील भाग ही लालच दिसत होता तेव्हां विलक्षण शोभा दिसत होती. हा दोन ठिकाणचा रक्तिमा दोन विकार दाखवीत होता तरूंच्या कोमल पर्णांतील जो रक्तिमा होता तो "बाबा मित्रा तूंच आमचा पोषण कर्ता जीवन दाता" असें सूर्याला म्हणून आपला अनुराग हे तरू दाखवीत आहेत असें वाटे. व सूर्याच्या भोवतालीं जो क्षितिजाचा भग लाल झालेला होता तो "मी तुमचा पोषणकर्ता असून दुपारीं माझ्या पासून त्रास होत होता म्हणून माझा अव्हेर करावयास पहात होता, नाहीं. तर कराच आतां माझा अव्हेर! हा मी चाललोंच पहा! आतां कोण तुमचें पोषण करतो पाहीन" असें म्हणून सूर्य मोठ्या झणत्कारानें व रागकंपानें—(सूर्यास्ताचे वेळीं सूर्य क्षितिजाचे खालीं जात असतांना कांपत आहे असें भासतें)—जात आहे तो राग दर्शवीत होता. अशी रागाचे (सूर्याभोवतालचे रागाचे रक्तपणाचे) पाठीमागून येणाऱ्या अनुरागाची (कोंवळ्या पानांतील लालपणाची) झटापट चालली होती. हा तंटा, हें भांडणण फार वेळ दिसू नये कारण भांडण हें वाईटच हें दर्शविण्या करितां म्हणून रात्रीनें आपला कृष्णपट पसरण्यास सुरुवात केली व या भांडणांत कांहीं अर्थ नाहीं असें सुचविलें व माझा कृष्णपट असून त्या भांडणाचे ऐवजीं ही नक्षत्रताराऱूपी रत्नें त्या कृष्णपटांत कशीं चमकत आहेत तो चमत्कार पहाण्यास सांगितलें.

[पुढें चालूं]

The Berar Samachar

MONDAY, JUNE 27 1898.

### NOMINATION VERSUS ELECTION

We now beg to advert with great

concern & alarm to the discouraging news which has unsettled the popular mind and which purports to communicate to the public that the Local Government is contemplating to see if better results can be attained by reverting to the old nomination system in municipal ad—ministration. Mr. F. S. Bullock Commissioner H. A. D. in his Report on Municipalities for the year 1896—97 is pleased to take a very unsympathetic view of the interest which the people generally take in municipal affairs. "The election of members is in my opinion" he says, "altogether contrary to native instinct and custom and does more harm than good, as it arouses jealousy and ill feeling, and in more than one town I have noticed its ill—effects." Further on he says "The Committees are, I regret to say, scarcely as public-spirited as they ought to be. There is an amount of petty bickering and jealousy among the members which retards good work, but on the whole the past year has been one of progress." The Resident accords his cordial approval to this pessimistic view in these words. "The Resident agrees with the Commissioner, in thinking that the appointment by election is not *really* congenial to the native mind and he is of opinion the nomination of members is a *better* system." These remarks clearly point out the unfavourable attitude taken up by the local government towards the privilege of the people to elect members. In accordance with this wish the Commissioner has, we learn, asked the Deputy Commissioners of the districts to express their opinions in regard to the municipalities in their districts. The Deputy Commissioner of Akola kindly invited the opinion of the Akola Municipality; and to consider the subject a Special General Meeting was convened here at the Town Hall, last Thursday 23rd June. By a majority of 10 against 4 a resolution was there passed to say that as the election system in force being highly beneficial has worked well at least so far as the Akola Municipality is concerned, where no such mischievous spirit as is apprehended by the Commissioner, exists to mar the smooth harmony among the members, it may be allowed to continue. It is greatly to be regretted that the Committee did not enter its emphatic protest against the proposed retrograde change in stronger terms, and with a unanimous voice. The Government is thinking of abolishing the system of appointment of municipal Commissioners by election and replacing it by the old system of nomination. The reason assigned for the change is two fold—1st, that the principle of election is contrary to the native mind and secondly that a spirit of jealousy and ill feeling is roused. Now *ex hypothesi* nomination system was in force prior to the present election system. The introduction of the latter system implies that the people showed themselves to be well suited to the extension of the privilege. From its dawn upto day the municipal administration in Berar possesses a record of a steady and continuous progress. Day by day greater activity, and public spirit are observable in the people and their capacity to administer municipal affairs is gaining greater vigour. Education is steadily spreading and its direct advantage is perceptible in the increasing number of intelligent heads in the body at the direction of affairs. Such being the case, it cannot consistently be maintained that the native mind is unsuited to harbour and cherish the principle of self—government or election. Taken in itself the principle of election is not contrary to human mind. In the domestic sphere and amidst society the native mind obeys the principle as systematically, scrupulously and unmistakably as any western mind. The western conception of politics may not perhaps quite fit in with the native mind; but similarly many western ideas were foreign to the native mind which have now proved to be perfectly agreeable to it. Even the most advanced mind in the west was a few centuries ago unable to conceive the most subtle notion of gravitation or electric force, could it have been reasonably contended that the conceptions being contrary to the Western mind, the sciences dealing with them should not be taught, nor human progress effected. To advocate such a repressive policy in the culture and growth of mind is opposed to the sound principles of true civilization and real progress. It is in other words marching back from civilization to barbarism and ignorance.

( to be continued )

---

The 'Hindu' of Madras has well shown on the authority of Sir Raymond West that no change in the Contract Act will improve the lot of the ryots unless a substantial help proceeds from the Government to lighten their burden of taxation. Here is a nice description of the way in which the Deccan Relief Act proves a failure to syme extent:—

"The problem before us' it was said, is how to keep the money—lender in his place to encourage and support him in all useful functions. We must foster due credits. We must hold the rayat responsible in our Courts for what he has really borrowed, not for what he has not; and make him repay by his own exertions all that he reasonably can repay, not set him free by sudden, one-sided or heroic remedies to enter on a fresh career of indebtedness.' Now, unless the general opinion is wholly mistaken, the most conspicuous consequence of the Act has been to oust the money—lender from his place by means of a one-sided remedy which has extinguished credit in making the rayat irresponsible. The whole class of those who furnished capital to the cultivator have, with a very few exceptions, closed their business, and, except when retained by the hope of recovering some portion of the money due to them or by imprisonment at the suit of their own creditors, they intend to leave the district. Where the money—lenders have bought land or lent on mortage, an early retreat is impossible, but their former function is no longer performed. As regards the ordinary rayat, the Act, by which it was said, "We must foster due credit" has simply extinguished it. The pressure of this annihilation of credit is as yet hardly felt. The harvest of last year was unusally abundant, and the rayats, not frittering away their fortunes in paying their debts, are revelling for one year in a fool's paradise. A single bad season will bring them to ruin; and even without a bad season their funds will, in three or four years, have been as much consumed in waste as if they had paid their debts. The difference will be that the creditors having been in many instances impoverished and having in all cases become distrustful, the rayats will be without any resources to tide them over the first time of adversity."

---

## वऱ्हाड

अलिशान रेसिडेंट सर. टी. सी. प्लौडन साहेब यांची स्वारी पुढील महिन्याच्या ३० वे तारखे पासून तीन महिन्यांच्या रजेवर जाणार आहेत.

मि० ए. लुकस सिव्हील सरव्हंट व डेपुटी कमिशनर वर्ग १ यांस मि० आवर्ड यांच्या रिकाम्या जागीं आफिशिएटींग जडिशिअल कमिशनर नेमण्यांत आलें. मि० इलियट हे विलायतेहून परत येऊन दाखल होतील तों पर्यंत ही नेमणूक अंमलांत राहील असा अंदाज आहे.

यवतमाळ मुनसिपालिटीला कांहीं सभासद लोकमतानें निवडून घेण्याचा अधिकार होता तो अधिकार काढून घेतल्याचा हुकूम गव्हरनर जनरल इन कौंसिलाच्या मंजूरातीनें फर्माविण्यास रेसिडेंट साहेबांस खुषी वाटते.

मि. आर. ए. सिम्पसन डिपुटी कमिशनर यांस वाशिम मुनसिपालिटीनें चेअरमनच्या जागीं निवडलें आहे.

रा० रा० रघुपती मोहनराव तहशीलदार वर्ग ३, पुसद यांस जुलईच्या १ ले तारखे पासून २३ दिवसाची हक्काची रजा मिळाली असून रा. रा. गणेश राजाराम नायब तहशीलदार हे त्या रजेंत काम पाहतील.

उमरावतीस तहशीलदारीच्या जागीं रा. रा. दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. नायब तहशीलदार यांस नेमण्यांत आलें असून नायब तहशीलदारीवर मि. करसेटजी संजाना बी. ए. यांस नेमिलें ही आनंदाची गोष्ट होय.

१८९७ च्या एप्रिल महिन्यांत ९६४७ मनुष्यें जन्मलीं आणि दुष्काळाच्या कारणानें गेल्या एप्रिल महिन्यांत ३७७४ मनुष्यें जन्मलीं. आणि ९९०७ माणसें त्याच महिन्यांत मेलीं. मरणाची संख्या कमी आहे या वरून सार्वजनिक आरोग्य चांगलें होतें हें सिद्ध होत आहे.

'विद्या' मासिक पुस्तकाच्या १ ला अंक व 'निर्णयसार किंवा विचाररूप न्याय' या पुस्तकांचा आभारपूर्वक स्वीकार करितों.

रा० रा० विष्णु रंगनाथ आक्टिंग एक्स्ट्रा असि० कमिशनर, यवतमाळ हे दोन महिन्यांच्या रजेवर येत्या १ तारखेपासून जाणार असून त्या रजेंत रा० रा० विठ्ठल नारायण काळीकर, तहशीलदार यांस आक्टींग एक्स्ट्रा असि० कमिशनर नेमण्यांत येईल.

आणि यवतमाळच्या तहशीलदारीवर रा० रा० मारुती हरी क्लार्क आफ कोर्ट यांस नेमण्यांत येणार आहे.

मि० अब्दूल कुद्दूस तहशीलदार बाळापूर हे आगष्ट पासून ३ महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाणार आहेत आणि त्यांच्या रजेंत रा० रा० दामोदर नानाजी शिंदेकर अक्टींग तहशीलदार, आकोट यांस तहशीलदार नेमण्या विषयीं शिफारस झाली आहे.

---

### नोटीस.

नोटीस बनाम बापुसा व० छबुसा रंगारी राहणार वस्ती बडगांव तालुके जळगांव जिल्हा आकोला यांसी. खाली सही करणारा अंबुसा व. सोनासा रंगारी वस्ती नांदुरें बुजरुक तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणा. मी तुह्मास नोटीसीनें असें कळवितो कीं, तुझी बहीण नामे गुजी इजबरोबर माझे गंधर्व विवाह होण्याचें ठरलें व त्या प्रमाणें जातीधर्मा प्रमाणें कपडे दागिनें वगैरे मिती जेष्ट शुद्ध पौर्णिमेस चोळी पात्र दागिनें चढविले व रोख नगदी रुपये १०० दिले आहेत. व तुमचा आमचा गंधर्व लावण्याचा करार गेल्या जेष्ट वद्य १२ द्वादशी रोजी नेमिले होते त्या प्रमाणें आह्मी सर्व प्रकारची तयारी करून तुमचे गांवी आलो. तुह्मी करारा प्रमाणें कार्य केले नसून आह्मास माघारी वापस पाठविले त्यापासून आह्मास फार नुकसान लागून आमची गैरअब्रु सुद्धा झाली आहे करितां झालेले नुकसानीचा तपसील खाली लिहिल्या-प्रमाणें: रोख नगदी रुपये १०० शंभर हस्त गुजी व बापुसा; याशिवाय लुगडे एक किंमत रुपये नऊ व चोळीचा खण रुपये २। सव्वा दोन. सरी १ एक चांदीची वजन तोळे १८ अठरा, नगद १ रुपया व किरकोळ १॥ रुपया, याशिवाय खर्च रुपये १२--१३ गाडी बैलाचे भाडे. दिवस पंधरा. येणें जाणें २ वेळा रुपये १८॥ दररोजास १। या शिवाय किरकोळ खर्च ३॥ रुपये. एकूण जुमलाबिरी झालेली रकम ( १६७=- ) याशिवाय नोटीसीचा खर्च व याचा निवाडा होईपर्यंत जो खर्च लागेल तो तुमच्या माथे लागेल. सदर्हू वर लिहिल्या प्रमाणें तुह्मास नोटीसीनें असे जाहिर करितोंकीं आमची झालेली नुकसानी ५--६ दिवसाचे आंत आमचे घरी तुह्मी व तुमची बहीण नामे गुजी असे दोघे उभयतां येऊन आमचा निवाडा करून जावा. असें न केल्यास तुह्मावर रिती प्रमाणें तजवीज करितां येईल. ह्मणून दिली नोटीस सही तारीख २४।६। ९८ इसवी.

सही

अंबुसा सोनासा रंगारी राहणार नांदुरे तालुका बुलढाणें दस्तुर खुद्द.

---

### जाहिरात

सर्व लोक व जातभाई पंच वगैरे यांस अंबुसा सोनार रंगारी नांदुरेकर हे असें जाहीर करितात कीं बापुसा वल्लद छबुसा रंगारी रहाणार वडगांव तालुके जळगांव याची बहिण नामे गुजी इज बरोबर आमचा गंधर्व होण्याचा ठराव झाला होता त्याप्रमाणें आह्मी सर्व तयारी करून ठरले त्या दिवशी वडगांवी गेलो परंतु सदर्हू बापुसा याच्या मनांत आह्मा विषयीं कपट उत्पन्न होऊन ठरलेला गंधर्व आह्मांस खर्चीत पाडून मोडून टाकला. याज करितां सदर्हू गुजी इज बरोबर माझ्या संमती शिवाय जर कोणी गंधर्व वगैरे करील तर त्या जबद्दलचा जबाबदार सर्व प्रकारानें जो करील त्यास धरला जाईल ह्मणून दिली जाहिरांत सही तारीख २४ माहे जून सन १८९८ वसवी.

( सही )

अंबुसा सोनासा रंगारी कसबे नांदुर दस्तुर खुद्द.

---

## वर्तमानसार

कलकत्याची लोकसंख्या ७६६३८२ असून तेथें एकंदर १२० युरोपियन आणि २८०४ नेटिव पोलिस आहे, पण मुंबईची लोकसंख्या ८२१७६४ असून तेथें एकंदर ७८ युरोपियन व २१६२ नेटिव पोलिस आहेत. एवढ्या पोलिसांकडून मुंबईचा बंदोबस्त चांगल्या प्रकारें रहातो यावरून त्यांची हुषारी दिसून येते.

बलुचिस्थानाकडे टोळांचा उपद्रव अतिशय झाला असून पिकांचा टोळधाडीनें नाश होत आहे.

एका फ्रेंच कृषिशास्त्रज्ञानें बटाट्याचे झाडावर टोम्याटो फळझाडाचें कलम करण्याची नवीन योजना केली आहे. तीमुळें बटाटे जमिनींत येऊन टोम्याटोचीं फळें वर झाडावर येतात.

पुणें जिल्ह्यात आजपर्यंत एकंदर प्लेगच्या तावडींत सांपडलेलीं माणसें ४१२८ असून पैकीं ३०८८ मरण पावलीं. पुणें शहर व लष्कर मिळून एकंदर ९३६० माणसें लागलीं व ६९६५ मेलीं.

सातारा जिल्ह्यांत आजपर्यंत एकंदर १५६५९ माणसांस प्लेगताप आला पैकीं १३२९१ माणसें मेलीं. ही संख्या सर्व मुंबई इलाख्यांत यंदा जास्त आहे.

सुरत जिल्ह्यांत आजपर्यंत एकंदर ६६७१ माणसांस प्लेगनें पछाडलें असून त्यापैकीं ४९९४ मृत्यू पावलीं. गु० सू०

राशियानें गेल्या सत्तर वर्षांत ज्या लढाया केल्या त्यांस त्याला सहा कोट सत्तर लक्ष पौंड खर्च आला. त्याचे साडेसात लाखांपेक्षां जास्त लोक त्यांत मारले गेले असें समजतें.

जर्मनीमध्यें अलिकडे कागदाचे दांत बसवूं लागले आहेत. ते टिकाऊ असून न झिजतां आपलें काम फार चांगलें करितात ह्मणतात.

देशाभिमान—अमेरिकेंतील लाखोपतीचे ९० मुलगे आपल्या देशाभिमानाकरितां हल्लींच्या लढाईवर गेले आहेत असें समजतें.

बेळगांवचे असिस्टंट डिपुटी ए. इ. मि. अबदुलखान आतार यांणीं गुळहोसुरास हिंदूंच्या देवालयांत उतरून देऊळ बाटविल्यामुळें त्यांच्यावर काम चालून शेवटीं त्यांना कामांतून दूर केलें.

बडोदे—पिलवई गांवाच्या लोकांनीं सरकाराविरुद्ध बंड केल्यामुळें तो गांव तारीख ७।६।९८ पासून हुजूर आज्ञेनें खालसा करण्यांत आला आहे.

अमेरिकेंत रेल्वे गाडींत हास्पिटलची सोय केली असते. सुधारणा.

रेव्याचे महाराज, श्रीव्यंकटेश रमणसिंह बहादूर यांनीं आपल्या राज्यांतील दारू दुकानें बंद केलीं. हल्लीं समजतें कीं, राजमतानुसार दारू पिणाऱ्या अनेक सरदारांनीं सभा भरून आजपर्यंत मद्यपान केल्याबद्दल प्रायश्चित्त घेऊन पुढें मद्यपान न करण्याबद्दल दृढसंकल्प केला.

अमृतसर मध्यें व्यापारी शिक्षणाची एक पाठशाळा स्थापन होत आहे! ठीक आहे. क० त०

आज सहा महिने सावनवाडी येथें एका भयंकर खुनाचें प्रकरण चालू असून त्याच्या आरोपींचा आतां कोठें पोलिसला शोध लागला आहे आणि त्यांच्यांवर त्यांनीं तेथील माजि० पुढें खटलाही चालू केलेला आहे. ज्याचा खून ता० ८ जानेवारी रोजीं तेथें झाला तो तेथले माजी कारभारी रा. सा. वाबडेकर यांचाच एक अनौरस मुलगा असून त्याचा खून त्यांच्या औरस मुलानें दुसऱ्या दोघां सोबत्यांच्या साह्यानें केला असा पोलिसचा आरोप आहे. खून झालेला मुलगा मॅट्रिक्युलेशनचे वर्गांत होता आणि त्याचा खून करणारा मुलगा ती परीक्षा पास झालेला सांवतवाडीचा सनदी वकील आहे.

नकतीच श्रीमंत इचलकरंजीकरांची स्वारी शिकारीस गेली होती. त्या वेळीं कांहीं शिकार सापडावयाचे पूर्वी त्यांच्या बरोबरच्या शिपायाच्या हातीं एक बंदूक होती तिचा एकदम बार झाला त्या योगानें तिच्या पैकीं कांहीं छरे उडून श्रीमंतांचे मांडीमध्यें घुसले आहेत हें कळविण्यास वाईट वाटतें. त्या शिपायालाही थोडीशी इजा या अपघातानें झालेली आहे. श्रीमंत इचलकरंजीकरांची स्वारी औषधोपचारार्थ सध्यां कोल्हापुरास येऊन राहिली आहे. मुं. वै.

पंख्याची कल्पना कल्पना अगदीं प्रथमतः पक्ष्याच्या पंखावरून निघाली.

हत्तीच्या घ्राणेंद्रियासारखें तीक्ष्ण घ्राणेंद्रिय दुसऱ्या कोणत्याच प्राण्यांचें नाहीं. त्याला मनुष्याचा वास कमींत कमी एक हजार यार्डांवरून येतो.

जपानांत एक नवरा बायकोचें जोडपें आहे. त्यांचीं वयें अनुक्रमें १३९ व १३३ अशीं आहेत. सगळ्या जगांत इतकें वृद्ध दंपत्य दुसरें कोणतेंच नाहीं. त्यांना एकंदर चौदा मुलें आहेत. सगळ्यांत वडील मुलाचें वय आज १०८ वर्षांचें आहे.

जनावरांत जर कोणाला पोंहतां येत नसेल तर तें फक्त उंटानांत येत नाहीं असें ह्मणतात. उंट पाण्यांत शिरल्याबरोबर तो पाण्यांत पालथा पडतो व तो कांहीं वेळानें बुडून जातो. क.

निजामच्या राज्यांतील इंग्रज डाक्टर सर्जन ले. कर्नल लॉरी हे गेल्या बुधवारीं बायसिकलवरून पडल्यामुळें बरेच दुखावले गेले आहेत.

तुमलूक नांवाच्या शहरांतही तेथील पोलिस इन्स्पेक्टररानें प्लेगच्या तपासणीचें निमित्त करून एका द्वादश वार्षिकी कुमारिकेशीं जबरी संभोग केल्याची हकीकत हल्लीं बाहेर आली आहे. मुलीच्या आईनें फौजदारींत काम चालविल्या बरोबर त्या दुष्ट इन्स्पेक्टरानें आपसांत समजूत करून तें प्रकरण मिटविलें. पण खरी हकीकत समजतां त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें त्या मानव कसाबाची त्या गांवाहून दुसरीकडे बदली केली. काय हें दुःश्राव्य कृत्य. हिंदुस्थान सरकारास पुनरपि आह्मी अशी सविनय प्रार्थना करतो कीं, पोलिस अंमलदारांच्या कृष्णकृतीचें निर्मूलन होण्यासाठीं त्यांनीं योग्य त्या तजविजी जरूर व लवकर अंमलांत आणाव्या व भविष्यकाळीं येणारीं भयंकर संकटें नाहींशीं करण्याचें श्रेय घ्यावें.

मनीलाचे नजीक जर्मन मनवारी बऱ्याच शा जमल्या आहेत, पण त्या काय कारणानें जमल्या आहेत व जर्मनीचा हेतू काय आहे हें न समजल्यामुळें यूरोप व अमेरिका या दोन राष्ट्रांत त्या संबंधानें भारीच चळवळ उडून गेली आहे. हल्लीं तेथें चार जर्मन मनवारी असून ' डॅमिस्टेटर ' नांवाचें मनवार जाऊन पोंचतांच एकंदर मनवारी वरील सैन्याची संख्या तीन हजारांवर होईल असा अंदाज आहे; कित्येक अफवावरून तर असेंही कळतें कीं जर्मन सरकारचा इरादा सुलूना टापूचा कबजा घेण्याचा असून त्याच कारणानें तें सरकार तेथें सैन्याची जमवाजमव करीत आहे. युरोपियन राष्ट्रांतील आजकालच्या चळवळीस अखेर कोणत्या प्रकारचें स्वरूप प्राप्त होईल त्याचें अनुमान भविष्यवादी तरी करूं शकतील काय? गु

एक कोट पौंड नवें कर्ज—हिंदुस्थानच्या मागील कर्जाच्या फेडीसाठीं, लोहमार्गाची वृद्धि करण्यासाठीं, आणि प्रसंगाच्या वेळीं उपयोगीं पडण्याकरितां स्टेट सेक्रेटरींचे हातीं कांहीं शिल्लक राहिली पाहिजे ह्मणून ह्या ३ कारणांस्तव विलायतेंत १ कोटी पौंड कर्ज काढण्याचा ठराव लार्ड जार्ज हामिल्टन ह्यांणीं कामन्स सभे पुढें आणून पास करून घेतला असें लंडनची तार सांगते. हिंदुस्थानच्या रेव्हिन्यूचा स्थिती यंदां फार सुरेख आहे असें सांगून लॉर्ड एल्जिन साहेबांनीं आणीबाणीच्या वेळीं हिंदुस्थानचा बचाव केला ह्मणून त्यांची त्यांणीं हवी तितकी प्रशंसा केली. दिवसें दिवस कोट्यावधी रुपये जास्त कर्जाचें ओझें हिंदुस्थानच्या माथीं बसत असून हिंदुस्थानची स्थिती उत्तम आहे अशी आलेवल कामन्स सभेंत देण्यांत येते, ह्याचा अर्थ काय!

एका योग्याचें चमत्कारिक निधन—गाझीपूर येथें पावारीबुवा ह्मणून एक लोकमान्य योगी फार वर्षांपासून राहात असे. गेल्या ९ वर्षांत तो फारसा कोणाच्या दृष्टीस पडत नसे. दारें लाऊन मठात बसे. ह्या योग्यानें मनुष्य देहास कंटाळल्यामुळें थोड्या दिवसापूर्वीं एक दिवस पूजार्चनादि विधि आटपून आपल्या सर्वांगाला तूप माखलें, आणि मठाच्या चारी कोपऱ्यांस आग लावून तो प्रज्वलित झाल्यावर त्या आगींत जाऊन आसन घातलें आणि ह्या क्षणभंगूर कलेवराचा त्याग करून वैकुंठ मार्ग स्वीकारिला. दुसऱ्या दिवशीं त्यांच्या बंधूनें त्यांच्या अस्थि गंगोदकांत टाकून पुनीत केल्या!

दिल्ली—येथील वैद्यांनीं आपले आर्य वैद्यक ग्रंथांचे संशोधन करून प्लेगचीं कारणें व त्यावरील औषध हीं त्यांतून हुडकून काढलीं, व तीं आपल्या मुख्यध्यक्षांचे मार्फत पंजाब सरकारास कळवून प्लेगच्या रोग्यांची निगा आह्मी राखूं व त्यांला मोफत औषध देऊं अशीहि इच्छा दर्शविली होती. त्यावरून सरकारानें धर्मगुरूंविषयीं आभार प्रदर्शित केले आणि वैद्यांचे प्लेगवरील औषध ज्यांला घ्यावयाचें असेल, त्यांला तें घेण्यास सरकारची मुभा आहे असें कळविलें. स० शो०

जर्मनींत एका कारागिरानें असें एक पिस्तुल बनविलें आहे कीं, त्या पिस्तुलाचे एका मिनिटांत ६० फेरे होतात. हें पिस्तुल वजनांत हलकें, दिसण्यांत सुंदर आणि टिकाऊपणांत मजबूत असें बनतें ह्मणून सांगतात.

भयंकर तोफ!—बिर्मिंघम येथील कारखान्यांत नुकीच एक तोफ तयार करण्यांत आली आहे. त्या तोफेनें एक मिनिटांत ९०० गोळे उडविण्यांत येतात व ते गोळे ३० मैल पर्यंत लांब जातात।

प्रवृद्ध पोस्टमास्तर—अयर्लंड देशांत एक १३४ वर्षांचा पोस्टमास्तर आहे. त्याला आपल्या कामाचा कंटाळा मुळींच आला नसून तो पेन्शन् मुळींच घेत नाहीं. जन्मभर पर्यंत हें काम करण्याचा याचा विचार आहे. व सरकारही त्याला पेनशन घेण्याविषयीं आग्रह करीत नाहीं!

कचेरींत खून—सालेम ( मद्रास ) जि. त एका सब. म्याजि. ला तो कचेरींत काम करीत बसला असतां एका पोलिस कान्स्टेबलानें गोळी घालून ठार मारलें. गोळी घालण्याचें कारण, त्या कान्स्टेबलानें पकडलेला चोरटा मनुष्य सदर म्याजि. नें निर्दोष ह्मणून सोडून दिला हें होय. सदर कान्स्टेबलास पकडल्याची वार्ता अजून समजली नाहीं.

पक्ष्यांनीं आग लाविली!—पेंजी नांवाच्या रेल्वे स्टेशनावर नुकतीच एकदां लागली असें ऐकण्यांत आलें आहे. स्टेशनाच्या माथ्यावर जें आमण घातलें होतें त्याच्या वांशांत दोन लहान पांखरांनीं एक घरटें बांधलें. हें घरटें बांधावयास त्यांनीं ज्या काटक्या, तंतू, वगैरे गोळा केले त्यांत चुकून एक आगकाडी गेली होती पुढें मादीनें अंडीं घातल्यावर तीं अंडीं उबविण्याचें काम नर व मादी हीं दोन्ही पाखरें पाळीपाळीनें करीत असत. अंडीं उबवितांना अंड्याच्या बरोबर आगकाडीचें तोंड उबून ती काडी पेटली व त्यामुळें तें घरटें पेटून वासे जळूं लागले! असाच प्रकार आणखीही एक दोन ठिकाणीं झाल्याचें ऐकिवांत आहे! ज्ञा च०

नाईलच्या मोहिमेवर इंग्रज सरकारचें वीस हजार लष्कर जाण्याच्या तयारींत आहे. ही लढाई जोरानें होणार असें लक्षण दिसतें.

यंदा शिंदे सरकारनें मुंबईहून एक मण बर्फ आणून मोहरममध्यें बर्फाचा डोला तयार केला होता. हौसेला मोल नाहीं.

सूर्यावरील नवीन डाग— सूर्यावर एक नवीन डाग नुक्ताच पाहण्यांत आला असून त्यांचे उदरसूत्र ३०,००० ( तीन हजार ) मैल आहे असें जोतिषवेत्यानीं प्रसिद्ध केलें आहे.

चंडोल व मदत हे अफूच्या नियमांत घालून त्यांची विक्री बंद करण्यांत आली आहे.

पंजाबाहून बाहेरच्या देशांत पाठविण्यासाठीं कराची येथें इतका पुष्कळ गहूं येत आहे कीं, दहा बोटी तेथें तो सतत भरीत असून वखारी पुरेशा नसल्यानें तो मैदानावरटी राशी करून ठेवावा लागत आहे. आ. व.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.